Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०३/२०१३** **दिनांक ०७.०२.२०१३**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दि.०७.०२.२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-५०७३-२०१३, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.०७.०२.२०१३ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर मा.अध्यक्ष, श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. किशोर मोरे,कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक पाणी नमुने तपासणी कामी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडिल कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परीसरामध्ये विविध ठिकाणी वितरित केले जाते. सदरचे पाणी शुध्द होऊन ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याच्या नमुन्यांची लॅबमध्ये तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची पाणी पुरवठा विभागाकडिल लॅबमध्ये अणुजीव व रासायनिक पध्दतीने तपासणी केली जाते. तसेच अहमदनगर येथील जिल्हा आरोग्य केंद्रात पाणी नमुने अणुजीव तपासणी करीता दर महिन्याला पाठविले जातात. याशिवाय एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची याकामी पाणी नमूने तपासणीसाठी (रासायनिक व अणुजीव) नेमणूक करण्यात आलेली होती व त्यांचेकडून पाणी नमुने तपासणीचा दरमहा अहवाल मागविला जात आहे. व त्यांनी केलेल्या सुचना अमलात आणून पाणी शुध्दीकरणासाठी उपाय योजिले जातात.

पाणी पुरवठा विभाग दि.१५ डिसेंबर,२०११ रोजीचे मंजुर टिपणीन्वये एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांना दि.०१ जानेवारी,२०१२ ते दि.३१ डिसेंबर,२०१२ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेसाठी टिपणी सादर करण्यात आलेली होती. यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४जानेवारी, २०१२, विषय नं.१०२ निर्णय क्रं.१०३ नुसार यावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"पाणी तपासणीकामी संस्थानची स्वतंत्र लॅब तयार करणेकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, दरम्यानचे काळात मे. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना दि. ०१ जानेवारी,२०१२ पासून पूढे सहा महिने कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले."

त्यानुसार एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांना दि.०१ जानेवारी,२०१२ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांची मुदत माहे जुन-२०१२ अखेर संपलेली होती. त्यानंतर पाणी पुरवठा विभाग दिनांक २५ जुलै, २०१२ रोजीचे टिपणीन्वये एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची दि. ०१ ऑगस्ट, २०१२ ते दि. ३१ डिसेंबर,२०१२ अखेर पाणी तपासणी करणेसाठी टिपणी सादर करण्यात आलेली होती. यावर यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५ ऑगस्ट,२०१२ , विषय नं.३४ निर्णय क्रं.६८९ नुसार सविस्तर चर्चा होवून यांनी पुन्हा पुर्वीचे दर व अटीशर्तीप्रमाणे (रु.८००/- प्रती सँपल मात्र दरमहा ४ शॅम्पल + रु.१७५/- मात्र व्हिजीट चार्ज + सर्व्हीस टॅक्ससह) पुढील कालावधीसाठी पाणी तपासणी करणेसाठी ०१ ऑगस्ट, २०१२ ते दि. ३१ डिसेंबर,२०१२ अखेर मुदतवाढ देण्यात आली.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्देशाप्रमाणे संस्थानची पाणी तपासणी लॅब कार्यरत असुन, त्यामध्ये पाण्याची तपासणी करणेत येत आहे. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांचे १० वर्षाचे काम समाधानकारक असल्याने तसेच पाणी शुध्दीकरणांकरीता त्यांचे मार्गदर्शनाची आपणास आवश्यकता असल्याने त्यांना मुदतवाढ देणेबाबत नम्र मत आहे.

तरी एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना पूर्वीचेच अटीशर्तीप्रमाणे त्यांनी कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराप्रमाणे प्रती शॅम्पल रुपये ९५०/- मात्र दरमहा ०४ शॅम्पल + रुपये २००/- मात्र व्हीजीट

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



चार्ज + १२.३६% सर्व्हीस टॅक्ससह दिनांक ०१ जानेवारी,२०१३ ते दिनांक ३१ डिसेंबर,२०१३ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेसाठी मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पूर्वीचेच अटीशर्तीवर, प्रती शॅम्पल रुपये ९५०/- मात्र, (दरमहा ०४ शॅम्पल + रुपये २००/- मात्र व्हीजीट चार्ज) + १२.३६% सर्व्हीस टॅक्ससह दिनांक ०१ जानेवारी,२०१३ ते दिनांक ३१ डिसेंबर,२०१३ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०२** **कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचा पाण्याचा साठवण तलाव कनकुरी शिवारात करण्यात आलेला आहे. सदरच्या तलावात साधारणत: ३० ते ४५ दिवस पाणी साठवून राहत असल्यामुळे त्यामध्ये मोठया प्रमाणावर शेवाळ तयार होवून पाण्याची प्रत खराब होते. यासाठी उपाय योजना म्हणून शेवाळ नष्ट होणेसाठी साठवण तलावात मत्सबीज सोडून मासे संगोपन करण्यात येते. तलावातील मासे शेवाळ खावून नष्ट करतात व त्यामुळे तलावातील पाणी स्वच्छ राहण्यास मदत होते.

याबाबत जा.नं./एसएसएस/वशी/पा.पु./११५१०/२००९, दि.१४-०९-२००९ अन्वये मुळानगर मत्स्यबीज उत्पादन केंद्र, मुळानगर ता.राहुरी यांचेकडुन प्रती १००० नगास रुपये ४०० याप्रमाणे २५००० नगास एकुण रु. १००००/- मात्रचे बोटुकली मत्स्यबीज खरेदी करुन कनकुरी साठवण तलावात सोडण्यात आलेले होते. त्यानंतर पाणी पुरवठा विभाग टिपणी १६.०२.२०११ अन्वये कोटेशन मागवून मासे विक्री करणेस मान्यता घेण्यात आली. त्यानुसार आलेले कोटेशन धारकांपैकी जादा दराचे कोटेशनधारक यांना साठवण तलावातील मासे विक्री करणेसाठी ऑर्डर देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे ३०११ किलो मासे प्रती किलो रु.५२/- याप्रमाणे विक्री करण्यात येवून एकुण रु. १,५६,५७२/- मात्रचे रकमेचा भरणा लेखाशाखेत करण्यात आलेला आहे.

तरी पुढे उन्हाळा सिझन असल्याने पाण्याचे रोटेशन उशिरा झाल्यास उन्हाळयात पाण्याची पातळी कमी होवून मासे मरण्याची शक्यता असल्याने तसेच त्यामुळे पाणी दुषीत होण्याचा धोका आहे. शिवाय यापुर्वी पाण्याची पातळी कमी झाल्याने व तलावात वाढ झालेले मासे असल्याने ते चोरून नेण्याचे प्रकार घडलेले आहे.

सदरच्या कारणांसाठी आता वेळीच तलावात असलेले मासे विक्री करणे आवश्यक आहे. याकरीता स्थानिक मासे पकडणा-या व्यक्तिंकडुन बंद पाकिटांमधुन कोटेशन घेवून ते समक्ष उघडुन त्यातील जास्तीत-जास्त दर देणा-या कोटेशन धारकास मासे पकडुन विक्री करणेस परवानगी देता येईल.

तरी स्थानिक मासे पकडणा-या व्यक्तिंकडुन बंद पाकिटांमधुन कोटेशन घेवून ते समक्ष उघडुन त्यातील जास्तीत-जास्त दर देणा-या कोटेशन धारकास मासे पकडुन विक्री करणेस परवानगी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावातील मासे विक्री करणेसाठी स्थानिक मासे पकडणाऱ्या व्यक्तिंकडुन विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व प्राप्त होणारे कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडून त्यामध्ये जास्तीत-जास्त दर देणाऱ्या कोटेशन धारकास मासे पकडुन विक्री करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०३** **मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर व उपविभागीय अधिकारी कार्यालय,श्रीरामपुर यांचे मागणीबाबत.**

**प्रस्ताव -** **(अ)** उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.१ अन्वये मा.जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी अहमदनगर जिल्हयात सन २०१३ या वर्षाच्या मान्सुन कालावधीत कमी पर्जन्यमानामुळे भिषण पाणी टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने आजही जिल्हयातील वाडया/वस्त्यांना टॅंकरने पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. टंचाई परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी सामाजिक बांधिलकी म्हणून तसेच पिण्याचे पाण्याची गरज विचारात घेता संस्थानकडून ५००० लिटर्स क्षमतेच्या १००० नग सिंटेक्स टाक्या व रुपये १ (एक) कोटी मदत मिळणेस विनंती केलेली आहे.

**(ब)** तसेच संदर्भ क्रं.२ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी, तथा उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपुर विभाग यांचे पत्र प्राप्त झालेले असुन त्यामध्ये त्यांनी मागील वर्षात पडलेल्या अपुऱ्या पावसामुळे सध्या पिण्याचे पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याने टॅंकरव्दारे पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणेचे मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. टॅंकरव्दारे पिण्याचे पाण्याचा पुरवठा हंडा पध्दतीने केल्यामुळे टॅंकरच्या पुरेशा खेपा होण्यात कालपव्यय होत असून, हंडा पध्दतीने पाण्यासाठी भांडणे होतात. तसेच, विहीरीत पाणी टाकल्यास पाणी खराब व दुषीत होण्याची तसेच विहीरीतुन पाणी काढतांना अपघात होवून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याची पाणी टंचाई परिस्थिती व भीषणता लक्षात घेवून, पिण्याचे पाणी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



साठविण्यासाठी व वितरणांसाठी संस्थानमार्फत ५००० ते १००० लिटर्स क्षमतेच्या किमान २५ प्लॅस्टिक (सिन्टेक्स) टाक्या सेवाभाव वृत्तीने उपलब्ध करुन देण्यास विनंती केलेली आहे.

संस्थानकडे सध्या १००० ते ५००० लिटर्स क्षमतेच्या टाक्या सद्यस्थितीस उपलब्ध नाही. माहे जुलै २०१२ मध्ये संस्थान स्टाफ क्वॉर्टरचे टेरेसवर बसविणेसाठी २००० लिटर्स क्षमतेच्या १२ नग व ३००० लिटर्स क्षमतेच्या ०८ नग अशा एकुण २० नग सिन्टेक्स टाक्या (थ्री लेअर) खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या टाक्या स्टाफ क्वॉर्टर येथे बसविण्यात आलेल्या असुन तेथील पुर्वीच्या टाक्या काढुन टाकण्यात आलेल्या आहेत. परंतू त्या वापरास योग्य नाहीत.

मा.जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर व मा.उपविभागीय अधिकारी, तथा उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपुर विभाग कार्यालय यांचे पत्रात मागणी करण्यात आलेल्या सिन्टेक्स टाक्यांचे लेअरचा उल्लेख नाही. संस्थानकडे सद्यस्थितीस सिन्टेक्स टाक्या उपलब्ध नसल्याने त्या खरेदी करुन त्या संबंधीतांना पुरवाव्या लागतील. त्याकरीता अंदाजे खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

५००० लिटर्स क्षमतेच्या (थ्री लेअर) एकुण १०२५ नग सिंटेक्स टाक्या खरेदी करणेसाठी अंदाजे रुपये ५५,०००/- प्रती नग याप्रमाणे एकुण अंदाजे रुपये ५,६३,७५,०००/- मात्र व मा.जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मागणीप्रमाणे रक्कम रुपये १ (एक) कोटी असा एकुण अंदाजे रु. ६,६३,७५,००० मात्र खर्च अपेक्षित आहे.

**किंवा**

५००० लिटर्स क्षमतेच्या (सिंगल लेअर) एकुण १०२५ नग सिंटेक्स टाक्या खरेदी करणेसाठी अंदाजे रुपये ४२,५००/- प्रती नग याप्रमाणे एकुण अंदाजे रुपये ४,३५,६२,५००/- मात्र व मा.जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मागणीप्रमाणे रक्कम रुपये १ (एक) कोटी असा एकुण अंदाजे रु. ५,३५,६२,५०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेसाठी ही विनंती.

**निर्णय क्र.६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्ह्यातील गावे तसेच वाड्या/ वस्त्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी प्रत्येकी ५००० लिटर्स क्षमतेच्या ISI Mark, थ्री लेअरच्या एकुण १०२५ नग पाण्याच्या टाक्या खरेदी करण्यासाठी थेट उत्पादक कंपनीकडून अथवा अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेसाठी वर्तमान पत्रात व संस्थान संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन पाण्याच्या टाक्या खरेदी करणेस तसेच, याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.५,६३,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**अहमदनगर जिल्ह्यातील ज्या गांवामध्ये पाण्याच्या टाक्या पुरविणे आहेत, त्या गांवाची यादी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात यावी व टाक्या खरेदीसाठी निविदेमध्ये गावे, वाड्या/ वस्त्यांवर पोहोचसह दर मागविण्यात यावेत.**

**सदरच्या पाण्याच्या टाक्या खरेदी करणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत त्वरीत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख/ विधी विभाग)

---

**विषय नं.०४** **रोखीने अथवा वस्तुरुपाने रुपये ५०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या भक्तांना संस्थानमार्फत श्री साईबाबांचा पॉकेट साईज, कृष्णधवल, दगडावर बसलेले बाबा थ्रीडी फोटो विनामुल्य भेट देणेकामी झालेला खर्च Publication Expenses खाते नांवे होणेबाबत.**

**प्रस्ताव -** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.०१.२०१२ निर्णय क्र.९१ नुसार रोखीने अथवा वस्तुरुपाने रुपये ५०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या भक्तांना संस्थानमार्फत श्री साईबाबांचा दगडावर बसलेले बाबा,कृष्णधवल पॉकेट साईज,थ्रीडी फोटो विनामुल्य भेट देणेत यावा असा निर्णय झाला होता.

सादर निर्णयाचा कार्यवाहीचा भाग म्हणून एक वर्षातील अशा भक्तांची संख्या २२०२० असल्याचे लेखाशाखेने दि.०९.०३.२०१२ चे पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार विहीत पद्धतीने दरपत्रके मागवून न्यूनतम दरधारक मे.साईप्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांना पुर्णांकित २५,००० फोटो छपाईचा जा. नं. एसएसएस/ वशी/ प्रकाशने/१९२८/२०१२ दि.३१.०७.२०१२ अन्वये कार्यादेश देणेत आला होता. त्यांचेकडून फोटोंचा पुरवठा पूर्ण झाला असून दि.०६.०९.२०१२ पासून निर्णयात ठरल्याप्रमाणे रु.५,००० किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची देणगी देणा-या भक्तांना विनामुल्य फोटो देणेत येत आहेत.

फोटो छपाईकामी रु.१,१८,७५०/- खर्च झाला आहे. तरी सदर रक्कम Publication Expenses खाते नांवे टाकणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.०५** **मे.अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांचे नांव प्रकाशने विभागाकडील प्रेसधारकांचे निवडक यादीतून कमी करणेस मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव -** संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो, दैनंदिनी व दिनदर्शिकांचे छपाईकामी नामांकित प्रेसधारकांची निवडक यादी (Short List) करणेत आली आहे. आज अखेर या यादीत ३० प्रेसधारक आहेत.

मे.अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांचे नावही सदर निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट आहे. त्यांना इकडील जा.नं.एसएसएस-वशी-प्रकाशने-६१८१ दि.०९.०३.२०१२.चा कार्यादेश दिला होता.

| अ.नं | पुस्तकांचा तपशिल | छपाई संख्या | मंजूर दर सर्व करांसह रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सत्चरित्र - हिंदी | १००००० | ४१.०३ |
| ०२ | श्री साई सत्चरित्र - कन्नड | २५००० | ४४.९५ |
| ०३ | श्री साई समर्थ चरित्र - इंग्रजी (श्रीमती झरीन) | ५००० | ९०.५८ |
| ०४ | श्री साई सत्चरित्र - ओरीया | १५००० | ३७.९३ |
| ०५ | एक फकीर की पाठशाला- हिंदी | ५००० | ३७.४८ |
| ०६ | श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान मराठी | ५००० | १३.१८ |
| ०७ | श्री साई स्तवन मंजरी -कन्नड | ५००० | २.९२ |

कार्यादेशातील शर्ती/अटी नुसार अंतीम प्रूफ तपासून दिले पासून तीन महीन्यात टप्याटप्प्याने छपाईचा पुरवठा पूर्ण करावयाचा होता. तथापि अंतीम प्रूफ तपासून दिलेपासून पाच महीने झाले तरी त्यांनी छपाईचा पुरवठा पूर्ण केलेला नाही. याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यांनी त्याचा समाधानकारक खुलासा केलेला नाही. त्यांची मोठे काम करण्याची क्षमता नसल्याने, संस्थान कामाची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांचे नांव प्रकाशने विभागाकडील निवडक प्रेसधारकाचे यादीतून (Short List) कमी करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०६** **नवीन प्रेसधारकांचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव -** मे.बळवंत प्रिंटर्स प्रा.लि.,पुणे यांनी दि.०८.०९.२०१२ चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो/श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीत नाव समाविष्ट करुन घेणे विषयी विनंती पत्र दिले आहे.

मे.बळवंत प्रिंटर्स प्रा.लि.,पुणे यांनी यापूर्वी पुस्तके/फोटो,दैनंदिनी छपाईची कामे उत्कृष्ट प्रकारे दिलेल्या कालावधीत पूर्ण केली आहेत. परंतु मध्यंतरी सन २००७ पासून ते दरपत्रक भरत नसल्यामुळे त्यांचे नांव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०३.२००९ चे सभेतील निर्णय क्र.२५० नुसार निवडक प्रेसधारकांचे यादीतून कमी करण्यात आले होते.

पुस्तके/ फोटो, दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाई कामासाठी संस्थान अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीत नाव समाविष्ट करणेसाठी सोबतचे Check List नुसार पात्र आहेत. त्यांची वार्षिक उलाढाल ही २ कोटीच्या वर आहे.

पुस्तके/ फोटो/ श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाईकामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ठरवून दिलेल्या निकषानुसार ३० अधिकृत प्रेसधारकांची यादी करण्यात येऊन त्यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येतात निम्नतम दर असणा-या प्रेसधारकांना छपाई कामाचे आदेश देऊन काम करुन घेण्यात येते.

तथापि अधिकृत यादीतील बरेचसे प्रेसधारक दरपत्रक भरीत नाहीत. त्यामुळे नवीन प्रेसधारकांची नांवे अधिकृत यादीत घेणे आवश्यक आहे.

सबब छपाईकामी स्पर्धात्मक दर मिळणेकामी उपरोक्त प्रेसचे नाव अधिकृत यादीत घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०७** **संस्थान निर्मित साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीसीडी व ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी निर्मिती कामाचे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.७१ अन्वये मे.सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो/ छपाई करणे, संस्थान प्रकाशित सी.डी. निर्मिती करणे व विक्री किंमती ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यात सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ चा नं. १७ ठ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार यातील तरतुदीनुसार भक्तांची गैरसोय होऊ नये, वेळोवेळी साठा उपलब्ध व्हावा याकरीता खालील सुधारित पद्धत अवलंबणे बाबत विचार करण्यात आलेला आहे.

संस्थान निर्मित खालील व्हीडीओ व डीव्हीडीचा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. सोनी कंपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने त्यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात यावे व त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावेत. असे ठरले आहे. त्यानुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.१०.१०.२०१२ चे पत्रातील दराने अपेक्षित खर्च, शिल्लक साठा प्रस्तावित परिमाण यांचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | एक्साईज व्हॅटसह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान देणगी मुल्य रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीडीओ सी.डी. (२ सी.डी.चा संच) | २९७९ | ३ | १५,००० संच | ३८.१२ | ५७१८००.०० | ७५.०० |
| ०२ | ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी (एका नगाची डीव्हीडी.) | ३७९९ | ४ | १५,००० नग | ४८.०५ | ७२०७५०.०० | १००.०० |
| | | | | | **एकूण रु.** | **१२,९२,५५०.००** | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे व्हीडीओ व डीव्हीडी यांची पुनर्निर्मिती मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस रु.१२,९२,५५०/- (अक्षरी रुपये - बारा लाख, ब्यान्नव हजार, पाचशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे. कंपनीचे शर्ती अटीनुसार कंपनीस अग्रीम रक्कम द्यावी लागते.

सबब M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून प्रस्तावित काम करुन घेणेस त्याकामी येणारे रु.१२,९२,५५०/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निर्मित साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीडीओ (२ सी.डी.चा संच) व ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी (एका नगाची) यांचा साठा संपुष्टात आल्याने साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीडीओ (२ सी.डी.चा संच) १२००० संच, ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी (एका नगाची) ११००० नग निर्मितीचे काम M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून त्वरीत करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.०९,८५,९९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०८** **श्री साई चरित अनुगायन प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव -** दि.२५.१०.२०१२ च्या अर्जाने श्री जगदिश स्वरुप, नवी दिल्ली यांनी लिहीलेले श्री साई चरित अनुगायन-हिंदी पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी संस्थानने केलेल्या कार्यवाहीबाबत माहितीचे अधिकारात माहिती मागितली आहे. पुस्तकाचे मॅन्युस्क्रीप्ट आणि मा. महोदय, डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, माजी विश्वस्त यांचे शिफारशीचे पत्र श्री जगदिश स्वरुप यांनी सन २००९ साली सादर केले होते. सदर पुस्तकाचे प्रकाशनासाठी सर्व हक्क संस्थानला देण्याची तयारी दर्शविली होती. सदर पुस्तकाचे प्रकाशन संस्थानमार्फत व्हावे अशी विनंती त्यांनी केली होती.

मा.व्य.समितीचे दि.०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्र.३५५ नुसार सदर पुस्तक मा.विश्वस्तांना अभ्यासासाठी पाठवून त्यांचेकडून अभिप्राय प्राप्त झालेनंतर छपाईबाबत उचित निर्णय घ्यावा, असे ठरले होते. त्यानुसार सदर पुस्तकाच्या प्रती मा.विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर व मा.श्री.खांबेकर यांना अभ्यासासाठी देण्यात आल्या होत्या.

सदर पुस्तकाबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर व श्री.खांबेकर यांचेकडून कोणत्याही प्रकारचा अहवाल इकडील कार्यालयाकडे प्राप्त न झाल्याने सदर विषयावर कोणत्याही प्रकारचा निर्णय होऊ शकला नाही.

प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त निर्णयानुसार सदर पुस्तकाचे प्रकाशन संस्थानमार्फत करता येणार नाही असे श्री जगदिश स्वरुप, नवी दिल्ली यांना कळविता येईल.

**निर्णय क्र.६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०९** **साईआश्रम १ व २ करिता आवश्यक फर्निचर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव -** दि.०६.०४.२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये साईआश्रम १/२ इमारतींमध्ये आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१८,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा लाख) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. परंतू बांधकाम विभागामार्फत मे.शर्मा फर्निचर, रेवारी, हरियाणा यांचेकडून साईआश्रम १ व २ करिता देणगी स्वरुपात खुर्च्या मिळणार असल्याने एकुण फर्निचर खरेदीतून खुर्च्यांची मागणी वगळता इतर फर्निचर (टेबल व कपाटे) खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव साईआश्रम विभागाने सादर केला होता.

त्यानुसार दि.३१.०७.२०१२ रोजीच्या दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात फर्निचर खरेदीबाबत जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करुन दि.०१.०८.२०१२ ते दि.११.०८.२०१२ अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथे निविदा विक्री करण्यात येऊन सबंधित कंपनींच्या अधिकृत वितरकांकडून सिलबंद निविदा मागणी करण्यात आल्या होत्या. सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५.०८.२०१२ होती. त्यानुसार मुदतीअंती प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ७५३२/१४.०८.२०१२ |
| ०२. | मे.श्रद्धा ट्रेडर्स, अहमदनगर | ७५३३/१४.०८.२०१२ |
| ०३. | मे.खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | ७५३४/१४.०८.२०१२ |
| ०४. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | ७५३५/१४.०८.२०१२ |

उपरोक्त प्राप्त निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०९.२०१२ रोजीचे सभेत उघडून निवदाधारकांशी चर्चा वाटाघाटी करण्यात आल्या.

त्यानुसार मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांचे दर न्युनतम असल्याने दि.१५.०९.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३४ नुसार त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

मात्र सदरचा निर्णय अंतिम मंजुरीकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगबाद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे, त्यामुळे सदर निर्णयाची प्रत अद्याप खरेदी विभागास प्राप्त झालेली नाही, त्यामुळे मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांना अद्याप पुरवठा आदेश दिलेला नाही.

मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.०२.११.२०१२ रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविलेले आहे, आम्ही दि.१३.०८.२०१२ रोजी दरपत्रक सादर केलेले होते, मात्र अद्याप आम्हांस आपणामार्फत पुरवठा आदेश प्राप्त झालेला नाही. दरपत्रक देऊन जवळपास तीन महिने झालेले आहेत, त्यामुळे सध्या बाजारपेठेत क्रुड ऑईल व इतर साहित्याचे दर २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढलेले आहेत. परिणामी आमचे कंपनीने देखील (गोदरेज) साहित्याचे दर वाढविलेले आहेत, त्यामुळे आम्ही चर्चा वाटाघाटीत देऊ केलेल्या दरामध्ये माल पुरविण्यास असमर्थ असून, सोबत दिलेले सुधारीत दराप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी विनंती केलेली असून सोबत सुधारीत दरांचा पत्रक दिलेले आहेत.

त्यानुसार झालेल्या चर्चा वाटाघाटीचा तुलनात्मक तपशिल तसेच मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांनी दि.०२.११.२०१२ रोजीचे पत्रासोबत दिलेले सुधारीत दरांचा तपशिल सोबतच्या परिशिष्ठामध्ये जोडलेला आहे.

मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर यांनी देऊ केलेले सुधारीत दर हे चर्चा वाटाघाटीचे दरांपेक्षा जास्त आहेत, त्यापेक्षा इतर निविदाधारकांचे दर हे कमी आहेत. त्यामुळे मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर यांनी केलेल्या मागणीप्रमाणे कार्यवाही करता येणे शक्य नाही.

तरी सदर खरेदीकामी फेरनिविदा मागणी करावी अगर द्वितीय, तृतीय न्युनतम दरधारकास विचारणा करावी, याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम १ व २ करिता आवश्यक असलेले फर्निचर खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे व्दितीय न्युनतम दरधारक यांना चर्चा/वाटाघाटीचे वेळी दिलेल्या दरामध्ये माल पुरविणेस तयार असलेबाबत विचारणा करण्यात यावी व ते पुरवठा करण्यास तयार नसल्यास, विहीत पध्दतीने फेर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१०** **सन २०१२-१३ (नोव्हें-१२ ते मार्च-१३) कॅन्टीन विभागाकरीता खरेदी करावयाचे बिस्कीटाचे सुटीबाबत मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव व मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांचेकडील दि.१९.११.२०१२ रोजीचे पत्रासंदर्भात.**

**प्रस्ताव -** मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी व मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव यांनी त्यांचेकडील दि.१९.११.२०१२ रोजीचे पत्रान्वये संस्थानचे जाहिरातीनुरुप माहे नोव्हेंबर-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर अनुक्रमे पारले व सनफिस्ट कंपनीचे बिस्कीटे पुरविणेकामी सर्व कागदपत्रानिशी टेंडर सादर केलेले आहे. त्यानुसार आम्हांला दि.१२.११.२०१२ रोजी त्रीसदस्य समितीचे सभेसमोर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, त्या प्रक्रियेत आम्ही समक्ष हजर राहुन कंपनीदरात १०% सुट देण्याचे लिहुन दिले आहे. त्याऐवजी आम्ही कंपनी दरावर १२.२५% सुट देण्यास तयार आहोत, असे कळविले आहे.

सन २०१२-१३ चे माहे नोव्हेंबर-१२ ते मार्च-२०१३ अखेर पाच महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.२५.०८.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७१९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६.१०.२०१२ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दि.२२-२३.१०.२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात तसेच संस्थाने वेबसाईटवर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन दि.२२.१०.२०१२ ते दि.३१.१०.२०१२ अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथून निविदा विक्री करण्यात आली आहे. मुदतीअंती शिर्डी कार्यालयातून ५३ व मुंबई कार्यालयातून ०८ अशा एकुण ६१ निविदांची विक्री झालेली होती. निविदा व नमुने स्विकारण्याची अंतिम दि.०१.११.२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीअंती ५० निविदा व त्यांचे मालाचे नमुने प्राप्त झालेले आहेत.

त्यामध्ये उपरोक्त कालावधीत कॅन्टीन विभागाकरिता पाच प्रकारचे (ग्लुकोज लहान, ग्लुकोज मोठा, स्नॅक्स, नमकीन व मारी) आवश्यक बिस्कीटे खरेदीसंदर्भात प्राप्त निविदाधारकांचे लिफाफा नं.०२ दि.०२.११.२०१२ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून त्यामध्ये दिलेल्या कागदपत्राची पडताळणी संस्थानचे लेखाशाखा व संस्थानने नियुक्त केलेल्या प्रि ऑडीटर यांचे मार्फत करण्यात आली. निविदाधारकांचे नमुन्यांमधून योग्य नमुने निवडणेकामी गठीत केलेल्या तज्ञ समितीच्या सदस्यांनी दि.०३.११.२०१२ रोजी खालीलप्रमाणे ४ निविदाधारकांच्या बिस्कीटाच्या नमून्यांची निवड केलेली आहे.

१. मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी - पारले
२. मे.दगडूराम पिरचंद, श्रीरामपुर - ब्रिटानिया
३. मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे - ब्रिटानिया
४. मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव - सनफिस्ट

दि.१२.११.२०१२ रोजी झालेल्या त्रीसदस्य समितीचे सभेत उपरोक्त चारही निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ (मुळ निविदा) उघडून त्यांचेशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आली, त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ. नं. | निविदाधारकांचे नांव | जात/प्रकार/ ब्रॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल व्हॅटसह | चर्चा वाटाघाटीनंतरचे दर प्रती क्विंटल व्हॅटसह |
|---|---|---|---|---|
| १ | मे.अग्रवाल एजसी, साकुरी | पारले | कंपनी दरावर ३%सुट + १२.५% व्हॅट | कंपनी दरावर १० % सुट + १२.५% व्हॅट |
| २ | मे.दगडूराम पिरचंद, श्रीरामपुर | ब्रिटानिया | कंपनी दरावर २%सुट + १२.५% व्हॅट | कंपनी दरावर ८.५० % सुट + १२.५% व्हॅट |
| ३ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | ब्रिटानिया | प्रत्येक प्रकारचे बिस्कीटासाठी वेगळे दर दिले होते. | कंपनी दरावर १२.२५ % सुट + १२.५% व्हॅट |
| ४ | मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव | सनफिस्ट | प्रत्येक प्रकारचे बिस्कीटासाठी वेगळे दर दिले होते. | कंपनी दरावर १० % सुट + १२.५% व्हॅट |

वरीलप्रमाणे चर्चा वाटाघाटीमध्ये मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे यांनी सर्व प्रकारच्या बिस्कीटासाठी कंपनी दरावर १२.२५% सुट दिली त्यामुळे त्यांचे दर न्युनतम असल्याने जा.क्र. एसएसएस/वशी/खरेदी-प्रसाद/३७२४/२०१२ दि.१९.११.२०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला असून, त्यांचेकडून बिस्कीटाचा पुरवठा चालु झाला आहे.

तरी सदर विषयाबाबत निर्णय होणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१२-१३ (नोव्हें-१२ ते मार्च-१३) कॅन्टीन विभागाकरीता बिस्कीटे खरेदी करावयाची प्रक्रिया पुर्ण झालेली असून न्युनतम दरधारकास पुरवठा आदेशही देण्यात आलेला असल्याने मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी व मे.कोठारी ब्रदर्स, कोपरगांव यांच्या अर्जाचा विचार करता येणार नाही, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक- खरेदी विभाग)

---

**विषय नं.११** **सन २०१३-१४ या वर्षाकरीता कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी खरेदीबाबत.**

**प्रस्ताव -** सन २०१३-१४ सालामध्ये संस्थानचे विविध विभागांस दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेकामी जा.क्र.३६८८ दि.१४.१२.२०१२ अन्वये परिपत्रकद्वारे सर्व विभागांकडून त्यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरीची मागणी खरेदी विभागाकडे नोंदविणेबाबत कळविले होते. ज्या विभागांनी आवश्यक स्टेशनरीची मागणी नोंदविली आहे. त्याबाबतचे परिशिष्ठ सोबत जोडले आहे. सदर खरेदीस अंदाजे रु.२४,५०,०००/- (अक्षरी रुपये चोवीस लाख पन्नास हजार) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १७ मध्ये समितीचे कर्तव्ये व अधिकार दिलेले असून त्यातील पोटकलम २ (झ) तरतुदीनुसार सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद केलेले आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

कार्यालयीन व संगणक स्टेशनरी साहित्य तसेच झेरॉक्स मशिनसाठी आवश्यक असणारे टोनर, इंक,ओपीडी ड्रम व डेव्हलपर हे (श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल वगळता) निविदेमध्ये समाविष्ठ करुन एकत्रित निविदा मागणी करणेत येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २०१३-१४ साठी आवश्यक असणारे कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी वार्षिक साहित्याचे खरेदीसाठी अंदाजे रक्कम रु.२४,५०,०००/- (अक्षरी रुपये चोवीस लाख पन्नास हजार) मात्र पर्यंत अपेक्षित खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेस मान्यता मिळणेस विनंती. प्राप्त निविदाधारकांशी मा.व्यवस्थापन समितीचे (त्रीसदस्य) सभेमध्ये चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे वार्षिक खरेदीस येणारे खर्चास व कार्यवाहीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ करीता आवश्यक असणारी कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी (वार्षिक साहित्य) खरेदीकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थान संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस, तसेच सदरचे खरेदीसाठी येणाऱ्या रक्कम रु.२४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**उपरोक्त खरेदीकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक- खरेदी विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.१२** **सन २०१३-१४ (माहे एप्रिल-१३ ते मार्च-१४) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी किराणा माल व इतर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव -** मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार माहे ऑक्टोबर - २०१२ ते मार्च-२०१३ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सहा महिने खरेदी करावयाच्या किराणा मालाची मुदत माहे मार्च-२०१३ अखेर संपत आहे. त्यामुळे पुढील वर्षा २०१३-१४ करिता (माहे एप्रिल-१३ ते मार्च-१४) खरेदी करावयाच्या किराणा मालाबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन (त्रीसदस्य) समिती पुढे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने, सबंधीत विभागांना उपरोक्त कालावधीत दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल व त्याबाबतचे खर्चाची सविस्तर मागणी सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सबंधीत विभागांनी त्यांचेकडील मागणी कळविलेली आहे.

सन २०१३-१४ करिता (माहे एप्रिल-२०१३ ते मार्च-२०१४) खरेदी करावयाच्या किराणा मालाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

(अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने करणेची खरेदी...

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कोपरगांव, राहाता येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतून जाहीर लिलावाने खरेदी करणेत येतो. संस्थानतर्फेसाजरे होणारे उत्सव तसेच सुटयांमुळे होणारे गर्दीच्या काळात साईभक्तांची संख्या वाढल्यास नाशिक येथून भाजीपाला खरेदी करणेत येतो. सन २०१३-१४ (माहे एप्रिल-२०१३ ते मार्च-२०१४) मध्येही कृषी उत्पन्न समितीचे कोपरगांव, राहाता इत्यादी ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार नाशिक व इतर ठिकाणाहून

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



भाजीपाला खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रु.२,००,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

(ब) जाहिर निविदा मागवून करावयाची खरेदी..

सन २०१३-१४ (माहे एप्रिल-२०१३ ते मार्च-२०१४) करिता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू आटा, हरबरा इ.धान्य तसेच तांदुळ, तूप, तेल, साखर, चहा, दूध विविध प्रकारचा किराणा माल, मसाला पदार्थ, प्लॅस्टिक पिशवी, पेपरकप, बिस्कीटे, मिनरल वॉटर इ. मालाचा तपशीलवार तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. खरेदी करावयाच्या मालाची अंदाजे मागणी दाखवितांना मागील वर्षाच्या प्रसादालय व कॅन्टीन विभागाकडील प्रत्यक्ष वापरण्यांत आलेल्या मालाची आकडेवारी दिलेली असून त्यात भक्तनिवासस्थानांमध्ये करण्यांत येणारी प्रसाद भोजन व्यवस्था, श्री साईबाबा रुग्णालय विभागात रुग्णांना देण्यात येणारे जेवण तसेच गर्दीचे कालावधीमध्ये तात्पूरत्या स्वरुपात उभारण्यांत येणारे स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष यांचाही समावेश करण्यात आलेला असल्याने मालाची २५ ते ३०% वाढ गृहीत धरलेली आहे. तसेच श्री साईभक्तांना प्रसादरुपाने अल्पदरात नाष्टा व प्रसादलाडू देण्यात येतो, त्यांचे विक्रीमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ विचारात घेऊन त्यासाठी आवश्यक असणा-या किराणा मालाची मागणी वाढविणेत आलेली आहे. जाहिर निविदा मागवून खरेदी करावयाच्या मालाचा व त्यासाठी आवश्यक खर्चाच्या रकमेचा तपशील सोबतच्या परिरशिष्टात दिला आहे. तरी परिशिष्टात नमूद केलेला किराणा माल निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.७३,१४,६१,९००/- (अक्षरी रुपये त्र्याहत्तर कोटी चौदा लाख एकसष्ठ हजार नऊशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सन २०१३-१४ (माहे एप्रिल-२०१३ ते मार्च-२०१४) साठी वार्षिक उलाढालीबाबत खालीलप्रमाणे निकष ठरवून निविदा मागविता येतील.

| अ.नं. | तपशिल | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१. | भाजीपाला | २,००,००,०००/- | मोंढयावरुन खरेदी |
| ०२. | गहुआटा, हरबरा इ. | ४,३८,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०३. | साखर | ६,८०,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०४. | किराणामाल- दाळी, कडधान्ये व इतर | १४,५६,५८,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०५. | तांदुळ | ३,६३,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०६. | गावरान तूप | २७,५४,००,०००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०७. | खादयतेल (सुर्यफूल) | ४,५०,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०८. | चहा व कॉफी | ४३,५०,०००/- | रु.१०,००,०००/- |
| ०९. | गाय दुध टोण्ड | ४,०५,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| १०. | बिस्कीटे | १,६२,५०,०००/- | रु.२०,००,०००/- |
| ११. | पेपरकप | २,४०,००,०००/- | रु.२०,००,०००/- |
| १२. | ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी | १,१७,४३,९००/- | रु.२०,००,०००/- |
| १३. | मिनरल वॉटर | २,०४,६०,०००/- | रु.२०,००,०००/- |

साधारणतः फेब्रवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयात वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिद्ध करावी लागेल. जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १० ते १२ दिवस कोरे निविदा फॉर्म्स विक्री केले जाऊन त्यानंतर पुढील ०५ दिवसाचे आत नमुने व सिलबंद निविदा ०२ लिफाफा पध्दतीने स्विकारल्या जातील. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात मा.व्यवस्थापन समिती (त्रीसदस्य) सभेत निविदेमधील लिफाफा नं.२ उघडून कागदपत्रांची तपासणी करुन नमुने निवडण्यात येतील व मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवडयात कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या व निवडणेत आलेल्या नमुन्यांच्या निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समिती (त्रीसदस्य)समोर चर्चा-वाटाघाटी साठी निमंत्रीत करुन अंतिम निर्णय घेऊन मंजूर मालाचे निविदाधारकांना पुरवठा आदेश देता येईल. एप्रिल-२०१३ पासून नवीन मालाचा पुरवठा सुरु होईल.

तरी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात 'अ' व 'ब' मध्ये नमुद केल्याप्रमाणे संस्थानचे प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी सन २०१३-१४ (एप्रिल-१३ ते मार्च -२०१४) या कालावधीसाठी आवश्यक असलेला किराणा व इतर माल खरेदी करणेस तसेच, त्यासाठी येणाऱ्या अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.७५,००,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**विहीत पध्दतीने सदरची खरेदी करण्यासाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत यावी. निविदा फॉर्ममध्ये पुर्वीच्या अटी कायम ठेवण्यात येऊन, विहीत प्रमाणपत्रासह आवश्यक त्या मालासाठी Agmark, ISO इत्यादी बाब नमुद करावी. तसेच, खरेदी करावयाच्या किराणा मालाची निवड समितीमार्फत निवड केली जाते, त्याकरीता नामांकित**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**कंपनीचे व उत्तम दर्जाचे (उदा.कॅप्टनकुक, अन्नपुर्णा, टाटा इ.) असा उल्लेख निविदेमध्ये करावा. त्याचबरोबर पुरवठादारांना निविदेसोबत आवश्यक त्या मालासाठी कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यास कळविणेत यावे. उपरोक्त खरेदीकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक- खरेदी विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.१३** **पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडील प्राप्त गावरान तुपाबाबत.**

**प्रस्ताव -** सन २०१२-१३ चे माहे नोव्हेंबर-१२ ते मार्च-२०१३ अखेर पाच महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.२५.०८.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७१९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६.१०.२०१२ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दि.२२-२३.१०.२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन दि.२२.१०.२०१२ ते दि.३१.१०.२०१२ अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथून निविदा विक्री करण्यात आली आहे. मुदतीअंती शिर्डी कार्यालयातून ५३ व मुंबई कार्यालयातून ०८ अशा एकुण ६१ निविदांची विक्री झालेली होती. निविदा व नमुने स्विकारण्याची अंतिम दि.०१.११.२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीअंती ५० निविदा व त्यांचे मालाचे नमुने प्राप्त झालेले आहेत.

त्यामध्ये उपरोक्त कालावधीत आवश्यक ४५०० क्विंटल गावरान तुप खरेदीसंदर्भात प्राप्त ०९ निविदाधारकांचे लिफाफा नं.०२ दि.०२.११.२०१२ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून त्यामध्ये दिलेल्या कागदपत्राची पडताळणी संस्थानचे लेखाशाखा व संस्थानने नियुक्त केलेल्या प्रि ऑडीटर यांचे मार्फत करण्यात आली. त्यामध्ये कागदपत्रांची पुर्तता न केलेल्या ४ निविदाधारकांनां अपात्र ठरवित आले. उर्वरीत ५ निविदाधारकांचे नमुन्यांमधून योग्य नमुने निवडणेकामी गठीत केलेल्या तज्ञ समितीच्या सदस्यांनी दि.०३.११.२०१२ रोजी खालीलप्रमाणे ३ निविदाधारकांच्या गावरान तुपाची निवड केलेली आहे.

१. मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर — प्रभात ब्रॅण्ड
२. मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी — सोनाई ब्रॅण्ड
३. मे.पंचामृत डेअरी, मुंबई — पंचामृत ब्रॅण्ड

उपरोक्त निवडलेल्या नमुन्यातील प्रत्येकी ५०० मिली तुप जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक येथे तपासणीकामी दि.०७.११.२०१२ रोजी पाठविण्यात आले आहेत.

दि.०८.११.२०१२ रोजी सायं. ०५.०० वा. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे त्रीसदस्य समितीचे सभेत गावरान तुपासाठी निवडण्यात आलेल्या नमुन्यांच्या तीन निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ (मुळ निविदा) उघडून त्यांचेशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आली, त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. नं. | निविदाधारकांचे नांव | जात/प्रकार/ ब्रॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल व्हॅटसह | चर्चा वाटाघाटीनंतरचे दर प्रती क्विंटल व्हॅटसह |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | रु.२४,८८५/- | रु.२४,६००/- |
| ०२. | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | रु.२४,६७५/- | रु.२४,६००/- |
| ०३. | मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर | प्रभात | रु.२७,३००/- | रु.२४,६००/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये तीन्ही पुरवठाधारकांचे चर्चा वाटाघाटीनंतरचे दर रु.२४,६००/- प्रती क्विंटल (व्हॅटसह) समान आलेले आहेत. त्यामुळे एकुण खरेदी करावयाचे ४५०० क्विंटल गावरान तुप तीन्ही पुरवठाधारकांना प्रत्येकी १५०० क्विंटल प्रमाणे गावरान तुप पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत यावा, असे ठरले. त्यानुसार सबंधीतांना पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

तीन्ही पुरवठाधारकांकडून गावरान तुपाचा पुरवठा सुरु झालेला आहे, त्यानुसार मे..पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून दि.१८.११.२०१२ रोजी १००.०५ क्विंटल (६६७ डबे) पंचामृत गावरान तुपाचा पुरवठा केलेला आहे. सदरचे तुपापैकी २९.२५ क्विंटल (१९५ डबे) भांडार विभागामार्फत प्रसादालयास दि.२३.११.२०१२ वापरासाठी देण्यात आलेले होते.

मात्र प्रसादालय विभागाने दि.२४.११.२०१२ रोजी पंचामृत गावरान तुपापासून बंदी तळणेचे काम करत असतांना काही प्रमाणात धुर निघत होता तसेच ते फेसाळत होते, या तुपाचा जास्त प्रमाणात सुगंध येत नव्हता. त्यामुळे सदर तुपाचे शुद्धतेबाबत शंका वाटते असे कळविलेले आहे. त्यामुळे प्रसादालय विभागामार्फत दि.२४.११.२०१२ पासून पंचामृत गावरान तुपाचा वापर बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून गावरान तुपाचा होणारा पुरवठा बंद करण्यात आलेला आहे. तसेच पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून दि.१८.११.२०१२ रोजी प्राप्त गावरान तुपापैकी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



७०.८० क्विंटल (४७२ डबे) तुप भांडार विभागाकडे शिल्लक आहे. तसेच त्यांनी पुरविलेल्या गावरान तुपाचे बिल अद्याप प्रलबिंत आहे.

मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२८.१२.२०१२ रोजीचे पत्रान्वये इतर मुद्दयांसोबत त्यांनी पाठविलेल्या तुपाचा लवकरात लवकर वापर करावा, जेणेकरुन त्याची गुणवत्ता टिकून राहील शिवाय फ्रेश बॅचच्या तुपाच्या लाडूचे स्वाद व गुणवत्ता टिकूनन राहील, तसेच सदर तुपाबाबत काही शंका असेल तर पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई हे तुप बदलुन देण्यास तयार असलेबाबत नमुद केलेले आहे.

तरी मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचेकडून प्राप्त तुपापैकी भांडार विभागाकडे शिल्लक असलेले ७०.८० क्विंटल (४७२ डबे) गावरान तुपाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचे मागणी पत्रानुसार संस्थानचे हक्कांना बाधा येऊ न देता, शिल्लक असलेले ७०.८० क्विंटल (४७२ डबे) गावरान तुप पंचनामा करुन त्वरीत परत करण्यात यावे व त्याबदली त्यांचेकडून तेवढेच ७०.८० क्विंटल (४७२ डबे) गावरान तुप बदलुन घेण्यात यावे.**

**मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांनी बदलुन दिलेल्या गावरान तुपाची मे.अश्वमेध इंजिनीअर्स, नाशिक या लॅब्रॅरेटरीमधून तपासणी करुन घेण्यात यावी व तपासणीअंती सदरचे गावरान तुप वापरण्यास योग्य असलेबाबत संस्थान सल्लागार ॲड.श्री.पी.बी. सोबले यांचे अभिप्राय घेऊन, सदर गावरान तुपाचा वापर करावा. मात्र बदलुन घेण्यात येणारे गावरान तुप स्विकारते वेळी मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचे प्रतिनिधीचे तसे लेखी पत्र घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४** **सन २०१३-१४ करीता जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईबाबत.**

**प्रस्ताव -** सन २०१३-१४ मध्ये संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक प्लॅस्टिक फाईल खरेदीबाबत प्रशासन शाखा- वशी-०१ यांनी जा.क्र.३४१३/दि.२४.११.२०१२ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांकडून माहिती मागिविलेली होती. तसेच विभागांसाठी आवश्यक रजिस्टर, फॉर्म्स व संगणक प्रि-प्रिंटेड छपाईकामी सर्व विभागांकडून इकडील जा.क्र.३६८७/दि.१४.१२.२०१२ चे परिपत्रकान्वये अन्वये माहिती मागविणेत आलेली होती.

मुदती अखेर विभागाकडून आलेल्या मागणीबाबतचे परिशिष्ट सोबत जोडलेले आहे. त्यानुसार विभागवार करावयाचे जनरल व संगणक छपाईकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येईल.

| अ. नं. | विभागाचे नांव | जनरल छपाई खर्च | प्रि-प्रिंटेड संगणक छपाई खर्च | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रशासन शाखा | ६,१३,४४०/- | - | ६,१३,४४०/- |
| ०२. | लेखाशाखा | १,७६,६००/- | १८,७५,०००/- | २०,५१,६००/- |
| ०३. | साईप्रसाद निवासस्थान विभाग | १०,०००/- | १,५०,०००/- | १,६०,०००/- |
| ०४. | नविन भक्तनिवासस्थान विभाग | २,१०,०००/- | २,७०,०००/- | ४,८०,०००/- |
| ०५. | द्वारावती विभाग | १२,०००/- | ७५,०००/- | ८७,०००/- |
| ०६. | वाहन विभाग | १२,१५०/- | - | १२,१५०/- |
| ०७. | विद्युत विभाग | ४८,६००/- | - | ४८,६००/- |
| ०८. | खरेदी विभाग | ७,६००/- | - | ७,६००/- |
| ०९. | भांडार विभाग | २,५००/- | - | २,५००/- |
| १०. | प्रसादालय विभाग | ८८,४४०/- | ४६,००,०००/- | ४८,८८,४४०/- |
| ११. | कॅटीन विभाग | २८,२८,१५०/- | ६,००,०००/- | ३४,२८,१५०/- |
| १२. | ध्वनीक्षेपण विभाग | ५००/- | - | ५००/- |
| १३. | सरंक्षण विभाग | १०,०००/- | - | १०,०००/- |
| १४. | जनसंपर्क कार्यालय | ३,२००/- | ५०,०००/- | ५३,२००/- |
| १५. | आरोग्य विभाग | १,७६०/- | - | १,७६०/- |
| १६. | पाणी पुरवठा विभाग | ६,५८०/- | - | ६,,५८०/- |
| १७. | बांधकाम विभाग | ४,७८०/- | - | ४,७८०/- |
| १८. | बगीचा विभाग | २,०००/- | - | २,०००/- |
| १९. | माहिती अधिकार विभाग | ४५०/- | - | ४५०/- |
| २०. | माहिती तंत्रज्ञान विभाग | १,२००/- | - | १,२००/- |
| २१. | साईआश्रम -१ | २,९७,५२०/- | ३,७५,०००/- | ६,७२,५२०/- |
| २२. | साईआश्रम - २ | ५३,५२०/- | ४५,०००/- | ९८,५२०/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | मंदिर विभाग | ३,२००/- | - | ३,२००/- |
| २४. | प्रकाशने विभाग | १,७४०/- | - | १,७४०/- |
| २५. | जनरल छपाई | ५,१०,५००/- | - | ५,१०,५००/- |
| | एकुण रक्कम रुपये | ४९,०६,४३०/- | ८०,४०,०००/- | १,२९,४६,४३०/- |
| | पुर्णांकित अंदाजे एकुण रक्कम रु. | | | १,२९,५०,०००/- |

तरी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे छपाईकामी पुर्णांकित रक्कम रु.१,२९,,५०,.०००/- मात्र खर्च येईल. उपरोक्त खर्च हा अंदाजे नमुद केलेला आहे. मागील छपाई ही सन २०११-१२ मध्ये करण्यात आलेली होती. सदर छपाईस रक्कम रु.६५,५०,०००/- मात्र खर्चास मंजुरी देण्यात आलेली होती. सन २०१२-१३ मध्ये मागील छपाईचा साठा शिल्लक असल्यामुळे छपाई करण्यात आलेली नव्हती. सन २०१३-१४ चे छपाईमध्ये साईआश्रम ०१, ०२ विभागाचे छपाई खर्चाचा समावेश आहे. तसेच कॅन्टीन विभागाने ५०० रुम परिसर, द्वारावती परिसरामध्ये जादा कॅन्टीन सुरु केलेले आहेत, त्याही छपाईचे खर्चाचा समावेश केलेला आहे. त्यामुळे सन २०१३-१४ चे छपाईच्या खर्चाची रक्कम तुलनेने जादा दिसत आहे. वरीलप्रमाणे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळालेनंतर जनरल व प्रि-प्रिंटेड संगणक छपाईसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करुन छपाई करुन घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे छपाई करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१,२९,५०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकोणतीस लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ करीता संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक असणारे जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई विहीत पध्दतीने करुन घेणेकरीता वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व सदरचे छपाईसाठी येणाऱ्या रक्कम रु.१,२९,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**सदरची छपाई करणेसाठी येणाऱ्या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.१५** **मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे दि.२१.०१.२०१३ चे पत्राबाबत.**

**प्रस्ताव -** सन २०१२ - १३ (नोव्हें.-१२ ते मार्च-१३) साठी प्रसादालय विभागासाठी ९००० क्विंटल गहु आटा खरेदीकामी मे.हिरालाला चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे सम्राट कंपनीचे गहु आट्याचे प्रति क्विंटल (व्हॅटसह) दर रु.२,०१०/- (अक्षरी रुपये दोन हजार दहा) न्युनतम असल्याने मान्य करण्यात आले, व त्यांना इकडील जा.क्र.एसएसएस/वशी/खरेदी-प्रसाद/३७३०/२०१२ दि.१९.११.२०१२नुसार खालील प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | मालाचा तपशिल | मागणी क्विंटलमध्ये | दर प्रति क्विंटल व्हॅटसह | एकुण रक्कम | ५% सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | गहु आटा - सम्राट | ९,००० | २,०१०/- | १,८०,९०,०००/- | ९,०४,५००/- |
| ०२. | तांदुळ - नवीन सोना मसुरी | ३,५०० | २४४१/- | ८५,४३,५००/- | ४,२७,१७५/- |
| ०३. | मसुर - आखखा | १६० | ४,१५१/- | ६,६४,१६०/- | ३३,२०८/- |
| | एकुण रक्कम रुपये | | | २,७२,९७,६६०/ | १३,६४,८८३/- |

पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांचेकडून दि.२७.११.२०१२ रोजी १०० क्विंटल गहु आट्याचा पुरवठा झालेला आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचे दि.२२.११.२०१२ रोजीचे पत्रामध्ये पुरवठा आदेशातील सम्राट ब्रॅण्ड गहु आटा मिल मालक देण्यास तयार नसल्याने सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत असल्याने आम्ही सम्राट ब्रॅण्डचा गहु आट्याचा पुरवठा करु शकत नाही. आपल्या टेंडर फॉर्ममध्ये ४ प्रकारचे गहु आट्याची मागणी केली होती, त्यातील कॅप्टन कुक ब्रॅण्डचा गहु आटा हा बेस्ट क्वॉलिटीचा मी त्याच दरात प्रति क्विंटल रु.२,०१०/- प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. तरी माझ्या अर्जाचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती केलेली आहे.

त्यानुसार सदरचे विषयाबाबत दि.३०.११.२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे झालेल्या मा.व्य.स.(त्रीसदस्य) च्या सभेपुढे मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेसह निवड समितीने निवडलेल्या सम्राट आटयाच्या उर्वरीत तीन निविदाधारकांना समक्ष चर्चा-वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते.

सदर सभेत गहु आटा खरेदीबाबत सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय क्र.८८७ संमत करण्यात आला आहे. "सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करणेसाठी द्वितीय निम्नतम दरधारक

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद यांना त्यांनी चर्चेअंती देऊ केलेल्या रु.२,०५२/- प्रति क्विंटल (व्हॅटसह) या दराने संस्थान प्रसादालयासाठी सम्राट ब्रॅण्ड गहु आटा पुरवठा करणेसाठी कार्यादेश देणेत यावा. सदरची जादा दराने खरेदी केल्यामुळे दरातील फरकाची रक्कम न्युनतम दरधारक मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून वसुल करणेत यावी. मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी पुरवठा आदेशानुसार सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा न केल्यामुळे त्यांची गहु आट्यासाठी असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी व त्यांना ३ वर्षासाठी संस्थानमध्ये गहु आटा पुरवठा करण्यासंबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही, असा निर्णय झालेला आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून वसुल करावयाचे रक्कमेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणेः-

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | गहु आट्या साठी असलेली ५% सुरक्षा अनामत (९००० क्विंटल x रु.२०१०/- = रु.१,८०,९०,०००/- रु.१,८०,९०,०००/- x ५% प्रमाणे) | रु.९,०४,५००/- |
| ०२. | जादा दराने खरेदी केलेल्या गहु आट्याच्या फरकाची रक्कम (८,९०० क्विंटल x रु.४२/- प्रति क्विं. प्रमाणे) | रु.३,७३,८००/- |
| | एकुण रक्कम रुपये- | रु.१२,७८,३००/- |

(अक्षरी रुपये बारा लाख अठ्याहत्तर हजार तीनशे मात्र)

तरी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१२ सभेतील निर्णयाप्रमाणे वरील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे गहु आट्यासाठी असलेली ५% डिपॉझिट रक्कम रु.९,०४,५००/- व द्वितीय न्युनतम दरधारक यांचेकडून जादा दराने खरेदी केलेल्या गहु आट्याच्या फरकाची रक्कम रु.३,७३,८००/- असे एकुण रु.१२,७८,३००/- (अक्षरी रुपये बारा लाख अठ्ठयाहत्तर हजार तीनशे) मात्र वसुल करणेबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचेकडील दि.२१.०१.२०१३ चे पत्रान्वये "आम्ही बाबांच्या सेवेसाठी कमीत कमी दरामध्ये माल पुरवत आहोत. सध्या तांदुळाचे टेंडररसुद्धा आम्हाला भेटले आहे. माझ्या आणि दुसऱ्या पार्टीचे भावात खुप तफावत आहे. पुढेही आम्ही कमी दरात माल परवू. तरी आम्हाला सध्या भावफरक व ५% सुरक्षा अनामत रक्कम व ३ वर्षाची आट्याचे निविदेमध्ये भाग घेण्यास बंदी असे तिहेरी दंड ठोठवण्यात आले आहे. तरी साहेबांनी आमचे अर्जाचा सहानूभूतिपुर्वक परत विचार करुन कमीत कमी दंड करण्यात यावा" अशी विनंती केलेली आहे.

तरी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे पत्राबाबत निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा. परंतु व्यवस्थापन समितीने यापुर्वी घेतलेल्या निर्णयावरील कार्यवाही चालु ठेवावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१६** **एल.पी. गॅसचा डिकॅन्टींग पंप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईप्रसादालयात एप्रिल २०११ पासुन लाडु प्रसाद बनविणेकामी दोन कॉन्ट्रक्टरची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे जुने प्रसालयातील गॅस प्लॅंटचा वापर लाडु बनाविणेकामी इंधन पुरवठा यंत्रणा म्हणुन होत आहे. गॅस टॅंकर मधुन टॅंकमध्ये एल. पी. गॅस अनालोड करणेकामी दोन बी. ई. मेक ७.५ एचपी मल्टीस्टेज डिकॅन्टींग पंपाचा वापर करणेत येत आहे. त्यापैकी एक पंप बॉडी व सिल मधुन गॅस लिकेज झालेमुळे बंद आहे.

सध्या स्टॅण्ड बाय पंपाद्वारे गॅस टॅंकर मधील गॅस अनलोडींग केला जातो. मात्र सध्या कार्यरत असलेला पंप बंद पडल्यास किवा लिकेज झालेस टॅंकरमधुन गॅस टॅंक मध्ये घेण्यास अडचन येऊ शकते. सदरचा लिकेज पंप यापुर्वी बी.ई. पंपाचे नजिकचे अधिकृत सर्व्हिस डिलर्सची मे. रुसो ॲग्रो इंजिनिअरींग प्रा. लि. पुणे यांचेकडून सप्टेंबर २०११ मध्ये दुरुस्त केलेला आहे. परंतु सदरचा पंप पुन्हा लिकेज झालेला आहे. पंप जुना झाल्यामुळे वारंवार दुरस्ती करावी लागते. गॅस सारख्या अत्यंत ज्वलनशील इंधनाची सुरक्षित हाताळणी करणेकरीता नविन पंप खरेदी करुन बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

एल. पी. जी. डिकॅन्टिग पंपाचे पुरवठादार यांचेकडुन दरपत्रक मागावुन विहीत पध्दतीने पंप खरेदी करता येईल. त्याकामी अंदाजे रक्कम रु. ९०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी एल. पी. जी. डिकॅन्टिग पंप खरेदी करणेकामी पुरवठादाराकडुन विहीत पद्धतीने दरपत्रक मागविणेस व येणाऱ्या रु. ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाकरीता एल. पी. जी. डिकॅन्टिग पंप खरेदी करणेसाठी पुरवठादाराकडुन विहीत पद्धतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१७** **फुड सर्व्हिस ट्रॉलीकरीता मुव्हेबल ब्रॅकेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन वाढणेसाठी स्टे. स्टील सर्व्हिस ट्रालीचा वापर करण्यात येतो. प्रसाद भोजन पदार्थ, चपाती, पाणी, ग्लास व जेवनाचे ताटांचे वाटप करणेसाठी वेगवेगळया स्टे. स्टील ट्रॉलीचा वापर करण्यात येत आहे.

दैनंदिन वापरात सदर ट्रॉलीज पैकी काही ट्रॉलीजचे मुव्हेबल व्हिल ब्रॅकेट खराब झालेले असल्याने दिनांक २४.४.२०१२ रोजी ६ इंच व्हिलचे २४ ट्रालीज करीता ४८ ब्रॅकेट व ४ इंच व्हिलचे १८ ट्रॉलीज करीता ३६ ब्रॅकेट खरेदी केलेले आहेत. उर्वरीत ट्रालीज करीता मुव्हेबल ब्रॉकेट खरेदी करणे आवश्यक आहे. मुव्हेबल ब्रॅकेट खराब झालेमुळे ट्रालीजचा वापर करताना, ट्रॉली व्यवस्थीत वळविणे व ढकलणेसाठी, भक्तांना प्रसाद भोजन वाढणे व जेवनाची ताटांची ने-आण करणेकामी अडचण येत आहे. बॅकेट करीता लागणारे नायलॉनचे व्हिल हैद्राबाद येथिल साईभक्त श्री पठारे यांनी वेळोवेळी आवश्यकतेनुसार देणगी दिलेले आहे. यापुढे प्रसादालयातील ट्रॉलीचे व्हिल खराब झालेनंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी देणगी देणार असल्याचे त्यांनी सांगितलेले आहे. फुड सर्व्हिस ट्रॉली ढकलणे, ओढणेस कर्मचाऱ्यांना त्रास होत असल्याने फुड सर्व्हिस ट्रॉली व्यवस्थीत चालु राहणेसाठी खालील तपशिलाप्रमाणे मुव्हेबल ब्रॉकेट खरेदी करावे लागणार आहे.

| अ. नं. | ट्रॉलीचा तपशिल | ट्रॉली व्हिल साईज | ट्रॉलीज संख्या | मुव्हेबल ब्रॅकेट संख्या | यापुर्वी खरेदी केलेल्या ब्रॉकेट संख्या | खरेदी करावयाच्या ब्रॅकेटची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ताटे वाहणेची ट्रॉलीज | ६” | ३० | १४० | ४८ | **९२** |
| २ | भाजी, दाळ व भात वाढणेची | ६” | २० | | | |
| ३ | पाणी व ग्लास ट्रॉलीज | ६” | २० | | | |
| ४ | पाणी व ग्लास ट्रॉलीज | ४” | १५ | ९० | ३६ | **६४** |
| ५ | चपाती /पुरी वाढणेच्या ट्रॉलीज | ४” | ३० | | | |
| ६ | भात साठविण्याची सच्छिद्र टॉली | ८” | ०४ | १६ | ०० | **१६** |

त्याकामी ब्रॅकेट उत्पादन करणाऱ्या अग्रगण्य कंपनी यांचेकडुन विहीत पद्धतीने दरपत्रक मागावून ब्रॅकेट खरेदी करता येतील. यापुर्वी खरेदी केलेले ६” ब्रॅकेट प्रती नग रु. ३४६/- व ४” ब्रॅकेट प्रती नग रु. १९७/- प्रमाणे खरेदी करण्यात आलेले होते. परंतु त्यानंतर महागाईमुळे वाढलेले दरानुसार उपरोक्त प्रमाणे ब्रॅकेट खरेदी करणेकामी अंदाजे ८०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी प्रसादालयातील फुड सर्व्हिस ट्रॉलीकरीता उपरोक्त प्रमाणे मुव्हेबल ब्रॅकेट विहित पद्धतीने दरपत्रक मागावून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील फुड सर्व्हिस ट्रॉलीकरीता मुव्हेबल ब्रॅकेट विहित पद्धतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.१८** **श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता/ हाऊसकिपींग व पेस्ट कंट्रोलचे कामास मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साई प्रसादालयातील स्वच्छता/हाऊसकिपींगचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समिती दिनांक १९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्रं. ८३९ अन्वये दि.७/०१/१२ ते ६/०१/१३ या कालावधीसाठी रु.८,२५,०००/- प्रमाणे जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/ ५११६/२०१२ दि.१२/०१/२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

परंतू सदर कामाचा कालावधी दिनांक ०६/०१/२०१३ रोजी संपणार असल्यामुळे पुढील कालावधी दि.०७/०१/२०१३ पासून श्री साई प्रसादालयाकडील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोलची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन जाहीर निविदा मागविणेबाबत मा.व्यवस्थापन त्रिदस्य समिती दिनांक ०८/१०/२०१२ रोजीचे सभेमध्ये निर्णय झालेला आहे. त्याकामी दिनांक १८/१०/२०१२ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वृत्तपत्रात व आय टी विभागामार्फत संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक ०७/११/२०१२ रोजी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द झालेली आहे.

दि. २६/११/२०१२ या विहीत मुदतीत खालील निविदाधारकांनी दरपत्रक सादर केलेले आहे.

१) न्युटेक जेटींग इक्वीपमेंटस् इंडीया प्रा.लि., फरीदाबाद
२) एटुझेड इन्फ्रा सर्व्हीसेस लि., मुंबई
३) सी हॉक सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलिटीज मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पनवेल
४) बी.व्ही.जी. इंडिया लि, पुणे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरीलप्रमाणे ०४ निवीदा सादरकर्त्यांची टेक्नीकल बीड (पाकीटे) दिनांक ०५/१२/२०१२ रोजी मा.उप-कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेली आहे. त्यांचा पात्र/अपात्र टेक्नीकल बीडचा तक्ता तयार करण्यात आलेला असून पुढील कार्यवाही करणेकामी काही कालावधी लागणार आहे.

संदर्भिय अ.नं.१ नूसार बी.व्ही.जी. इंडिया.लि. पुणे यांना दिनांक ०७/०१/२०११ ते ०६/०१/२०१३ या कालावधीसाठी स्वच्छता/हाऊसकिपींग/पेस्ट कंट्रोलचे कामाचा कार्यादेश देण्यात आलेला असून संदर्भिय अ.नं.२ बी.व्ही.जी. इंडिया.लि. पुणे यांनी दि.१०/०६/२०१२ रोजी करुन दिलेल्या करारनाम्यातील अटी/शर्ती क्रं.३२ नूसार पुढील कार्यवाही होईपर्यंत बी.व्ही.जी. इंडिया.लि. पुणे यांना श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोलची कामे मा.व्यवस्थापन समिती दिनांक १९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्रं. ८३९ अन्वये मंजूर दरामध्ये करुन देणे बंधनकारक आहे.

त्यानूसार श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग/पेस्टकंट्रोलची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी बी.व्ही.जी. इंडिया.लि. पुणे यांना दिनांक ०७/०१/२०१३ पासून पुढील कालावधीसाठी दिनांक १६/१०/२०१२ रोजीचे करारनाम्यातील अटी/शर्ती क्रं.३२ नूसार कार्यादेश पत्र देणेस मा.व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग/पेस्टकंट्रोलची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी मे. बी.व्ही.जी. इंडिया.लि., पुणे यांना दिनांक ०७/०१/२०१३ पासून पुढे नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **पंचामृत डेअरी, मुंबई यांचेकडील गावरान तुपाचे वापराबाबत.**

**प्रस्ताव -** मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभा दि.०८.११.२०१२ मधील निर्णय क्र.८५९ नुसार प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारे गावरान तूप ४५०० क्विंटल खरेदीकामी मे.पंचामृत डेअरी, मुंबई प्रभात डेअरी, रांजणखोल व इंदापूर डेअरी, गोखळी यांना नोव्हेंबर २०१२ ते मार्च २०१२ अखेर या ०५ महिन्यांकरीता प्रत्येकी १५०० क्विंटल गावरान तूप पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

मे.पंचामृत डेअरी, मुंबई यांनी खरेदी विभागाचे मागणीनुसार दि.१८.११.२०१२ रोजी १५ किग्रॅचे ६६७ डबे गावरान तूपाचा संस्थानचे भांडार विभागात पुरवठा केलेला असून त्यापैकी दि.२३.११.२०१२ रोजी लाडू ठेकेदार दिपक नाईकवाडी यांना १०० डबे व शिवसाई केटरर्स यांना १५० डबे बुंदी तळणेसाठी दिलेले होते. मात्र कढईतील तूपातून फेस व धुर आल्याने लाडू ठेकेदार यांनी तूपाचे शुद्धतेबाबत शंका निर्माण केलेली असून त्याबाबत त्यांनी संदर्भ क्र.२ अन्वये पत्रे दिलेली आहे. सदरची बाब लाडू ठेकेदार यांनी प्रसादालयाचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्याने मे.पंचामृत ब्रॅण्डचे गावरान तूपाचा वापर थांबवणेत येऊन दि.३०.११.२०१२ रोजी त्यांचेकडील गावरान तूपाचा नमुना मे.अश्वमेध इंजिनीअर्स, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविणेत आलेला होता.

मे.अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्स्टल्टंस लि., नाशिक यांचे दि.१०.१२.२०१२ च्या रिपोर्टमध्ये फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्ड रेग्युलेशनस २०११ चे नियमानुसार ब्युट्रो रिफरॅक्ट्रोमिटर रिडींग ४०°C चे प्रमाण हे ४० ते ४३ या दरम्यान असते. मात्र त्यांनी तपासलेल्या नमुन्यात ते ४५.२ असल्याचे दिलेले असून ते स्टॅण्डर्डप्रमाणे नसल्याचे नमुद केलेले आहे.

त्यानंतर दि.१५.१२.२०१२ रोजी दुपारी २.३० वाजता नविन प्रसादालय येथे पंचामृत ब्रॅण्डचे गावरान तूपाचे प्रात्याक्षिक घेण्यात आले. सदरील प्रात्याक्षिकास संस्थानचे प्रशासकीय अधिकारी, खरेदी अधिक्षक, प्रसादालय अधिक्षक, वरीष्ठ लिपीक, लाडू ठेकेदार, आचारी व पंचामृत डेअरी, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री संदीप आर मिश्रा हे उपस्थित होते. प्रात्याक्षिकामध्ये कढईतून पुन्हा धुर आल्याचे व कडवट वास आल्याचे तसेच त्यापासून बनविणेत आलेले लाडू काही प्रमाणात कडवट लागत असल्याचे निदर्शनास आले.

मे.पंचामृत डेअरी, मुंबई यांनी दि.२९.१२.२०१२ रोजी आवक विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रामध्ये खालील प्रमाणे बाबी उपलब्ध केलेल्या आहेत.

पंचामृत डेअरी ही तूपाचे उत्पादन स्वतः करते व त्याची स्वतःची प्रयोगशाळा आहे. त्या प्रयोगशाळेत काम करणारी व्यक्तींनी एगमार्क (भारत सरकार) मार्फत प्रशिक्षण घेतले आहे. पंचामृत डेअरी ही साईबाबा संस्थान व्यतिरीक्त विश्वविख्यात मंदिरामध्ये गाईचे तूप पाठवते. दि.०६.११.२०१२ रोजी रु.२४,६१,०००/- किंमतीचे तूप पाठविले असून त्याची रक्कम अजून बाकी आहे. ती देण्यात यावी तसेच-

१) आमची कंपनी ISO २२०००:२००५ व गुणवत्ता विशेष स्पेशल ग्रेड एगमार्क ॲथॉरटी ऑफ सेंट्रल गर्व्हमेंट द्वारा क्वॉलीटी ॲप्रुड आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



२) पंचामृत डेअरीने साई संस्थान शिरडी यांच्या सर्व नियमाचे पालन केले आहे. त्याचबरोबर निविदाच्या सर्व कागदपत्रे व नियम यांचे पालन करुन नंतरच साईबाबा संस्थानने पंचामृत डेअरी प्रा.ला गाईच्या तुपाची निविदा दिली.

३) साईबाबा संस्थानमध्ये काही अफवांच्या कारणामुळे पंचामृत तूपाचे लाडू बनवतेवेळी कढईतून काळा धूर येतो. दि.१५.१२.२०१२ दिवशी समक्ष पाहताना तसा धुर निघण्याचा कोणताही प्रकार दिसला नाही. छायाचित्र सोबत पाठविली आहेत.

४) पंचामृत डेअरी प्रा.लि, Food Safety and Standard Act २००६, Rules & Regulations-२०११ च्या प्रत्येक नियमाचे पालन करते.

५) पंचामृत डेअरी प्रा.लि. निविदा मिळाल्याने साईबाबा संस्थानला बराच फायदा झाला. कारण आमच्या गाईच्या तुपाची किंमत कमी केली त्यामुळे सर्वांनीच त्यांच्या तूपाची किंमत कमी केली.

६) आमच्या पाठवलेल्या गाईच्या तूपाचा लवकरात लवकर वापर करावा जेणेकरुन त्याची गुणवत्ता टिकुन राहील शिवाय फ्रेश बॅचच्या तुपाच्या लाडूचे स्वाद व गुणवत्ता टिकुन राहील.

तसेच विशेष बाब म्हणून त्यांनी उपरोक्त दिलेल्या माहिती व्यतिरीक्त जर कधी कोणत्याही प्रकारची शंका असेल तर पंचामृत कधीही तुप बदलून देण्याची सुविधा देत असल्याचे नमुद केलेले आहे.

मे.अश्वमेध इंजिनीअर्स, नाशिक या लॅबोरेटरीकडून प्राप्त झालेल्या रिपोर्टवर अन्न सुरक्षा व मानके २००६ व नियम २०११ ची अंमलबजावणी/मार्गदर्शनकामी नियुक्त केलेले सल्लागार ॲड.श्री पी.बी.सोबले यांचा अभिप्राय घेतला असता, त्यात त्यांनी गावरान तूपाचे बी आर रिडींग हे ४५.२ असून ते गावरान तूपाचे ४० ते ४३ या प्रमाणापेक्षा जास्त आहे. म्हणून तपासणी करणेत आलेला नमुना हा गावरान तूपाचे प्रमाणतेनुसार नाही. तसेच त्यांनी सदरील गावरान तूप हे अन्नपदार्थ बनविण्यासाठी वापरणेत येऊ नये असा सल्ला दिलेला आहे.

मे.पंचामृत डेअरी, मुंबई यांनी उपस्थित केलेले मुद्दे व सद्यस्थिती यावर मा.व्यवस्थापन (त्रिसदस्सीय) समिती सभेपुढे चर्चेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९** **सदरहू प्रस्तावाबाबत उपरोक्त विषय नं.१३ निर्णय क्र.७३ मध्ये चर्चा होऊन निर्णय झालेला आहे.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.२०** **आर.ओ. प्लॅन्टकरीता मेंबरन्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईप्रसादालयात भक्तांना प्रसाद भोजन घेतांना पिण्यासाठी शुद्ध पाणी (आर.ओ.) देण्यात येत आहे. त्यासाठी तासी २००० लि. क्षमतेचे दोन आर. ओ. प्लॅन्ट कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. प्लॅन्टस दररोज साधारणत: १२ तास अविरत चालु असतात. त्यापैकी एक प्लॅन्ट राजू वेगसना फाउंडेशन, हैद्राबाद यांनी देणगी दिलेला असून मेन्टेनंन्स साठी आवश्यक स्पेअरपार्टचा खर्च देणगीदार राजू वेगसना फाउंडेशन कंपनीच करत आहे. दुसरा प्लॅन्ट संस्थानने खरेदी केलेला असून ION EXCHANG कंपनीचा आहे. देणगी प्लॅन्ट व संस्थानने खरेदी केलेला आर. ओ. प्लॅन्ट साठी वेगवेगळया साईजचे फिल्टर व स्पेअरपार्टस लागतात.

संस्थानने खरेदी केलेल्या प्लॅन्टकरीता CPA२-८०४० साईजचे पाच मेंबरन्स वापरण्यात येत आहे. सदर मेंबरन्स ठराविक कालावधी (पाण्याची गुणवत्ता) नुसार बदलावे लागतात. यापुर्वी १४.२.२०११ रोजी मेमरन्स बदलण्यात आलेले आहे. सध्या वापरात असलेले मेंबरन्स पासून पाण्याची गुणवत्ता मिळत नाही. त्यामुळे नविन मेंबरन्स टाकावे लागणार आहे. यापुर्वी दिनांक १४.२.२०११ रोजी खरेदी केलेले मेमरन्स पैकी नविन तीन मेमरन्स शिल्लक आहे. उर्वरीत दोन मेंबरन्स खरेदी करावे लागणार आहे.

आर. ओ. प्लॅन्ट सुरळीत चालु राहणेसाठी आणखी दोन मेंबरन्स खरेदी करणे आवश्यक आहे. सदर स्पेअर पार्ट खरेदीकामी वेगवेगळे पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेत येतील. यापुर्वी दिनांक १४.२.२०११ रोजी प्रती मेंबरन्स रक्कम रु. ३३,३५०/- खरेदी करणेत आलेले होते. परंतु दोन वर्षात झालेली महागाई नुसार किमंतीमध्ये वाढ झालेली आहे. त्याकामी दोन मेंबरन्स खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. ८०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी प्रसादालयातील आर ओ. प्लन्टकरीता उपरोक्त प्रमाणे दोन मेंबरन्स विहित पद्धतीने दरपत्रक मागावून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील आर ओ. प्लॅन्टकरीता दोन मेंबरन्स विहित पद्धतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.२१ चपाती/ पुरी, मोतीचूर लाडू व बर्फी अन्नपाकिटे तयार करणारे ठेकेदार यांना पुढील एक वर्षासाठी दरवाढसह मुदतवाढ देणेबाबत किंवा जाहिरात देऊन निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव -** मा.व्यवस्थापन समिति दि.१९/०२/२०१२ चे सभेतील निर्णय क्र.१८६ नूसार सन २०१२-२०१३ करीता साईभक्तांना प्रसाद भोजनामध्ये चपाती/पुरी, श्रींचा प्रसाद म्हणून विक्री करण्यात येत असणारे मोतीचूर लाडू व बर्फी, तसेच अल्पोपहार म्हणून विक्री करण्यात येणारी अन्नपाकीटे तयार करणेकामी खालील ठेकेदार यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यानूसार

१) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/६६४९/२०१२ दि.३१/०३/२०१२ (चपाती)
२) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा /६६५१/१२ दि.३१/०३/२०१२. (लाडू व बर्फी)
३) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा /६६५२/२०१२ दि.३१/०३/२०१२. (लाडू व बर्फी))
४) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/६६५०/२०१२ दि.३१/०३/२०१२. (अन्नपाकीटे)
५) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा /३८५/२०१२ दि.२५/०४/२०१२.

वरीलप्रमाण अं.नं.१ ते ४ प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेले आहे. मात्र अं.नं.५ अन्वये साई गणेश महिला बचत गट, शिरडी यांना लेबर, केटरींग परवाना, प्रॉ.फंड, व्यवसाय कर नंबर दोन महिन्याचे आत सादर करणेबाबत पत्र देण्यात आलेले होते. परंतू अद्याप पावेतो त्यांनी कागदपत्रे सादर केलेली नसल्यामुळे त्यांना मोतीचूर लाडू बनविणेचा कार्यादेश देण्यात आलेला नाही.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कामाचे स्वरुप | सन २०१२-२०१३ |
|---|---|---|---|
| १) | कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे | स्वामी नारायण चपाती तयार करणे<br>पुरी तयार करणे | प्रति क्विंटल रु.१०००/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विंटल रु.९००/- (सर्व करांसह) |
| २) | श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसुल | मोतीचूर लाडू व बर्फी तयार करणे | लाडू प्रति हजारी रु. २४०/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विं.साखरेस रु.२००/- (सर्व करांसह) |
| ३) | श्री शिवसाई केटरर्स,& लेबर कॉन्ट्रक्टर,शिर्डी | मोतीचूर लाडू व बर्फी तयार करणे | लाडू प्रति हजारी रु. २४०/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विं.साखरेस रु.२००/- (सर्व करांसह) |
| ४) | सौ.रोहीणी राजेंद्र कोते, साईसिध्दी महिला बचत गट, शिर्डी | अन्नपाकीटे तयार करणे | प्रति नग पाकीट ०१/७५ पै.(सर्व करांसह) |

१) कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे हे स्वामी नारायण चपाती/पुरी बनविणेचे काम करतात. त्यांचे कामगारांना सुरवातीपासून निवास, दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामुल्य देण्यात येतो.

२) दिपक माधव नाईकवाडी यांचे कामगारांना निवासाकरीता संस्थानचे प्रचलित दराने सेवा आकार घेऊन खोल्या देण्यात येतात तसेच कर्मचारी संख्येनूसार दोन वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो.

३) श्री शिवसाई केटरर्स & लेबर कॉन्ट्रक्टर यांचे कामगारांना निवासाकरीता संस्थानचे प्रचलित दराने सेवा आकार घेऊन खोल्या देण्यात येतात. तसेच कर्मचारी संख्येनूसार दोन वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो.

४) सौ.रोहीणी राजेंद्र कोते, साईसिध्दी महिलाबचत गट,शिर्डी यांचे कामगारांना एक वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो.

वरील चारही ठेकेदारांची कामाची मुदत दि.३१/०३/२०१३ रोजी संपणार असून पुढील मुदतीकरीता ते काम करण्यास तयार आहेत. कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे, चपाती ठेकेदार यांचा दि.१७/०१/१३ रोजीचा अर्ज, श्री दिपक माधव नाईकवाडी, लाडू व बर्फी ठेकेदार यांचा दि.१४/०१/१३ रोजीचा अर्ज, श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रक्टर, लाडू व बर्फी ठेकेदार यांचा दि.१६/०१/२०१३ रोजीचा अर्ज व साई सिध्दी महिलाबचत गट, शिर्डी अन्नपाकीटे ठेकेदार यांचा दि.१६/०१/१३ रोजीचा अर्ज या चारही ठेकेदारांनी पूर्वीच्या सवलती + दरवाढसह मुदतवाढ मिळावी अशी सदरच्या अर्जांद्वारे विनंती केलेली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे दरवाढ मागितलेली आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | सन २०१२-२०१३ ची मंजूर रक्कम | मागितलेली दरवाढ | सन २०१३-२०१४ करीता दरवाढीसह होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे | चपाती तयार करणे<br>प्रति क्विंटल - रु.१०००/-(सर्व करांसह) | ४०%<br>(सर्व्हीस टॅक्स वेगळा)<br>(रु.४००.००)<br>४०% | चपाती तयार करणे<br>प्रति क्विंटल - रु.१४००/- (सर्व्हीस टॅक्स वेगळा) |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरी तयार करणे प्रति क्विंटल - रु.९००/- (सर्व करांसह) | (सर्व्हीस टॅक्स वेगळा) (रु.३६०.००) | पुरी तयार करणे प्रति क्विंटल - रु.१२६०/- (सर्व्हीस टॅक्स वेगळा) |
| २) | श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसुल | लाडू प्र.हजारी - रु. २४०/- (सर्व करांसह) बर्फी प्र.क्विं.साखर - रु.२००/- (सर्व करांसह) | ७०% (रु.१६८.००) १६५% (रु.३३०/-) | लाडू प्रति हजारी रु.४०८/- (सर्व करांसह) बर्फी प्रति क्विं.साखरेस रु.५३०/- (सर्व करांसह) |
| ३) | श्री शिवसाई केटरर्स,& लेबर कॉन्ट्रक्टर | लाडू प्र.हजारी - रु. २४०/- (सर्व करांसह) बर्फी प्र.क्विं.साखर - रु.२००/- (सर्व करांसह) | दरवाढ मागितलेली नाही. | सन २०१३-१४ साठी दरवाढ मागितलेली नसून पुर्वीचेच दरात काम करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे. लाडू प्रति हजारी रु.२४०/ (सर्व करांसह) बर्फी प्रति क्विं.साखरेस रु.२००/ (सर्व करांसह) |
| ४) | साई सिध्दी महिला बचत गट,शिर्डी सौ.रोहीणी राजेंद्र कोते | प्रति नग पाकीट - रु.०१/७५ पै. (सर्व करांसह) | २०% (०.३५ पै.) प्रति पाकीट | प्रति नग पाकीट ०२/१० पै. (सर्व करांसह) |

१) स्वामी नारायण चपाती ठेकेदार कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे, यांचे काम असमाधानाकारक असून त्यांनी पुरविलेल्या चपात्या/पुरीची क्वालिटी चांगली नाही. त्यांना वेळोवेळी तोंडी व जा.नं. एसएसएस/ वशी/ प्रसादा/७०४/२०१२ दि.१६/०५/२०१२, १५०३/१२ दि.०७/०७/२०१२, २५४८/१२,दि.०८/०९/२०१२,४२४७/२०१२दि.१५/१२/२०१२, ४४७१/२०१२ दि.२९/१२/२०१२ चे पत्रान्वये लेखी समज देण्यात आलेली आहे. मात्र समज देऊनही चपाती/पुरीची प्रत ढासाळलेली आहे. त्यामुळे त्यांना दरवाढ व मुदतवाढ देणे बाबत विचार करणे गरजेचे वाटते.

२) लाडू व बर्फी ठेकेदार श्री दिपक माधव नाईकवाडी, यांनी दरवाढसह मुदतवाढ मागितलेली आहे. परंतू त्यांनी मागितलेली दरवाढ ही अवाजवी वाटते. त्यामुळे त्यांचेबाबत निर्णय होणेस विनंती.

३) लाडू व बर्फी ठेकेदार श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, यांनी सध्याचेच दरात मुदतवाढ मागितलेली आहे. मात्र शिवसाई केटरर्स यांचे एकटयाच्याने भक्तांचे गरजेएवढे लाडूचा पुरवठा केला जाणार नाही. तसेच सध्याची वाढलेली महागाई पहाता श्री शिवसाई केटरर्स यांनी दरवाढ मागितलेली नसल्यामुळे त्यांना पुढील कालावधीसाठी मुदतवाढ दिल्यास त्यांचेकडून लाडूची क्वालिटी मिळण्याची शक्यता वाटत नाही. शिवाय एकटयाने लाडूची पुर्तता होणार नाही. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती

४) अन्नपाकीटे ठेकेदार साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी यांनी पुर्वीचे दरापेक्षा २०% दरवाढसह मुदतवाढ मागितलेली आहे. तरी त्यांना दरवाढसह मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे- अं.नं. १) चपाती/पुरी ठेकेदार, कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे,
अ.नं.२) मोतीचूर लाडू/बर्फी ठेकेदार, श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसूल
अ.नं.३) मोतीचूर लाडू/बर्फी ठेकेदार, श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर,
अ.नं.४) अन्नपाकीटे ठेकेदार, साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी

या चार ठेकेदारांपैकी तीन ठेकेदारांनी दरवाढसह मुदतवाढ मागितलेली आहे. व एका ठेकेदाराने दरवाढ न करता मुदतवाढ मागितलेली आहे. परंतू कामकाजाच्या सोईचे दृष्टीने कुणासही मुदतवाढ न देता वृत्तपत्रात जाहीरात देऊन निवीदा मागविणेत याव्यात असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे चारही ठेकेदार यांचे विनंती अर्जानुसार दरवाढसह मुदतवाढबाबत अथवा उपरोक्त कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा मागविणेबाबत मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चपाती/ पुरी, मोतीचूर लाडू व बर्फी अन्नपाकिटे तयार करणेकामी नवीन ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.२२** **संस्थानकरिता ई-टेंडर प्रक्रिया mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव -** महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-टेंडर कार्यप्रणालीचे चे प्रात्यक्षिक महाराष्ट्र शासनाचे आयटी विभागाच्या प्रतिनिधी श्रीमती निवेदीता गोलतकर मॅडम, नॅशनल ईन्फॉर्मेटीक्स सेंटर (NIC) कंपनीच्या प्रतिनीधी श्रीमती इराणी मॅडम व श्री.दर्शन पाटील यांनी संस्थानचे सर्व विभागप्रमुख यांना

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा.कार्यकारी अधिकारी सो यांचे उपस्थितीत दि. ३०/१०/२०१२ रोजी दाखविलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासन व NIC यांचे संयुक्त विद्यमाने mahatenders.gov.in या संकेतस्थळावर शासनाने सर्व विभागांचे ई-टेंडरींग प्रक्रिया सुरु केलेले आहे. सध्या साईबाबा संस्थानमध्ये ई-टेंडर ची पद्धत प्रस्थापित नाही. साईबाबा संस्थान राबवत असलेल्या साईटेक प्रकल्पाअंतर्गतही ई-टेंडरचा समावेश नाही. सबब साईबाबा संस्थानला भविष्यात स्पर्धात्मक व पारदर्शी निविदाप्रक्रिया आणणेसाठी ई-टेंडर ही कार्यप्रणाली राबवीणे गरजेचे आहे.

सदर ई-टेंडर कार्यप्रणाली साईबाबा संस्थानने स्वतःसाठी स्वतंत्रपणे सुरु करावयाचे झाल्यास त्यास निविदा काढणे, अंतिम निविदाधारक शोधणे, याकामी customized application बनवून घेणे इत्यादी कामे करावी लागणार आहे. ई-टेंडर Software बनिविणेसाठी वेळ तर लागेल, शिवाय आर्थिक खर्चही संस्थानला करावा लागणार आहे. महाराष्ट्र शासनाचे माहीती तंत्रज्ञान विभागाशी, सदर ई-टेंडर कार्यप्रणाली संबधात संपर्क केला असता त्यांनी mahatenders.gov.in या website वर साईबाबा संस्थानचे टेंडर प्रसिद्ध करणेसाठी त्यांचे portal विनामुल्य वापरण्यास सहमती दर्शविलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे ई-टेंडर प्रक्रिया साईबाबा संस्थानला कार्यान्वीत करावयाची झाल्यास, खालीलप्रमाणे पुर्तता करावी लागणार आहे -

**१.Digital Signature Certificate (DSC):** सदर ई-टेंडर सुविधा चालू झालेनंतर प्रत्येक निविदाधारकास व संस्थानचे सर्व विभाग प्रमुख व तत्सम कर्मचारी यांना Digital Signature घेणे बंधनकारक आहे. सध्या मार्केटमध्ये विविध कंपन्या Digital Signature विकत आहेत. परंतु NIC यांचेकडून Digital Signature घेतल्यास यासाठी येणारा खर्च रु.५७०/- + कर प्रतिवर्ष इतका अपेक्षित आहे. सदर Digital Signature मिळणेसाठी २ ते ३ आठवडे इतका वेळ लागतो. तसेच सर्व निविदाधारकांसही Digital Signature विकत घेणे बंधनकारक असणार आहे व त्याचा खर्च निविदाधाराकास करावा लागणार आहे.

**२.Tender Cell :** सदरची ई-टेंडर कार्यप्रणाली सुरु झालेनंतर साईबाबा संस्थानला एक स्वतंत्र Tender Cell (निविदा कक्ष) ची नियुक्ती करावी लागणार आहे. सदर cell मध्ये NIC या संस्थेमार्फत एक तंत्रज्ञ पुर्णवेळ घ्यावा लागणार आहे. त्यासाठी अंदाजे रक्कम रुपये २०,०००/-+ कर प्रती महा इतका खर्च येणार आहे. याशिवाय internet चे ज्ञान असलेला एक वरिष्ठ लिपिक व एक लिपीकाची पुर्ण वेळ नेमणूक करावी लागणार आहे. तसेच सदर कक्षासाठी Tender Cell incharge या पदावर संस्थानचे सध्याची टेंडर प्रक्रियेबाबतचे सखोल ज्ञान असणारा कर्मचारी/अधिकारी आवश्यक आहे. सदर कर्मचारी/अधिकारी यांना संस्थानचे टेंडर पद्धतीनुसार टेंडर प्रक्रिया राबविणे, विविध विभागांशी समन्वय ठेवणे व निविदा प्रक्रियेची विभागांतर्गत माहीतीची देवाणघेवाण तत्परतेने करुन घेणे इत्यादी कामे करावी लागणार आहे. यानुसार चार जणांचा निविदा कक्ष तयार होईल व टेंडर प्रक्रियेतील सर्व कामे संबधीत कक्षामार्फत करता येतील.

ई-टेडर उघडणेसाठी साईबाबा संस्थानचे नियमानुसार खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांना अधिकार असतील.

१. संबधीत विभागाचे विभागप्रमुख किंवा तत्सम कर्मचारी आणि निविदा कक्ष अधिकारी
२. संबधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी.
३. मा.कार्यकारी अधिकारी व उप कार्यकारी अधिकारी.

उपरोक्तप्रमाणे टेंडर अपलोड करणारा कर्मचारी वेगळा असेल. निविदाधारकाने भरलेले ई-टेंडर उघडणेची प्रक्रिया, उपरोक्त १ ते ३ मधील अधिकारी यांचे परवानगीने होईल. याकामी या सर्वांना Digital Signature द्वारे ई-टेंडर उघडणेच्या दिवशी login करुन मान्यता दिल्यानंतर अपलोड केलेल्या सर्व निविदा open होणार आहेत. त्यामुळे सदर टेंडरबाबत आवश्यक ती खबरदारी व पारदर्शकता ठेवण्यात येईल, संस्थानचे रक्कम रुपये ५ लाख व ५ लाखा पेक्षा जास्तच्या रक्कमेच्या सर्व निविदा ई-टेंडर व्दारे mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन प्रकाशित करण्यात याव्यात व ई-टेंडर प्रक्रियेसाठी आवश्यक असणारा निविदा कक्ष उभारणेस व एक तंत्रज्ञ घेणेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

तरी, संस्थानचे रक्कम रुपये ५ लाख व ५ लाखा पेक्षा जास्तच्या रक्कमेच्या सर्व निविदा ई-टेंडर व्दारे mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन प्रकाशित करणेस तसेच ई-टेंडर प्रक्रियेसाठी आवश्यक असणारा निविदा कक्ष उभारणेस मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढ सविनय सादर.

**निर्णय क्र.८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील विविध कामांसाठीच्या रुपये ५ लाख किंवा रु.५ लाखा पेक्षा जास्त रक्कमेच्या सर्व निविदा ई-टेंडर व्दारे mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन प्रकाशित करणेस, NIC या संस्थेकडून एक तंत्रज्ञ पुर्णवेळ घेणेसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



**तसेच, Digital Signature करीता येणाऱ्या खर्चास व ई-टेंडर प्रक्रियेसाठी आवश्यक निविदा कक्ष उभारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२३** **Setup Box (डिश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेबाबत.**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १०/०१/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८४ नुसार Tata Communications Ltd., Mumbai यांचेमार्फत श्रींचे ऑनलाईन दर्शन व आरतीची सुविधा टाटास्काय डिश वर तीन वर्षाचे कालावधीसाठी Exclusive स्वरुपात दिनांक १४/११/२००९ ते दिनांक १३/११/२०१२ या कालावधी करीता देण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक १३/११/२०१२ रोजी सदर सेवा संपुष्टात येत आहे. यामुळे Setup Box (डीश) वर लाईव्ह दर्शन सुविधेसाठी फक्त Tata Communications Ltd., Mumbai यांचे प्रस्ताव विचारात घेता येणार नाही. Setup Box (डीश) सुविधा देणाऱ्या इतरही कंपन्या असल्याने त्यांचे प्रस्ताव मागविल्यास संस्थानला मिळणारी रॉयल्टी वाढेल तसेच प्रतिस्पर्धी तयार होऊन साईभाक्तांना गुणवत्ता पुर्ण सुविधा मिळू शकेल, असे नम्र मत आहे.

**अ]** Setup Box (डीश) सुविधा देणाऱ्या भारतीय बाजारात सध्या स्थितीत उपलब्ध असलेल्या कंपन्या पुढीलप्रमाणे आहेत-

| SR. No. | Company Name & Address | Sr No | Company Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | **AIRTEL DISH**<br>**Bharti Airtel Limited**<br>**(A Bharti Enterprise)**<br>Bharti Crescent,<br>1, Nelson Mandela Road,<br>Vasant Kunj, Phase II,<br>New Delhi – 110 070, India<br>Tel. No. : +91 11 46666100,<br>+91 11 42666500<br>Fax No. : +91 11 4166-6137 | 02 | **VIDEOCON D2H**<br>**Bharat Business Channel Limited**<br>1st Floor, Techweb Centre, New Link Road,Near Mega Mall, Oshiwara, Mumbai - 400102. India. |
| 03 | **DISHTV**<br>Dish TV India Ltd. FC - 19,<br>Sector 16 A, Film City,<br>Noida, Uttar Pradesh, India.<br>Pincode - 201 301<br>www.dishtv<br>For Bulk/ Corporate inquiry, mail us at:corporatesales@dishtv.in | 04 | **TATA SKY**<br>Tata Communications Limited.,<br>Plot C21 & C 36 'G' Block<br>Bandra Kurla Complex, Vidyanagari,<br>Mumbai. 400 098.<br>MAHARASHTRA 20-60001771<br>nodalofficermaharashtra@tatasky.com |
| 05 | Reliance Digital TV Limited<br>Busindess Head Quarters, 4th Floor,<br>B wing Dhirubhai Ambani Knowledge City<br>Navi Mumbai- 400 710.<br>Content.enquairy@reliancedigitaltv.com | 06 | **SUN TV**<br>Naveen Shukla<br>SUN DIRECT TV (P) LTD, No.701/702,<br>Dilkap Chambers, Andheri West, Off Andheri Link Road, Mumbai - 400053<br>E-mail: nodalmah@sundirect.in<br>Phone: 022- 42109797<br>Fax: 022 – 42109721 |

उपरोक्त नामांकित कंपन्याचे प्रस्ताव मागणी करता यईल. त्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले नंतर संबंधितांना वाटाघाटीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलावून Exclusive किंवा Non-Exclusive सेवेबाबत विचार करावा अशा प्रकारची निवड प्रक्रिया असावी, असे नम्र मत आहे.

**ब]** संस्थान आवक क्र. ११५३४ दिनांक २७/१०/२०१२ रोजीचे Tata Communications Ltd., Mumbai यांनी पुढील पाच वर्षासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यांनी प्रथव वर्षासाठी रक्कम रुपये १,७५,००,०००/- इतकी रॉयल्टी देऊ केलेली आहे. व पुढील चार वर्षाकरीता प्रती वर्षी ७.५ % वाढ करणारे असलेबाबत व सदर प्रस्तावात Global Exclusive rights DTH व Internet ची मागणी केलेली आहे.

त्यामुळे Internet ची सेवा कशी वापरणार याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. Tata Communications Ltd., Mumbai यांचा Setup Box (डीश) सुविधेचा करारनामा दिनांक १३/११/२०१२ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे वरील ध्अ मध्ये नमुद केलेप्रमाणे निवड प्रकियाची कार्यवाही करणेसाठी विलंब लागणार आहे. त्यामुळे Tata Communications Ltd., Mumbai यांचे सिग्नल प्रस्तावीत तारखेनंतर बंद करणे अथवा त्यांनी सादर केलेल्या नविन प्रस्तावानुसार मिळणाऱ्या रॉयल्टीच्या रक्कमेवर ध्अ मध्ये नमुद केलेप्रमाणे निर्णय प्रकिया पूर्ण होईपर्यंत सदर सुविधा चालू ठेवणेबाबत निर्णय घेण्यात यावा, असे नम्र मत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त अ नुसार Setup Box (डीश) सुविधेसाठी लाईव्ह दर्शन सुविधेसाठी निवडप्रक्रिया राबविणेबाबत व ब नुसार Tata Communications Limited., Mumbai यांचे करारनाम्या मुदत संपलेनंतर निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत Tata Communications Limited., Mumbai यांना लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल त्यांनी नविन सादर केलेल्या प्रस्तावानुसार पुरविणेची मान्यता मिळणेसाठी सादर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या 'अ' नुसार Setup Box (डीश) सुविधेसाठी लाईव्ह दर्शन सुविधेसाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्या व 'ब' नुसार Tata Communications Limited., Mumbai यांचे करारनाम्याची मुदत संपलेनंतर निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत Tata Communications Limited., Mumbai यांना त्यांनी सादर केलेल्या नविन प्रस्तावानुसार लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुरविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२४** **न्युज एक्सप्रेस, नोएडा या चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३६ नुसार दि. ०१/०४/२०१२ ते दि. ३१/०३/२०१३ या अर्थिक वर्षासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ नुसार ठरलेल्या रक्कमेत १०% वाढ करण्यात यावी, तसेच सदर कालावधीत करण्यात येणाऱ्या सर्व प्रस्तावांसाठी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा सुरु करणेत यावी, असे ठरलेले आहे. त्यानुसार दिनांक ०१/०४/२०१२ ते दिनांक ३१/०३/२०१३ अखेर नविन किंवा नुतनिकरण कराण्यात येणा-या करारनाम्यांना आकरण्यात येणारे दर खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **तपशिल** | **सन २०११-२०१२ या अर्थिक वर्षाचे दर** | **सन २०१२-२०१३ या अर्थिक वर्षाचे दर** |
|---|---|---|---|
| ०१ | काकड आरती | ८,००,०००/- | **८,८०,०००/-** |
| ०२ | इतर सर्व आरत्यांसाठी प्रती आरती | ५,००,०००/- | **५,५०,०००/-** |
| ०३ | सर्व आरत्या व संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन | २३,००,०००/- | **२५,३०,०००/-** |

उपरोक्त संदर्भ क्र. ०२ ने News Express, Noida यांनी काकड आरतीचे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल मिळणेसाठी विंनती केलेली आहे. News Express, Noida यांना एक वर्षाचे कालावधीसाठी काकड आरतीचे लाईव्ह दर्शन सुविधा उपलब्ध करुन देऊन दिनांक १२/०६/२०१२ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णक क्र.४३६ नुसार एक वर्षासाठी रक्कम रु.८,८०,०००/- रॉयल्टी घेणेच्या मान्यतेस्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात याव्यात. सदरच्या निविदांची मागणी करतांना प्रत्येक स्वंतत्र आरतीसाठी, सर्व आरत्यांसाठी, तसेच, सर्व आरत्या व संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुरविणेसाठी रॉयल्टीपोटी किती रक्कम देणार, अशा पध्दतीने निविदा मागणी करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**<u>दि.०७.०२.२०१३ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-</u>**

**विषय नं.२५** **श्रींचे दर्शनहॉल क्र.०१ ते ०४ व मंदिर परिसरात महत्वाचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्रींचे मंदिर व परिसरात ट्रायकलर कन्सल्टंट मुंबई(सुरक्षा सल्लागार) यांचे मार्गदर्शनाखाली दि.०६.०३.२०१० रोजीचे मा.व्य.मंडळाचे सभेतील विषय नं.१०,निर्णय क्र.२८३ नुसार मे.व्हेन्टेज इंटेग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा यांची आत्याधुनिक सुरक्षा साहित्य पुरविणेबाबत निवड झालेली असुन त्यांना जा.नं. एसएसएस/ वशी/ संरक्षण/५९५८ दि.१४.०४.२०१० अन्वये मंदिर व परिसरात सिक्युरिटी सिस्टीम कार्यान्वित करणेसाठी व त्याकामी लागणारे सुरक्षा साहित्यांचा पुरवठा करणेबाबतचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, नाईडा (पुरवठादार) या कंपनीमार्फत अद्यावत सुरक्षा साहित्य कार्यन्वित करण्यात आलेले आहे.

परंतु खाली नमुद केलेल्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले नसल्याने मा.अध्यक्ष महोदयांनी दि.२३.०५.२०१२ व दि.०७.०६.२०१२ रोजी मंदिर व परिसराची पाहणी करुन त्यांनी देणगी काऊंटर नं.०३ व जनसंपर्क कार्यालयाजवळ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे बाबत सुचित केले आहे. तसेच दि.१७.०४.२०१२ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली सुरक्षा बाबत

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



झालेल्या मिटींग मध्ये श्रींचे दर्शन हॉल व लेखाशाखा स्ट्रॉगरुम येथे (नाईट व्हिजन कॅमेरा) बसविणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार संस्थानचे टेक्निकल सुपरवायझर श्री विनोद कोते,श्री साईप्रसाद जोरी यांनी मंदिर परिसराची व दर्शनहॉलची पाहणी केली.व त्यांनी बसविणेत येणारे सी.सी.टी.व्ही.कॅमे-यांची संख्या व ठिकाणे पुढील प्रमाणे निश्चीत केलेले आहे.

| अ नं. | कॅमेरे बसविण्याचे ठिकाण | कॅमेऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | दर्शनहॅाल क्रं.-१ | ०३ |
| २ | दर्शनहॅाल क्रं.-२ | ०२ |
| ३ | दर्शनहॅाल क्रं.-३ | ०२ |
| ४ | दर्शनहॅाल क्रं.-४ | ०२ |
| ५ | देणगी काऊंटर नं.०३ | ०१ |
| ६ | समाधी मंदिर नंदीजवळ | ०२ |
| ७ | मंदिर परिसर | ०२ |
| ८ | लेखाशाखा स्ट्रॉंगरुम(नाईटव्हिजन कॅमेरा) | ०१ |
| ९ | जनसंपर्क कार्यालय | ०१ |
| | **एकुण नग** | **१६** |

उपरोक्त बसविण्यात येणाऱ्या कॅमेऱ्यांचे व्यतिरिक्त श्रींचे समाधी मंदिर व परिसरात मे.व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन नोईडा या कंपनीमार्फत सोनी कंपनीचे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. तसेच याव्यतिरिक्त मे. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन या कंपनीचे (स्वत:चे) सी.सी.टी. व्ही.कॅमेरे असल्याने त्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचा डेमो सदर कंपनीचे मालक श्री प्रणव वर्मा यांनी मध्यवती नियंत्रण कक्षात मा.कार्यकारी अधिकारी सो, उप-कार्यकारी अधिकारी सो. व संस्थानचे टेक्निकल सुपरवायझर श्री विनोद कोते, श्री साईप्रसाद जोरी यांना प्रत्यक्षपणे दाखविला आहे.वरील नमुद केलेल्या कॅमेऱ्यांसाठी आवश्यक साहित्य (उदा. सॉफ्टवेअर, एल.सी.डी. मॉडयुल्स व इतर साहित्य) इत्यादी खरेदी करणेसाठी व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन नोईडा यांनी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१. सोनी कंपनीचे कॅमेरे व साहित्यांचे सर्व करांसह एकुण बजेट रु.३०,५८,३९८/- (अक्षरी रु. तिस लाख,अठ्ठावन्न हजार, तिनशे अठ्ठयांन्नो मात्र)
२. व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन नोईडा या कंपनीचे (स्वत:चे)कॅमेरे व त्यासंबधिचे साहित्यांचे सर्व करांसह एकुण बजेट रु.१८,७०,५६२/- (अक्षरी रु.आठरा लाख,सत्तर हजार,पाचशे बासष्ट मात्र)असे दोन्ही कंपन्यांचे वेगवेगळे बजेट व त्यासंबधी कॅमेऱ्यांचा तांत्रिक विश्लेषण तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ टिपणी सोबत जोडण्यात आलेला आहे.

वरिल ठिकाणी बसविण्यात येणाऱ्या कॅमेऱ्यांचे लोकेशन नुसार वायरिंग, डिगींग, कन्ड्युट व त्यासंबंधीचे साहित्यांचा येणारा खर्च उपरोक्त दोन्ही बजेटच्या व्यतिरिक्त असेल असे कळविलेले आहे. करीता उपरोक्त ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यन्वित करणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी उपरोक्त दोन्ही बजेट त्या संबधी साहित्यांसाठी जादा येणारा खर्च व त्या संबधिच्य तांत्रिक विषयांवर चर्चा करणेसाठी मे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन नोईडा या कंपनीचे मालक श्री प्रणव वर्मा,यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावुन सदर सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व त्यासंबधी साहित्यांसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे व्हेन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन, नोईडा या कंपनीचे एकुण १६ नग कॅमेरे खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१८,७०,५६२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२६** **श्रींचे पालखी/ रथ व चोघडा सेवेकरी यांचे मानधन व वैद्यकीय सवलतीबाबत.**

**प्रस्ताव -** दि.२५/११/२०१२ चे दैनिक वृत्तपत्रामध्ये "साई पालखीच्या सेवेकऱ्यांची परवड" या शिर्षकाखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्याचबरोबर सुमारे ३० शिर्डी ग्रामस्थांनी सेवेकऱ्यांना सवलती देणेबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

श्रींचे पालखी/ रथ व आरतीचे वेळी चौघडा वाजविणारे सेवेकरी यांचे बाबतीत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे-

सध्या श्रींचे रथाची व पालखीची मिरवणूक दर गुरुवारी, स्थानिक उत्सव व तसेच श्री साईबाबाचे श्रीगुरुपौर्णिमा उत्सव, श्रीरामनवमी उत्सव व श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव या तीन प्रमुख उत्सवाचे वेळी असते. प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर ते चावडी मंदिर व चावडी मंदिर ते परत समाधी मंदिर अशी पालखीची मिरवणूक असते. सदर श्रींचे पालखी/ रथ मिरवणूकीचे वेळी पालखी/रथ धरणारे सेवेकरी-०४, अब्दागिरी धारक-०१, सनईवादक-०१, शिंगवादक-०१, ढोलवादक-०१, ताशावादक-०२, डफवादक-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१, तसेच बत्तीधारक-०२ चौघडा वादक-०१ असे एकूण १४ सेवेकरी हजर असतात. त्यांना प्रत्येकी दरमहा रु.२५०/- देण्यात येत होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१२/२०१०च्या सभेपुढे सदर पालखी/ रथ तसेच आरतीचे वेळी चौघडा वाजविण्याचे काम करणारे सेवेकऱ्यांना सध्या मिळत असलेल्या मानधनात प्रत्येकी दरमहा रु.११००/- (एक हजार शंभर मात्र) मानधन व स्वतः सेवेकरी, पत्नी व त्याचे ३ मुले यांना श्री साईनाथ रुग्णालयामध्ये त्यांचे आजारपणात मोफत औषधोपचाराची सवलत देणेत यावी असे मंदिर विभागाकडुन प्रस्ताव दिलेला होता. मात्र सदर सभेत सविस्तर चर्चा होऊन सेवेकऱ्यांना रु.५००/- एकत्रीत मानधन देण्यात यावे असा निर्णय झालेला होता. वैद्यकीय सवलतीबाबत चर्चा करताना तोंडी चर्चा झाली होती, निर्णय घेण्यात आलेला नाही.

त्यांना डिसेंबर-२०१० पासुन प्रत्येकी दर रु.२५०/- ऐवजी प्रतिमहा रु.५००/- मानधन देण्यात येत आहे. मानधन अदा करतांना हजर असलेल्या सेवेप्रमाणे रक्कम अदा करण्यात येते.

उपरोक्तप्रमाणे सेवेकऱ्यांच्या कामाचा मोबदला म्हणून रु.५००/- प्रति महिना मानधन देण्यात येत आहे. त्यांना संस्थान कर्मचारी म्हणून कोणतीही सेवा सुविधा देण्यात येत नाहीत. सदर सेवेकरी यांना पालखी/ रथ मिरवणूकीला हजेरीच्या प्रमाणे मानधन अदा करण्यात येते. तसेच वरील सेवेक-यांना वर्षातून एक गणवेष देण्यात येतो.

त्यांना कोणत्याही प्रकारची वैद्यकिय सेवा सुविधा पुरविण्यात येत नाही. वरील सर्व सेवेकऱ्यांचे वडील वगैरे (वंशज) सेवा करीत असे. आता त्यांची मुले, नातलग सेवेकरी म्हणून काम करतात. या सर्व बाबींचा विचार होऊन त्यांना खालीलप्रमाणे सेवा/सुविधा पुरविणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

१. दरमहा प्रत्येकी रु.११००/- मानधन (हजर असलेल्या सेवेप्रमाणे)

२. वर्षातून एक वेळेस गणवेष.

३. सेवेकरी व त्यांचे कुटूंबियांना संस्थानचे कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकिय सेवा.

तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे पालखी/ रथ व चोघडा सेवेकऱ्यांना सोयी-सुविधा पुरविणेबाबत सद्यः परिस्थितीत चालू असलेल्या कार्यवाहीमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.२७** **मंदिर परिसरात पुर्णवाद प्रणेते सदगुरु प.पू. रामचंद्र महाराजांची मुर्ती स्थापनेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री लालसिंग नारायणसिंग परदेशी, रा.कल्याण व पारनेरकर गुरुसेवा मंडळ, पारनेर यांनी वेळोवेळी सदगुरु प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे शुभहस्ते विजयादशमी दि.२९/०९/१९५२ रोजी समाधी मंदिर कलशारोहणाचा समारंभ झालेला आहे. त्याबाबत अध्याय क्र.०५ मध्ये उल्लेख आहे. त्यामुळे सदगुरु प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांची संस्थान परिसरात पुर्णाकृती मूर्ती बसविणेत यावी अशी विनंती दि.१०/११/२०१२ रोजीचे अर्जामध्ये केली आहे.

सदगुरु प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे शुभहस्ते समाधी मंदिराचा कलशारोहणाचा समारंभ झालेबाबत नंदीचे मूर्तीजवळ मंदिराचे मुख्य प्रवेशद्वाराचे लगतच्या भिंतीवर साईभक्तांना दिसेल अशा पद्धतीने दर्शनीय भागात कोनशिला लावणेत आलेली आहे. मात्र अर्जदार श्री परदेशी व पारनेरकर गुरुसेवा मंडळ, पारनेर यांनी विनंती अर्जात नमूद केल्याप्रमाणे श्रीसाईसच्चरितामध्ये अध्याय क्र.०५मध्ये मंदिर कलशारोहणाचा उल्लेख आढळुन येत नाही, असे आहे.

संस्थानचे मंदिर परिसरात शिर्डीचे ग्रामदैवताशिवाय इतर कोणत्याही मूर्ती बसविण्यात आलेल्या नाही. त्यामुळे श्री लालसिंग नारायणसिंग परदेशी, रा.कल्याण व पारनेरकर गुरुसेवा मंडळ, पारनेर यांचे विनंती अर्जानुसार संस्थान परिसरात प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांची मूर्ती बसविणेबाबत विनंती मान्य केल्यास इतर साईबाबांचे समकालीन साईभक्तांच्या मूर्ती बसविणेची मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुर्णवाद सदगुरु प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांची मूर्ती संस्थान परिसरात बसवू (लाऊ) नये असे वाटते. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री लालसिंग नारायणसिंग परदेशी, रा.कल्याण व पारनेरकर गुरुसेवा मंडळ, पारनेर यांनी प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांची संस्थान परिसरात पुर्णाकृती मूर्ती बसविणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.२८** **द्वारावती भक्तनिवासमधील नवीन जनसंपर्क कार्यालयाच्या फर्निचरबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०७.०९.२०१२ रोजीचे मंजूरीन्वये जनसंपर्क कार्यालय हे व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये स्थलांतरीत करणेबाबतचे निर्देश मा.अध्यक्ष सो.यांनी दिलेले आहेत. त्याअनुषंगाने व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये जनसंपर्क कार्यालयाकरीता फर्निचरसह आवश्यक ती कामे बांधकाम विभागाने सुरु केली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मात्र कार्यालयीन वापरासाठी लागणारे उर्वरीत रेडीमेड फर्निचर (टेबल खुर्च्या) इत्यादी साहीत्य खरेदी विभागामार्फत उपलब्ध करुन घ्यावेत, असे बांधकाम विभागाने दिनांक ०१.११.२०१२ रोजीचे पत्राने कळविले आहे. त्याअनुषंगाने जनसंपर्क विभागाचे दैनंदीन कार्यालयीन कामासाठी गोदरेज टेबल ०२ नग, गोदरेज कपाट ०२ नग, गोदरेज खुर्ची ०८ नग, गोदरेज मांडणी ०४ नग आदि साहीत्याची आवश्यकता असल्याने, सदर साहीत्य खरेदीकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता मिळून सदरचे साहीत्य खरेदी विभागामार्फत खरेदी करुन मिळावे. उपरोक्त विषयावर मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये जनसंपर्क कार्यालय सुरु करणेकरीता आवश्यक असलेले फर्निचर खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.२९** **डेडस्टॉक वस्तुंवर संगणक कोड नंबर स्टिकल पेन्टींगचे कामाबाबत.**

**प्रस्ताव -** साईआश्रम- १ व साईआश्रम- २ विभागातील असलेल्या डेडस्टॉक, किरकोळ डेडस्टॉक वस्तुंवर विगतवारीसाठी संस्थान रेकॉर्डला असलेला संगणक कोड नंबर पेन्टींग करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधीत विभागात असलेल्या व रेकॉर्डनुसार असलेल्या वस्तु यांचा ताळमेळ दरवर्षी घेणे सोपे होते.

संगणक कोड नंबर पेंटर यांचे मार्फत पेटींगच्या माध्यमाने सुबक, सुंदर किंवा स्क्रीन पेटींगद्वारे नावे टाकुन घेणे पध्दत होती परंतु आधुनिक संगणकीकरणामध्ये नावाचे स्टिकर / पेटींग तयार करुन घेता येतील. सदरह कामी दराबाबत स्थानिक पेंटरकडे चौकशी केली असता त्यांनी या कामासाठी प्रती नगास अंदाजे रु. १०/- (अक्षरी रुपये दहा मात्र) खर्च अपेक्षित आहे. असे सांगितले.

साईआश्रम - १ व साईआश्रम - २ विभागातील पेटींग करणे आवश्यक असलेल्या डेडस्टॉक वस्तु खालील प्रमाणे आहेत.

| अ. नं. | वस्तुचे नाव | साईआश्रम -१ नग | साईआश्रम- २ नग | एकुण नग | अंदाजे दर रुपये | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्लॉस्टिक खुर्ची | ३१५० | २५ | ३१७५ | १०/- | ३१,७५०/- |
| २ | लोखंडी रॅक | ५५० | ३०० | ८५० | १०/- | ८,५००/- |
| ३ | लोखंडी कॉटस् | ४६१० | ९६० | ५५७० | १०/- | ५५,७००/- |
| ४ | गोदरेज टेबल | ५० | २५ | ७५ | १०/- | ७,५०/- |
| ५ | थ्री सिटर सोफा स्टिल | ५० | ५० | १०० | १०/- | १,०००/- |
| ६ | रिव्हॉलविंग चिअर कार्यालय | ३ | ३ | ६ | १०/- | ६०/- |
| ७ | रिव्हॉलविंग चिअर बुकींग कांऊटर | १६ | ८ | २४ | १०/- | २,४०/- |
| ८ | व्हिजीटर चिअर | ८ | ७ | १५ | १०/- | १,५०/- |
| | | | **एकुण** | **९८१५** | | **९८,१५०/-** |
| **अक्षरी रुपये - अठ्ठयान्नव हजार एकशे पन्नास मात्र** | | | | | | |

सदर पेंटीग कामासाठी अंदाजे रु. ९८,१५०/- पुर्णाकींत रक्कम रु.१,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत असून ही कामे त्वरीत करुन घ्यावयाची आहे.

यासाठी नियमाप्रमाणे दरपत्रके मागविणे व येणा-या खर्चास प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदर विषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.३०** **जमा होणाऱ्या सेवाआकार रकमेच्या सुरक्षीततेसाठी दोन लोखंडी तिजोरी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईंचे दर्शनासाठी शिर्डीस येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यादृष्टीने भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी श्री साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दिलेले देणगीतुन संस्थानने साईआश्रम भाग १ व साईआश्रम भाग २ या भव्य इमारतींचे बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम पुर्ण झालेले असुन सदरच्या इमारती भक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

साईआश्रम- १ व साईआश्रम- २ मध्ये सर्व रुम आरक्षीत झालेवर साधारण साईआश्रम १ साठी रुपये नऊ लाख तसेच साईआश्रम- २ साठी रुपये पन्नास हजार मात्र पर्यंत रोख रक्कम सेवाआकार म्हणुन कांऊटरला असणार आहे. सदर रक्कम सुरक्षित ठेवणे कामी चांगल्या कंपनीच्या दोन लोखंडी तिजोरी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(३ फुट x २ फुट) खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस तसेच याकामी येणारी अंदाजे खर्च रु. १,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे.

सदर विषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.३१** **साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे गरमपाणी वाटप मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव -** उपरोक्त विषयाकींत संदर्भीय अर्जाने,चेअरमन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि., शिर्डी यांनी, नविन भक्तनिवासस्थान (५००रुम) येथे चालवत असलेल्या स्नानगृह (गरमपाणी) या व्यवसायाची मुदत दि. ०५/११/२०१२ रोजी पुर्ण होत असल्याने सदर व्यवसाय पुढील पाच वर्षाकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थानने, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये (५०० खोल्या) येथे साईभक्तांची राहण्याची सोय केलेली आहे. सदर इमारतीत एकुण ४ विंग असुन एकुण ४९२ खोल्यांमध्ये अंदाजे २००० साईभक्तांची निवासाची सोय होते. साईभक्तांना स्नानाकरीता गरमपाण्याची सोय व्हावी म्हणुन दि.१३/१२/२००१ व नंतर दि.०१/०३/२००४ पासुन संस्थानने सोलर वॉटर हिटींग सिस्टीम उभारलेली आहे.त्यासाठी संस्थानने रु.३८,६०,०००/- एवढा खर्च केलेला आहे. सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे ४ विंग्जसाठी ५४ हजार लिटर पाणी गरम होण्याची क्षमता असुन सदर पाणी ४,५०० लिटर क्षमतेच्या १२ टाक्यामध्ये साठविण्याची व्यवस्था केलेली आहे.

दि. २९-३०/०५/२००४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत विषय नं.५६ निर्णय क्र. २६४ अन्वये, ठरावास अनुसरुन दि. ०१/०३/२००४ पासुन,भक्तनिवासस्थान इमारतीतील ४ विंगमधील खोल्याकरीता सोलर वॉटर हिटींग सिस्टीमद्वारे होणारे गरमपाणी प्रत्येक माळयावरील स्टोअर रुम ते साईभक्तांच्या खोल्यांपर्यंत वितरणाची व्यवस्था व त्या अनुषंगिक खर्च याकरीता प्रती बादली, प्रती व्यक्ती, प्रती दिवशी रु.३/- (रुपये तीन मात्र) प्रमाणे जमा होणारे रक्कमेपैकी मा. चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांना अर्धी रक्कम रु. १.५० पैसे मात्र याप्रमाणे प्रत्येक महिन्यानंतर अदा करण्यात येत आहे.

दि.१४/०१/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१२५, निर्णय क्र - १२६ नुसार,यावर सविस्तर चर्चा होऊन, पुर्वीचेच अटी-शर्तीवर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले,असा ठराव मंजुर झालेला आहे.

प्रचलीत पद्धतीनुसार, लिव्ह ॲण्ड लायसेन्सी करारनामा रु.६००/- चे स्टॅंम्प पेपरवर लायसेन्सॉर-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व लायसेन्सी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांचेमध्ये करारनामा दि. ०६/१२/२०११ ते दि. ०५/११/२०१२ अखेर (११ महिने) या कालावधीसाठी झाला असुन त्याची मुदत दि.०५/११/२०१२ रोजी संपुष्टात येणार आहे.

एक वर्ष किंवा अधिकची मुदतवाढ याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन त्रि-सदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे भक्तांना गरमपाणी पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.,शिर्डी यांना या आधीचे करारनाम्यातील अटी/ शर्तीनुसार दि.०६.११.२०१२ पासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.३२** **पेस्ट कंट्रोल एम वॉल्श, मुंबई यांचे करारनाम्याबाबत.**

**प्रस्ताव -** दि.०१/०६/२०११ ते ३१/०५/२०१२ अखेर एक वर्षासाठी संस्थानने नेमुण दिलेल्या भक्तनिवासस्थानामध्ये किटकाशक औषधफवारणीचे काम आदेश नंबर-एसएसएस/वशी-साभनि/ १४८०/ २०११ दि.२२/०६/२०११ अवन्ये मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांना देण्यात आले होते.

संबधीत पार्टीचे काम अत्यंत असमाधानकारक असल्याने,किटकांचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणावर वाढल्याने साईभक्तांनी मोठया प्रमाणावर तक्रारी केल्या. प्रत्यक्ष पहाणीमध्ये हि सदर बाब निर्दशाास आल्याने सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे सभेसमोर सविस्तर टिपणीव्दारे सादर करण्यात आली यावर सविस्तर चर्चा होऊन मे. यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंटोल,पुणे यांचे काम समाधानकारक नसल्याने नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी जाहिरात देऊन निवादा मागविण्यात याव्यात. नविन ठेकेदाराची नियुक्ती झालेनंतर मे. यशोमंगल फर्चिर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे यांची निविदा रद्द करण्यात यावी असे ठरले. त्यानुसार दि. २५/०८/२०१२ रोजीचे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सभेमध्ये विषय नंबर-४४ व निर्णय क्रं- ६९९ अन्वये दि. ०१/०६/२०१२ ते ३१/०५/२०१३ अखेर एक वर्षाचे पेस्ट,रोडंट कंट्रोल व फॉगिग ट्रिटमेटंचे काम मे.पेस्ट कंट्रोल एम.वाल्श, मुंबई यांचेकडुन करुन घेण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.

साईभक्तांना किटकांचा होणारा त्रास लक्षात घेता,दि.०३/०७/२०१२ चे मंजुर टिपणीअन्वये जा.-नं.एसएसएस/वशी-साभनि/१६३३/२०१२ दि.१३/०७/२०१२ रोजी संबधीत पार्टीस कार्यादेश पारीत करण्यात आला. पार्टीने दि.२२/०७/२०१२ पासुन प्रत्यक्ष औषधफवारणीस सुरुवात केली त्यामुळे दि.२५/०८/२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयामध्ये कामाचा कालावधी ०१/०६/२०१२ ते ३१/०५/२०१३ असा नमुद करण्यात आला.

कार्यादेश दि.१३/०७/२०१२ रोजी पारीत केल्याने पेस्ट,रोडंट कंट्रोल,फॉगिग ट्रिटमेटंचा कालावधी दि.१३/०७/२०१२ ते दि.१२/०७/२०१३ असा एक वर्षाचा ठेवावा लागणार आहे व संबधीत पार्टीकडुन करुन घ्यावयाचा करारनामा हि याच कालावधीचा करावा लागणार आहे. सदर बदलाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.३३** **सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) कामाची निविदा मागविणे, वर्तमान पत्रात जाहिरात देणेबाबत.**

**प्रस्ताव -** द्वारावती भक्तनिवास विभागामध्ये ८० एसी व २६४ नॉन एसी अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. त्या खोल्या भक्तांनी खाली केलेनंतर त्याची साफ सफाई तसेच हाऊस किपींग व द्वारावती विभागाचा इतर परिसराची स्वच्छता इत्यादी कामे, आऊट सोर्सिंग पद्वतीने करुन घेतले जातात.

संस्थानच्या द्वारावती भक्तनिवास विभागाकडे मे.बी.व्ही.जी.इंडीया प्रा.लि,पुणे ही कंपनी दि.०१/०४/२०१० पासुन स्वच्छता व हाऊसकिपींगची कामे आऊटसोर्स पद्धतीने सध्या करत आहे.

त्यांना उपरोक्त कामासाठी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.२०९ व कार्यादेश जा.एसएसएस/वशी-द्वारावती / २३०/ २०११ दि.०८/०४/२०११ अन्वये स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी, केमीकल्स व प्रतिदिनी ७६ कर्मचा-यासह दरमहा सर्व करासह रु. ६,२५,०००/- चा कार्यादेश देण्यात आलेला होता.

सन २०११-१२ या वर्षातील अटी-शर्ती व दरमहा रु.६,२५,०००/- वर १६% वाढ रु.१,००,०००/-देऊन सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी मा.व्यवस्थापन मंडळ सभा दि.१९/०२/२०१२ मधील निर्णय क्रं. २४३ व कार्यादेश जा.नं.एसएसएस/वशी-द्वारावती/२५९/२०१२ दि.१७/०४/२०१२ अन्वये स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी, केमीकल्स व प्रतिदिनी ७६ कर्मचा-यासह दरमहा सर्व करासह रु.७,२५,०००/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.या कामाची मुदत दि.३१/०३/२०१३ अखेर संपुष्टात येत आहे.

दिनांक ०१/०४/२०१३ ते दिनांक ३१/०३/२०१४ या आर्थीक वर्षासाठी द्वारावती भक्तनिवास इमारत व परिसराचे स्वच्छता व हाऊसकिपींग कामे आऊटसोर्सींग पद्धतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे. त्याकरीता मोठया विविध प्रकारच्या मशिनरी ७, निविदेत नमुद केले प्रमाणे लहान विविध उपकरणे, स्वच्छतेचे केमिकल्स् तसेच पदनिहाय ७६ कर्मचा-यासह हाऊसकिपींग कामाकरीता (आऊट सोर्सींग) उपरोक्त कालावधीसाठी नव्याने नामांकित कंपन्याकडून निविदा मागविणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस व नव्याने निवीदा तयार करुन त्या विक्रीस ठेवणे व भरुन आलेल्या निविदा स्विकारणेस तत्वतः मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता व्दारावती भक्तनिवास इमारत व परिसर स्वच्छता/ हाऊसकिपींग (आऊट सोर्सिंग) काम करुन घेणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.३४** **दि.२९.११.२०१२ ते दि.२८.११.२०१३ अखेर द्वारावती इमारतीतील टीव्हींच्या टाटास्काय कनेक्शनची फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव -** द्वारावती इमारतीत असलेल्या ८० व्हीआयपी रूममध्ये उतरलेल्या साईभक्तांना टीव्हीवर बातम्या व इतर चॅनेल पाहता यावे यासाठी दि.०४/०७/२०१० रोजी झालेल्या मा.व्य.समीतीच्या सभेत निर्णय क्र. ५८१ नुसार ८० टाटा स्काय कनेक्शन घेण्यात आले आहे.त्याची रिचार्ज फि दि.२८/११/२०१२ रोजी संपत असल्याने पुढील वर्षाकरीता दि.२९/११/२०१२ ते २८/११/२०१३ पर्यंत ८० रूमचे ८० कनेक्शन रिचार्ज करावयाचे आहेत.सध्या टाटा स्काय कंपनीतर्फे धमाल मिक्स पॅक हे २००/- रूपये दर महिन्यास फी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



असलेले पॅकेज आहे.यामध्ये रेग्युलर ७१ चॅनेल व रिजनल पॅकमध्ये तेलगू पॅकेजमध्ये असलेले १२ असे एकुण ८३ चॅनेल दिसतात.

याशिवाय एका वर्षासाठी ११ महिन्यांची फी भरण्याची सवलत असून एकुण कनेक्शन पैकी प्रत्येकी ०४ कनेक्शनचे एक ग्रुप केल्यास एक कनेक्शनसाठी दरमहा २००/- रू. व उर्वरीत तीन कनेक्शनला दर महिन्याला १६०/-रूपये भरण्याची कंपनीची सवलत आहे. ८० रूमचे २० ग्रुप व ६० कनेक्शन होतात. त्याप्रमाणे ०१ वर्षाची फी रु.१,४९,६००/- होत आहे.

टाटास्कायचे अधिकृत डिलर श्री रूपचंद भागचंद कासलीवाल,श्रीरामपुर यांनी ०१ वर्षाकरीता ८० रुमच्या फी कनेक्शन करीता रूपये १,४९,६००/- चे कोटेशन दिले आहे.रिचार्ज फी भरणे तातडीचे असल्याने दि.२९/१०/२०१२ ची मंजुर टिपण्णी व जा.क्र.एसएसएस/वशी-३६६५/२०१२ दि.१६/११/२०१२ च्या आदेशान्वये श्री कासलीवाल यांनी टाटास्काय रिचार्ज करून बिल क्र.१०२१ दि.०१/१२/२०१२ अन्वये रक्कम रु.१,४९,६००/- ची मागणी केली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे फी भरणेपोटी येणाऱ्या रु.१,४९,६००/- (अक्षरी रूपये एक लाख एकुणपन्नास हजार सहाशे मात्र) चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी, हि विनंती.

**निर्णय क्र.९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२९.११.२०१२ ते दि.२८.११.२०१३ अखेर या कालावधीसाठी द्वारावती इमारतीतील टीव्हींच्या टाटास्काय कनेक्शनची फी रक्कम रु.१,४९,६००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३५** **संस्थान परिसरातील झाडांना पाणी देणेसाठी भाडोत्री टँकर लावण्यास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव -** संस्थान परिसरात ठिक-ठिकाणी शोभेची झाडे, फुलझाडे, फळझाडे लावण्यात आलेली आहे. या झाडांना लागणारे पाणी संस्थानचे उपलब्ध केलेल्या पाण्याच्या सोयीतून पाणी घेण्यात येते. या मध्ये परिसरातील विहीरी, बोअर वेल किंवा आवश्यकते नुसार टाक्यातून पाणी घेण्यात येते.

सध्या दुष्काळजन्य परिस्थिती असल्याने संस्थानकडे असलेला पाण्याचा साठा हा पिण्यासाठी किंवा प्रसादालय, निवासस्थान विभाग यांचेसाठी आवश्यक आहे. पिण्याचे उपलब्ध असलेले पाणी झाडांसाठी वापरणे योग्य वाटत नाही.

उन्हाळयात संस्थान परिसरातील नवीन भक्त निवास परिसरातील बोअरचे पाणी कमी पडते. मंदिर परिसरातील बोअरचे पाणी हे पाणी पुरवठा विभाग मंदिर परिसरातील वापराच्या पाण्यासाठी ताब्यात घेते, धर्मशाळा येथे बोअरचे पाणी कमी पडल्याने, साईनगर येथील विहीरीचे पाणी साईनगर निवासस्थाना साठी वापरात येत असल्याने या ठिकाणी व नवीन श्री साईप्रसाद परिसरतील झाडे व साई आश्रम येथे नव्याने लावण्यात आलेली झाडांना पाणी देणेसाठी टँकरने पाणी गरजेचे वाटते.

सावलीच्या, मोठया झाडांना आत्ता पासून उन्हाळा संपे पर्यत पाणी देणे गरजेचे असल्याने या झाडांना टँकरच्या साहयाने पाणी देता येईल. सर्व साधारणतः एका महिन्यात दोन वेळेस पाणी देणे आवश्यक असते. यासाठी दरमहा १५ टँकर लागतील. (माहे जानेवारी-१३ ते जुलै-१३) अखेर ७ महिन्यासाठी १५ x ७ = १०५.

ट्रिप होतील याकामी रु.४००/-( पाणी, वाहतूकीचे दरांसह ) प्रति ट्रिप प्रमाणे रु.४२,०००/- (रु. बेचाळीस हजार) मात्र खर्च येईल. संस्थान परिसरातील झाडांना पाणी देणेसाठी भाडोत्री टँकर लावणेकामी दरपत्रके मागवून भाडोत्री टँकरच्या साहयाने झाडांना पाणी देता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी- २०१३ ते जुलै-२०१३ याकालावधीमध्ये संस्थान परिसरातील झाडांना पाणी देणेसाठी दरपत्रके मागवून भाडोत्री टँकर लावणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायातील लेथ मशिनचा पार्ट नविन बनविणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा औ.प्र.संस्थेमध्ये मशिनीष्ट ग्राईंडर हा व्यवसाय सन १९९३ साली सुरु करण्यात आला. या व्यवसायाकरीता आवश्यक असणारी किर्लोस्कर कंपनीची लेथ मशिन मॉडेल नं. Enterprise १३३० ही मशिन १९९४ साली रु.१९८९३१/- ला खरेदी केली आहे. या मशिनवर दररोज दोन शिप्टमध्ये व्यवसायाशी संबधीत प्रात्यक्षिकाचे जॉब प्रशिक्षणार्थ्यांकडून Accuracy मध्ये बनतात.

आता सद्या सदर मशिनच्या Saddle वरील क्रॅास स्लाईडचा Dovetail Groove हा पार्ट काम करतांना तुटला आहे त्यामुळे मशिनवर प्रशिक्षणार्थ्यांना प्रात्यक्षिकाचे जॉब आवश्यक त्या ॲक्युरसीमध्ये बनविता येत नाहीत. सदर मशिन दुरुस्तीसाठी किर्लोस्कर कंपनीचे म्हैसुर येथिल डिलर मे.स्वरुप एंटरप्रायजेस यांचेकडे सदर पार्टबाबत दुरध्वनीव्दारे चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की, कंपनीचे स्पेअर पार्टसचे उत्पादन सद्या बंद आहे. त्यामुळे सदर पार्ट कंपनीकडून मिळणे शक्य नाही.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर पार्ट बनविणेबाबत जा.क्र. आयटीआय/स्टोअर/७११/२०११ दि. १८/१०/२०११ रोजीच्या मंजुरीनुसार किर्लोस्कर कंपनीच्या वेगवेगळया पुरवठादारांकडे सदर पार्ट बनविणेबाबतची चौकशी केली असता कोणाकडेही उपलब्ध नसल्याने ते आता अन्यत्र बनवुन घ्यावे लागणार आहे.

त्याकरीता पुढे नमुद केलेल्या प्रोसेसने सदर पार्ट बनवुन मशिनला बसविता येईल.

1) Pattern for Saddle
2) Casting
3) Machining total consist Drilling, Taping, Milling
4) Grinding with surface
5) Fitting with dial

त्यासाठी अंदाजे रक्कम रु. ७५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. नविन पार्ट बनविणेस व त्याकामी पुरवठादारांकडून दरपत्रके मागवुन न्यूनतम दराने खरेदी करणेकामी निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती समोर सादर.

**निर्णय क्र.९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायातील लेथ मशिनचा पार्ट नविन बनविणेकामी विहीत पध्दतीने पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय.)

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांचे आठ प्रशिक्षणार्थी ४९ व्या राज्य कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी पात्र ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव -** विनंती पुर्वक कळविण्याचे की,ऑक्टोबर २०१२ मध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगांव येथे ४९ वी विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा परीक्षा पार पडली .ही परीक्षा राज्यातील सहा विभागा मध्ये प्रत्येकी दोन परीक्षा केंद्रावर झाली. सदर परीक्षेमधुन प्रत्येक विभागातुन प्रत्येक ट्रेड मधुन सर्वाधिक गुण मिळविणारें फक्त दोन प्रशिक्षणार्थी राज्यस्तर कौशल्य स्पर्धेसाठी पात्र ठरतात .४९ वी राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परीक्षा दि-२२ ते २७.११.२०१२ या कालावधीत नाशिक,सातारा,औरंगाबाद व अंबरनाथ येथे होत आहे.

आपल्या औ.प्र.केंद्रातील पात्र ठरलेल्या सात ट्रेडच्या १८ प्रशिक्षणर्थीनी ही परीक्षा दिली आहे .या मधुन आपल्या संस्थेचे आठ प्रशिक्षणार्थी राज्य कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.या यशा बरोबर नाशिक विभागामध्ये एकाच वेळी सर्वाधिक प्रशिक्षणार्थी राज्यास्तर पोहोचवण्याची परंपरा आपल्या संस्थेने यावर्षीही चालू ठेवली आहे.

**राज्यस्तर परीक्षेसाठी आपल्या संस्थेचे पात्र प्रशिक्षणार्थी.**

| अ.नं. | प्रशिक्षणार्थ्याचे नांव | व्यवसाय | विभागीय पातळीवर प्राप्त केलेला क्र. | राज्यपातळीवर परीक्षा होणारे परीक्षा केंद्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | कु.गिधाड सपना निवृत्ती | कोपा | सर्वप्रथम | शासकीय औ.प्र.संस्था, नाशिक |
| ०२ | कु.शेख नर्गिस अयमुददीन | | सर्वद्वितीय | |
| ०३ | प्रधान अजित भाउसाहेब | वेल्डर (गॅस अॅड इलेक्ट्रीक) | सर्वप्रथम | |
| ०४ | जाधव समाधान लोटन | इलेक्ट्रीशियन | सर्वप्रथम | |
| ०५ | पटारे सागर राधाकिसन | मेकॅ.मोटार व्हेईकल | सर्वप्रथम | शासकीय औ.प्र.संस्था, सातारा |
| ०६ | उपाध्ये सागर बाबासाहेब | | सर्वद्वितीय | |
| ०७ | देवरे नानासाहेब विठ्ठल | मेकॅनिक रेफ्रीजरेशन अॅण्ड एअरकडीशनींग | सर्वप्रथम | शासकीय औ.प्र.संस्था, अंबरनाथ /मुंबई |
| ०८ | शेख अर्शद उस्मान | टर्नर | सर्वप्रथम | शासकीय औ.प्र.संस्था, औरंगाबाद |

राज्य पातळीवर सहभागी होणा-या राज्यातील सर्व विभागांच्या प्रशिक्षणार्थीमधुन फक्त सर्वप्रथम येणा-या प्रशिक्षणार्थ्यासच ४९ व्या राष्ट्रीय कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी मध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी प्रात्त होउ शकते.

सदरचे यश हे मा व्यावस्थापन समिती व प्रशासनाचा पाठींबा -मार्गदर्शन, संस्थेतील निदेशक व कौशल्य स्पर्धा पुर्व तयारी समिती यांची एकत्रित मेहनत तसेच संबधित प्रशिक्षणार्थीची चिकाटी यातुन प्राप्त झाले आहे,असे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी कळविले आहे.

सदर यशाबाबतची माहिती मा. त्रीसदस्य समिती समोर सादर.

**निर्णय क्र.९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय.)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.३८** **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ज्युनिअर केजी वर्गाचे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडे वाढती विद्यार्थी संख्या व अपुऱ्या वर्ग/खोल्यामुळे सन २०१३-१४ पासून शाळा दोन सत्रात करावी लागणार आहे. तरी या सर्व गोष्टीचा विचार करता ज्यु.केजी च्या वर्ग/ तुकडयांची संख्या मर्यादित ३ तुकडयांची ठेवली तरच पुढे भविष्यात तुकडी मान्यतेची व वर्ग खोल्यांची अडचण निर्माण होणार नाही. शाळेकडे उपलब्ध वर्ग खोल्या व सन २०१५-१६ अखेर ६ तुकडयानुसार व ३ तुकडयांनुसार तयार होणाऱ्या वर्ग तुकडया बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **तुकडी संख्या** | **ज्यु.केजीच्या ६ वर्ग तुकडया झाल्यास** | | | **ज्यु.केजीच्या ३ वर्ग तुकडया झाल्यास** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सन २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सन २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| ज्यु.केजी | ६ | ६ | ६ | ३ | ३ | ३ |
| सि.केजी | ६ | ६ | ६ | ६ | ३ | ३ |
| इयत्ता १ ली | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ३ |
| इयत्ता २ री | ६ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| इयत्ता ३ री | ३ | ६ | ६ | ३ | ६ | ६ |
| इयत्ता ४ थी | ४ | ३ | ६ | ४ | ३ | ६ |
| एकुण वर्ग/तुकडया | **३१** | **३३** | **३६** | **२८** | **२७** | **२७** |
| **एकूण वर्ग/खोल्या** | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता ज्यु. के.जी या वर्गातील प्रवेश प्रक्रिया सुरु करावयाची असल्याने खालीलप्रमाणे महत्वाच्या व आवश्यक बार्बीचा विचार करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा असे नम्र मत आहे.

१. ज्यु. के.जी चे वर्ग सकाळचे सत्रात म्हणजे सकाळी ०७.०० ते दुपारी १२.०० यावेळेत भरविण्यात यावे जेणेकरुन स्कुलबसचे नियोजन करण्यास सोयीस्कर होईल.

२. सन २०१३-१४ शैक्षणिक वर्षात केवळ १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देवून फक्त ३ तुकडया करण्यात याव्यात.

३. ज्यु. के.जी. साठी फक्त १२० विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात यावेत व फक्त १२० फॉर्म विक्री करण्यात यावेत.

४. दि. ३१ मे २०१३ अखेर पाल्यांचे वय ३.३ ते ४.३ या वयोगटापर्यंत असावे, म्हणजे जन्मतारीख (फेब्रुवारी २००९ ते फेब्रुवारी २०१०) या कालावधीतील असावी. मागील वर्षीही याच वयोगटातील पाल्यांना प्रवेश देण्यात आला होता.

५. ज्या पालकांचे पाल्याचे वय ३.३ ते ४.३ वयोगटात बसत असेल फक्त अशाच पालकांना प्रवेश अर्ज देण्यात यावेत इतरांना प्रवेश अर्ज विक्री करण्यात येवू नयेत, जेणेकरुन प्रशासनावर पालकांचा रोष राहणार नाही.

६. ज्यु. के.जी. साठी प्रवेश देतांना प्रथम प्राधान्य संस्थान कायम / कंत्राटी कर्मचारी व त्यांनतर फक्त शिरडी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी फक्त यांनाच प्रवेश देण्यात यावा. सदर वयोगटातील विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास शिरडी गावापासून अगदी जवळ असलेल्या परिसरातील गांवातील विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देवून पुढील अनुक्रमे गावांचा विचार करावा. शिर्डीचे परिसरातील गावात इंग्रजी माध्यमाच्या ब-याच शाळा असल्याने आपल्या शाळेकडे प्रवेश न मिळाल्यास सदर विद्यार्थ्यांचे पालक मुलांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून परिसरातील इतर इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये प्रवेश घेवू शकतात.

७. दिलेल्या मुदतीतच ज्यु.के.जी. प्रवेशासाठी फॉर्म विक्री करण्यात यावी मुदत संपलेनंतर प्रवेशासाठीच्या फॉर्मची विक्री करण्यात येवू नयेत, यामुळे व्यवस्थापनात बऱ्याच अडचणी निर्माण होतात.

८. प्रवेश अर्ज देतेवेळी विद्यार्थ्यांचा मूळ जन्म दाखला (ग्रामपंचायत/ नगरपालीका / महानगरपालीका) यांनी प्रमाणीत केलेला, तसेच शिरडी गावातील रहिवाशी दाखला तपासून अशाच पालकांना पाल्यांचे प्रवेशासाठी प्रवेश अर्ज देण्यात यावा.

९. प्रवेश निश्चित करतांना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात यावे जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्याचा प्रवेश रद्द करण्यात यावा.

१०. उपरोक्त नियमावलीतील आवश्यक माहिती पालकांना माहिती व्हावी यासाठी शहराचे मध्यवर्ती ठिकाणी, शाळेच्या प्रवेशद्वारावर डिजीटल बोर्ड तयार करुन लावणेत येणार आहेत, जेणेकरुन पालकांचा प्रशासनावर रोष राहणार नाही तसेच स्कुलबसेसच्या मागीलबाजूने कागदी बॅनरही लावणेत येणार आहेत.

सन २०१३-१४ ज्यु.के.जी प्रवेश प्रक्रिया बाबत तपशिलवार तक्ता खालीलप्राणे आहे.

सन २०१३-१४ साठी ज्यु.के.जी. प्रवेश प्रक्रियेचा तपशिलवार तक्ता खालीलप्राणे आहे.

| **अ.नं.** | **प्रक्रिया सन २०१३ -१४** | **तपशिल** | **वेळ** |
|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| १. | दि. २८ जानेवारी २०१३ ते<br>दि. २० फेंब्रुवारी २०१३ अखेर | प्रवेशा बाबतच्या वेळापत्रकाची प्रसिध्दी करणे. | --------- |
| २. | दि. ११ फेंब्रुवारी २०१३ ते<br>दि. २० फेंब्रुवारी २०१३ अखेर | प्रवेश अर्ज विक्री व स्विकृती. | सकाळी १०.०० ते<br>सायं ०५.०० |
| ३. | दि.२५ फेब्रुवारी २०१३ | प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थीची यादी शाळेतील नोटीस बोर्डावर प्रसिध्द् करणे. | सकाळी १०.०० ते<br>सायं ०५.०० |
| ४. | दि.२६ फेब्रुवारी २०१३ ते<br>दि.२८ फेब्रुवारी २०१३ अखेर | शालेय शुल्क शाळा कार्यालयात जमा करुन, पालकांनी प्रवेश निश्चिती करणे. | सकाळी १०.०० ते<br>दुपारी ०१.०० |

तरी उपरोक्तप्रमाणे ज्यु.के.जी.साठी प्रवेश प्रक्रिया राबविणेसाठी निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.३९** **वंचीत व दुर्बल घटकांतील बालकांना मोफत प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव -** शासनाचे नियमानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act,२००९ ) हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने दि. ११.१०.२०११ च्या व दि. २५/०५/२०१२ च्या अधिसुचनेद्वारे कलम १८ (१) व १२ (सी) च्या अमंलबजावणी बाबत नियम व कार्यपद्धती विहीत केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत इंग्रजी माध्यमाची कायम विना अनुदानीत खाजगी शाळा श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल आहे. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये ज्यु. के.जी या वर्गाची प्रवेश लवकरच पूर्ण झालेली असल्याने सदर कार्यपद्धतीची अमंलबजावणी करण्यात आलेली नाही. परंतू सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून पुढील आदेश होईपर्यंत या कार्यपद्धतीचा अमंलबजावणी करावी लागणार आहे.

याबाबत शासनाने काही शर्तीच्या पूर्ततेच्या अधिन राहून मान्यता दिलेली आहे त्याबाबतचा शासन निर्णय प्रत व माहिती पत्रक सोबत जोडलेले आहे. वंचीत घटक व दुर्बल घटकासाठी आवश्यक असलेल्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थीचा पालक बी.पी.एल. कार्ड धारक असावा.
२. सदरचा सवलत मिळविण्यासाठी पालकांनी आवश्यक असलेल्या कागदपत्रासह, दिलेल्या मुदतीचे आत अर्ज कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.
३. संबधित पूर्वप्राथमिक विभागासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे राहात्या घराचे अंतर शाळेपासून किमान १ कि.मी. चे हद्दीतील असणे आवश्यक आहे, यासाठी पुरावा म्हणून रेशन कार्ड/ यु.आय. डी. कार्ड असणे आवश्यक आहे.
४. शाळेकडील सर्वात पहिला बेसिक वर्ग (ज्यु.के.जी. वर्ग) फक्त याच वर्गाकरीता २५% आरक्षण देण्यात येईल.
५. सदरचे योजनेचा लाभ फक्त ज्यु. के.जी.ते इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण घेईपावतो घ्¨ेता येईल त्यापुढे मोफत शिक्षण पद्धतीचा लाभ देणे बंधनकारक राहणार नाही.
६. संबधित पात्र विद्यार्थ्यांना फक्त शैक्षणिक शुल्क सवलतीचा फायदा इयत्ता १ली पासून घेता येईल, इतर कुठल्याही सवलतीस तो पात्र राहणार नाही.
७. प्रवेशासाठी आलेल्या अर्जाची प्रथम छाननी करुन (Draw) सोडत पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. एकूण देण्यात आलेल्या प्रवेश संख्येंवर २५% आरक्षण देण्यात येईल. यामध्ये आलेल्या यादीत सर्व मुले अथवा मुली आल्या तरीही त्यांना ही सवलत देय राहील.
८. ज्या पालकांचे पाल्यांना सदरची सवलत मिळालेली आहे त्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव शाळा सोडून गेला तर त्या विद्यार्थ्याची सदरची सवलत रद्द करण्यात येईल.
९. संबधित पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पेक्षा जास्त नसावे, याकरीता मा. तहसिलदार सो. यांचेकडील उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.
१०. वंचीत घटकांमध्ये ज्या उमेदवारांचे प्रवर्ग- S.C, S.T. असतील अशाच पालकांच्या पाल्यांना वंचीत घटकांमधून सदरची सवलत देण्यात येईल.
११. उपरोक्त संदर्भ क्र. ३ मधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व खाजगी, विना अनुदानित शाळांना, खाजगी अनुदानित शाळांना प्रथम वर्गामध्ये त्या वर्गाच्या एकूण क्षमतेच्या किमान २५% प्रवेश हे वंचित व दुर्बल घटकांना देणे अनिवार्य असून असे प्राथमिक शिक्षण (इ. १ ली ते ८ वी) पूर्ण होईपर्यंत मोफत द्यावयाचे आहे. तथापि ज्या ठिकाणी प्रवेशाचा वर्ग इयत्ता १ ली ऐवजी पूर्वप्राथमिक वर्गापासून सुरु होत असेल तेथे अशा पूर्वप्राथमिक वर्गापासून देणे अनिवार्य आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



१२. शिक्षण क्षेत्रातील काही अधिकाऱ्यांचे मते अशी ऐकीव माहिती आलेली आहे की, भविष्यात एका वर्ग तुकडीत फक्त ३० ते ३५ विद्यार्थी संख्येची मर्यादा ठेवण्यात येणार आहे. शासनाच्या या निर्णयाचा विचार करता पूर्वप्राथमिक विभागाकडे अंदाजे ६ तुकडया विचारात घेता सन २०१३-१४ मध्ये एकुण १८० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा जेणेकरुन एकूण प्रवेश संख्येवर २५% आरक्षणानुसार ४५ विद्यार्थ्यांना ही मोफत शिक्षणाची सवलत देता येईल.

आपली शाळा ही कायम विनाअनुदानित तत्त्वावर चालविण्यात येते. शासनाकडून झालेल्या या निर्णयान्वये शाळेला कुठल्या प्रकारची आर्थिक मदत होते किंवा नाही याबाबत अजून तरी माहिती उपलब्ध नाही. सदरची प्रक्रिया ही सन २०१२-१३ पासून आमलांत आणण्याचे आदेश शासना मार्फत देण्यात आले होते, परंतू सदर शासन निर्णयाची प्रत दि. १८ जुन २०१२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मुख्याध्यापकांचे मिटींग मध्ये ताब्यात मिळाली होती व त्यापुर्वी आपल्या शाळेतील ज्यु. के.जी. प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक शुल्क घेण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने ही योजना आपल्या शाळेत राबविता आली नाही. याबाबत तसे मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद अहमदनगर यांना दि. २९.०.२०१२ रोजीचे पत्राने कळविण्यात आलेले आहे.

तरी सन २०१३-२०१४ पासून शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करावी लागणार असून त्यामध्ये पंचायत समिती शैक्षणिक खात्याचे निर्देशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

१. पूर्वप्राथमिक विभागासाठी शासनाच्या या निर्णयानुसार प्रवेश प्रक्रियेबाबतची तारीख निश्चिती करावी लागणार आहे. सदरची माहिती शाळेकडील आवारात डिजीटल बोर्ड तयार करुन लावावी लागेल.
२. प्रवेशासाठी आलेल्या एकूण अर्जांची आवश्यक कागद पडताळणी करुन , छाननी करुन त्यामधून किती उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले याची आकडेवारी ठरवावी लागेल.
३. पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी शाळेच्या नोटीसबोर्डवर जाहिर करावी लागेल.
४. या प्रवेश प्रकियेसाठी समिती गठन करावी लागेल, यामध्ये पंचायत समितीतील ३ अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश राहील.
५. प्रवेश प्रक्रियेत उमेदवारांची संख्या वाढली तर लॉटरी पद्धतीने उमेदवार निवडावे लागतील व लॉटरी द्वारे यादी जाहिर करावी लागेल. त्यानुसार यादी बोर्डावर प्रसिद्ध करावी लागेल.
६. उपरोक्त प्रक्रियेनंतर प्रवेश कधी झाले, किती झाले, किती तुकडयांना मान्यता देता येईल व त्यानुसार एकूण प्रवेश संख्येवर २५% आरक्षण किती होईल व किती मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे याबाबतचा आराखडा तयार करणे इ.

तरी सन २०१३-२०१४ पासून शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करावी लागणार असल्याने याबाबत निर्णयास्तव सविनय सादर,

**निर्णय क्र.९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल )

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शाळा दोन सत्रात भरविणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल सन १९९० साली सुरु करण्यात आले आहे. आजमितीस सन २०१२-१३ मध्ये एकुण ज्यु.केजी ते इयत्ता १० वी पर्यत ४० वर्ग/ तुकडया कार्यरत असून शाळेकडे एकूण ३४ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. जागेच्या कमतरतेमुळे सन २०११-१२ पासून ज्यु. व सि. के.जी. शाळा दोन शिप्टमध्ये भरविण्यात येते. शाळचे सकाळी १०.०० ते १२.०० यावेळेत ज्यु. के.जी. चे ६ वर्ग व त्याच वर्ग/खोल्यात दुपारी ०१.३० ते सायं ०४.०० या वेळेत सि. के.जी. ६ वर्ग भरविण्यात येतात, तसेच उर्वरीत २८ वर्ग/खोल्यात इ. १ ली ते इ. १० वी पर्यंतचे एकुण २८ वर्ग सकाळी १०.०० ते सायं. ०४.०० या वेळेत भरविण्यात येतात. शाळेत १९९५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

इमारतीतील एकूण तुकडया व उपलब्ध वर्ग खोल्या माहिती

| सन २०१२-१३ सद्यस्थिती | | | सन २०१३-१४ संभाव्य स्थिती | | |
|---|---|---|---|---|---|
| सध्याचे वर्ग | तुकडया | उपलब्ध वर्ग खोल्या | पुढील वर्ष वर्ग | तुकडया | आवश्यक वर्ग खोल्या |
| ज्यु. के.जी. व सि. के.जी | १२ | ६ | ज्यु. के.जी. | ६ | ६ |
| इयत्ता १ ली | ६ | ६ | सि. के.जी. | ६ | ६ |
| इयत्ता २ री | ३ | ३ | इयत्ता १ ली | ६ | ६ |
| इयत्ता ३ री | ४ | ४ | इयत्ता २ री | ६ | ६ |
| इयत्ता ४ थी | ३ | ३ | इयत्ता ३ री | ३ | ३ |
| इयत्ता ५ वी | २ | २ | इयत्ता ४ थी | ४ | ४ |
| इयत्ता ६ वी | २ | २ | इयत्ता ५ वी | ३ | ३ |
| इयत्ता ७ वी | २ | २ | इयत्ता ६ वी | २ | २ |
| इयत्ता ८ वी | २ | २ | इयत्ता ७ वी | २ | २ |
| इयत्ता ९ वी | २ | २ | इयत्ता ८ वी | २ | २ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १० वी | २ | २ | इयत्ता ९ वी | २ | २ |
| | | | इयत्ता १० वी | २ | २ |
| एकूण | ४० | ३४ | एकूण | ४४ | ४४ |
| स्टॉफरुम (शिक्षकांसाठी ) | | १ | स्टॉफरुम (शिक्षकांसाठी) | | १ |
| संगणक लॅब | | १ | संगणक लॅब | | १ |
| सायन्स लॅब | | १ | सायन्स लॅब | | १ |
| कार्यालय | | १ | कार्यालय | | १ |
| एकुण बेरीज | | ३८ | एकुण बेरीज | | ४८ |

**१)** उपरोक्त तक्त्यानुसार सन २०१२-१३ मध्ये ४० वर्ग / तुकडया असुन, ३४ वर्ग खोल्यामध्ये विद्यार्थ्याची बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**२)** सन २०१३-१४ मध्ये ४४ वर्ग / तुकडया तयार होत असुन, ४४ वर्ग खोल्याची आवश्यकता आहे. परंतु आपल्याकडे ३४ वर्ग खोल्या उपलब्ध आहे. तरी आणखी १० वर्ग खोल्याची आवश्यकता असुन, त्या आता उपलब्ध होणे शक्य नाही.

सध्यपरिस्थीतीत सन २०१३-१४ ज्यु.के.जी प्रवेशाबाबत निर्णय घ्यावा लागेल.जागेची अडचण, विद्यार्थ्यांच्या विविध अडचणी, भौतिक सुविधा (शौचालय, बाथरुम, पाणी, इ. ) लक्षात घेता तसेच विद्यार्थी संख्येचा विचार करता उपलब्ध शौचालय, बाथरुम, पाणी व स्वच्छता व्यवस्थेवर खूपच ताण पडणार आहे. तरी अपुऱ्या पडणाऱ्या वर्ग/ खोल्यांची अडचण लक्षात घेता, ज्यु. व सि. के.जी (पुर्व प्राथमिक विभाग) १२ वर्ग तसेच इयत्ता १ ली ते ४ थी (प्राथमिक विभाग) एकूण १९ वर्ग सकाळी ०७ ते १२ यावेळेत भरविण्यात यावेत व इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी चे वर्ग दुपारी १२.१० ते ०५.२० यावेळेत भरवून शाळा दोन सत्रांत भरविण्यात यावी असे नम्र मत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ शालेय कामकाजात खालीलप्रमाणे बदल करावा लागेल

| अ.नं. | तपशिल | शालेय कामकाज वेळ | एकूण तुकडी | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | ज्युनियर के.जी, व सिनियर केजी. ( पुर्व प्राथमिक) | सकाळी ०७.०० ते दु. १२.०० शनिवार अर्धवेळ सकाळी ०७.०० ते स. ०९.५० | १२ | ५३० |
| ०२ | इ. १ ली ते इ.४ थी (प्राथमिक विभाग ) | सकाळी ०७.०० ते दु. १२.०० शनिवार अर्धवेळ सकाळी ०७.०० ते स. ०९.५० | १९ | १००० |
| ०३ | इ. ५ वी ते इ. १० वी (माध्यमिक विभाग) | दुपारी १२.१० ते सांयं०५.२० शनिवार अर्धवेळ सकाळी १०. ०० ते दु. १२.५० | १३ | ६३९ |
| | | एकूण | ४४ | २१६९ |

**३)** शाळा संहितानुसार प्राथमिक व माध्यामिक विभागासाठी प्रत्येक शाळेचे आठवडयामध्ये घडयाळी २६-२७ तास शालेय अध्यापन होणे आवश्यक आहे. संदर्भ (महाराष्ट्र शासन माध्यमिक शाळा संहिता पुस्तक पान नं. ३२-३३ नियम नं. ५४.१ , ५४.२ , ५५.१, ५५.३ अन्वये ) सोबत जोडलेले आहेत. त्यानुसार शाळेच्या कामकाजाचे वेळापत्रक तयार केलेले आहे.

ज्यु. व सिनी. के.जी तसेच इ. १ ली ते ४ थी एकूण तुकडया ३१ व विद्यार्थी संख्या १५३० इतकी असल्याने शाळा संहितानुसार पहिल्या सत्र शाळेसाठी १ सहा.मुख्याध्यापक/पर्यवेक्षक नेमणे गरजेचे राहील. इ. १ली ते ४ थी या वर्गांना शिकवत असलेल्या शिक्षक/शिक्षिकां पैकी सेवाजेष्ठते नुसार मुख्याध्यापक / सहाय्यक मुख्याध्यापकाची नेमणूक करुन कार्यालयीन कामकाज दोन सत्रात करता येईल. परंतू सदर मुख्याध्यापक/पर्यवेक्षकांवर आपला वर्ग सांभाळण्याची जबाबदारी ही राहील. त्यांचेकडे दिलेला वर्ग सांभाळून त्यांनी ही जबाबदारी पार पाडावयाची आहे. आपले शाळेत सध्या इ. १ ली ते ७ वी पर्यंत प्राथमिक व इ. ८ वी ते १० वी माध्यमिक असे दोन विभाग आहेत. परंतू आजमितीस विद्यार्थ्यांचे संख्येत नैसर्गिक वाढ झालेली असल्याने इ.५ वी ते इ. ७ वी चे वर्ग माध्यमिक विभागाकडे जोडणेबाबतचा प्रस्तावही दि.११.०३.२०११ रोजी शिक्षण अधिकारी यांचेकडे पाठण्यिात आलेला असुन लवकरच याबाबत कार्यवाही होणार आहे.

**४)** शालेय कामकाज दोन सत्रात करावयाचे ठरल्यास खालीलप्रमाणे नियोजन करावे असे नम्र मत आहे.

१. शाळेकडे सध्या ९ स्कुलबस उपलब्ध असुन, शाळा दोन सत्रात केल्यास नव्याने ४ स्कुलबसची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल. एकुण १३ स्कुलबस शाळेकडे असतील.

२. नव्याने ४ स्कुलबसची सुविधा आपण आऊटसोर्सींग/ कॉन्ट्रक्टर मार्फत करु शकतो. त्याकरीता वाहन विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन स्कुलबसची उपलब्धता होऊ शकते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



३. शाळा संहिता स्कुलकोडप्रमाणे नव्याने वाढीव तुकडयाकरीता ०४ डी.एड. शिक्षकांची भरती उच्च न्यायालयाच्या परवानगीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन करावी लागेल.

४. ज्यु.केजी व सि.केजी च्या नव्याने होणाऱ्या ६ तुकडयाकरिता ६ कंत्राटी शिक्षकांची आवश्यकता लागणार असुन, संस्थान नियमाप्रमाणे त्यांची भरती करता येईल.

५. ज्यु.केजी व सि.केजी ४ मदतनीस (आया) यांची संस्थानमार्फत कंत्राटी पध्द्‌तीने भरती करावी लागेल.

६. संस्थानने नव्याने ४ स्कुलबस स्वतः खरेदी केल्यास ४ वाहन चालक व ४ मदतनीस कंत्राटी पध्द्‌तीने भरावे लागतील.

**५)** ज्यु.केजी ते इयत्ता ४ थी सकाळ सत्रात शाळा भरविणेचे कारण:-

१. ज्यु.केजी ते इयत्ता ४ थी पर्यत १ वर्ग १ शिक्षक याप्रमाणे नियोजन असते.

२. ज्यु. के.जी, सिनीयर केजी. वर्गातील मुले वयाने लहान असल्याने दुपारचे सत्रात मुले वर्गात झ ोपण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून त्यांना सकाळचे सत्रात ठेवण्यात यावे.

३. ज्यु. के.जी, सिनीयर केजी. , इ. १ ली ते इ.४ थी वर्गातील मुलांची शाळेची वेळ शिर्डी परिसरातील इतर शाळेच्या वेळेनुसार सकाळी ०७ ते दुपारी १२ पर्यंत ठेवण्यात यावी. विद्यार्थ्यांना आणणेकामी सकाळी ०६.०० व दुपारी सोडणेकामी १२.०० वाजता स्कुलबस पाठविता येतील. यामुळे शाळेकडील स्कुलबस वरील मदतनिस व वाहन विभागाकडील बस ड्रायव्हर यांचे ड्युटी वेळा लावणे सोयीस्कर होईल.

**६)** इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना स्कुलबस सेवा देण्यात येवू नये. शिर्डी गावातील इतर शांळामध्ये विद्यार्थ्यांकरीता अशी स्कुलबसची सुविधा नाही. तसेच इ. ५वी ते ९ वी मधील एकूण विद्यार्थी संख्या ५७४ असुन यामध्ये अंदाजे २९५ विद्यार्थी पायी चालत येतात व अंदाजे २७९ विद्यार्थी स्कुलबसने येतात. संस्थानचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर मध्ये इ. ५ वी ते इ.१० वी पर्यंतचे वर्ग भरत असून त्या ठिकाणी पालक स्वतः पाल्याला सोडविण्यासाठी येतात अथवा खाजगी वाहनांची व्यवस्था करतात. ही सेवा बंद केली तर नव्याने ४ स्कुलबस संस्थानला खरेदी करावयाची आवश्यकता भासणार नाही. तरी दुपारचे सत्रात स्कुलबस सेवा देण्यात येवू नये असे नम्र मत आहे.

**७)** शाळा एका सत्रात घ्यायची ठरविल्यास खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्या लागतील

१. शिरडी गाव परिसरात ६ ठिकाणी ज्यु.केजी व सि.केजीचे वर्ग चालविणाऱ्या शाळा उपलब्ध आहेत.

२. उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या लक्षात घेता ज्यु.केजी प्रवेश प्रक्रिया कायम स्वरुपी बंद करावी लागेल.

३. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासुन सि.केजी ते इयत्ता १० वी पर्यत शाळा राहिल.

४. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासुन शाळा इयत्ता १ ली ते १० वी अशी असेल.

५. नव्याने संस्थानला ६ स्कुलबस खरेदी करावी लागेल. त्याअनुषंगाने ६ वाहन चालक व ६ मदतनीस यांची भरती करावी लागेल.

६. नव्याने ४ वर्ग खोल्याची ताबडतोब व्यवस्था जुन २०१३ पर्यत करावी लागेल.

**८)** चार वर्षापुर्वी पर्यंत विद्यार्थीसंख्या मर्यादीत होती त्यामुळे वर्गखोल्यांची अडचण भासली नाही परंतू आता ही संख्या वाढल्याने शाळा दोन शिप्ट मध्ये करावीच लागेल त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आजमितीस शाळेकडे ९ स्कुलबसेस उपलब्ध असून ही सेवा अपुरी पडत आहे यामुळे ४ स्कुलबसेसच्या प्रत्येकी दोन ट्रिपा कराव्या लागतात. आर. टी. ओ. नियमाप्रमाणे एका स्कुलबसमध्ये ५५ ते ६० विद्यार्थी अपेक्षित आहेत परंतू आपल्या प्रत्येक स्कुलबसमधून एकावेळी १०० ते १२० विद्यार्थी प्रवास करतात यामुळे मुलांना स्कुलबसमध्ये बसण्यासाठी नाहीच नाही परंतू उभे राहाण्यासाठीही जागा पुरत नाही. तसेच लहान मुलांना बसण्यासाठी जागा मिळत नसल्याने पालकही प्रशासनावर नाराजी व्यक्त करतात.

**९)** शाळा संहितानुसार प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी प्रत्येक शाळेचे आठवडयामध्ये घडयाळी २६-२७ तास शालेय अध्यापन होणे आवश्यक आहे. संदर्भ (महाराष्ट्र शासन माध्यमिक शाळा संहिता पुस्तक पान नं. ३२-३३ ) तसेच शालेय आठवडा तासीकेचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

१. सन २०१३-१४ मध्ये इयत्ता १ ली ते ४ थी च्या १९ तुकडया होत असून एक वर्ग एक शिक्षक नियमाप्रमाणे १९ शिक्षकांची आवश्यकता आहे पैकी आज आपलेकडे १५ शिक्षक + १ शिक्षक (११ महिन्याकारीता) असे एकूण १६ शिक्षक उपलब्ध असून सन २०१३-१४ करीता आणखी ४ शिक्षकांची नेमणूक करावी लागणार आहे.

२. परिसरामध्ये श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय व आदर्श प्राथमिक विद्यालय या दोनही शाळेचे कामकाज दोन शिप्टमध्ये चालते. आठवडयाचे तासीकांचे नियोजन हे आदर्श प्राथमिक विद्यालयाचे असून सोबत तक्ता जोडलेला आहे.

३. शाळेकडील सन २०१२-१३ ची सद्यस्थिती व सन २०१३-१४ ची संभाव्य स्थितीबाबतचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी पुढील वर्षांची ज्यु. के.जी ते इयता १० वी पर्यंतची एकूण २१६९ विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता शाळा दोन सत्रात विभागल्यास उपलब्ध वर्ग खोल्या, उपलब्ध स्कुलबस सेवा व इतर भौतिक सुविधांचा व्यवस्थित वापर करणे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने व शालेय प्रशासनाच्या हितावह होईल. दि. १८.०४.२०१० रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. २३ निर्णय क्र.३७८ प्रमाणे विचारात घेता शाळा दोन सत्रात घेतल्यास अडचणी येणार नाहीत असे वाटते. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल )

---

**विषय नं.४१ शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु.केजी ते इ. १० वी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेकडे प्राथमिक विभाग , पुर्व माध्यमिक व माध्यमिक असे विभाग आहेत. पुढील वर्षी सन २०१३-१४ मध्ये इ. १ ली ते ४ थी च्या नैसर्गिक वाढीने एकूण १९ तुकडया तयार होत आहेत. शाळा संहिता नियमानुसार प्राथमिक विभागासाठी एक वर्ग एक शिक्षक या नियमाप्रमाणे या एकूण १९ वर्ग तुकडयांसाठी १९ शिक्षकांची आवश्यकता भासणार आहे. सन २०१३-१४ मध्ये खालीलप्रमाणे शिक्षकांची आवश्यकता भासणार आहे.

शाळा संहिता नियमः-

**अ)** इयत्ता १ ली ते ४ थी एक वर्ग एक शिक्षक या नियमाप्रमाणे-

| अ. नं. | इयत्ता | एकूण तुकडया | आवश्यक शिक्षक | उपलब्ध शिक्षक | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ ली ते ४ थी | १९ | १९ | १५ | ०४ |
| ०२ | ५ वी ते ७ वी | ०७ | ०९ | ०८ | ०१ |
| ०३ | इयत्ता ५ वी ते १० वी साठी विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक | १३ | ०१ | ----- | ०१ |

**ब)** इयत्ता ५ वी ते ७ वी १.३ शिक्षक या नियमाप्रमाणे-

| अ. नं. | इयत्ता | रिक्त पदे | शाळा संहिता नुसार आरक्षण |
|---|---|---|---|
| ०१ | १ ली ते ७ वी | ०५ | एस.सी. -१, ओ. बी. सी.-२, खुला प्रवर्ग-२, |
| ०२ | विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक | ०१ | खुला प्रवर्ग ०१ |
| | एकूण | ०६ | |

उपरोक्त नमूद केलेल्या तक्त्यात प्राथमिक विभाग इयत्ता १ ली ७ वी पर्यंत चे आरक्षण तक्त्यानुसार सहाय्यक शिक्षक(परिविक्षाधीन) पदे भरावयाची आहेत यामध्ये एकूण ( एस. सी. -१ पद, ओ. बी. सी.- २ पदे व बिगर मागास वर्ग -२ पद ) असे जात संवर्गातील एकूण ५ पदे आहेत. डी. एड. किंवा डी. टी.एड. पदवीधारक (इंग्रजी माध्यम ) असलेल्या उमेदवारांना शासन निर्णयाप्रमाणे परिविक्षाधीन कालावधीत दरमहा मानधन रु.६०००/- देवून नेमता येईल.

उपरोक्त सन २०१३-१४ मध्ये करण्यात येणाऱ्या शिक्षक भरती प्रक्रियामध्ये आवश्यक आरक्षणानुसार असलेल्या बिगर मागास (Open) २ पदा करीता नव्याने जाहिरात देण्याची आवश्यकता वाटत नाही, कारण सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात आवश्यक लागणारे सहा. शिक्षक यांची जाहिरात देवून, लेखी परिक्षा व मुलाखती घेवून निवड करण्यात आली होती. दि.२९.०७.२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं. ३ मध्ये निर्णय ६५४ नुसार तज्ञांनी व उपस्थित संस्थान अधिकाऱ्यांनी घेतलेल्या मुलाखतीनुसार प्राथमिक विभागासाठी खालील उमेदवारांची निवड करण्यात आली होती.

| अ. नं. | उमेदवारांचे नांव | प्रवर्ग | गुणानुक्रम |
|---|---|---|---|
| ०६ | कु. म्हस्के गितांजली भिमराज मु. पो. टाकळीकाजी, ता.जि.अहमदनगर | खुला | ४ |
| ०७ | श्री. देशमुख प्रतापराव निराजीराव, मु.पो. पाथर्डी जि. अहमदनगर | खुला | प्रतिक्षा यादीवर |

**अ)** मागील वर्षी प्राथमिक विभागासाठी ओ.बी.सी. प्रवर्गातील राखीव जागेसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने खुला प्रवर्गातील अ. नं.६ कु. म्हस्के गितांजली भिमराज यांना २०१२-१३ साठी तात्पुरती ११ महिन्यांसाठी नेमणूक देण्यात आली होती. कु. म्हस्के यांचे काम चांगले व समाधानकारक आहे. सन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



२०१३- १४ शैक्षणिक वर्षात आरक्षणानुसार खुल्या प्रवर्गाचे १ रिक्त पद असल्याने कु. म्हस्के यांना सलग तीन वर्षाकरीता नेमणूक आदेश देता येईल असे मत आहे.

**ब)** मागील वर्षाचे प्रतिक्षा यादीवर असलेले अ.नं.७ चे उमेदवार श्री देशमुख प्रतापराव निराजीराव, यांचीही त्यावेळी तज्ञांच्या समोर मुलाखत झालेली आहे व श्री देशमुख हे खुला प्रवर्गा मधून प्रतिक्षा यादीवर असल्याने सन २०१३- १४ शैक्षणिक वर्षात आरक्षणानुसार खुल्या प्रवर्गाचे १ रिक्त पदासाठी श्री देशमुख यांना सलग तीन वर्षाकरीता नेमणूक आदेश देता येईल असे मत आहे.

नियम क्रमांकः- माध्यमिक शाळा संहिता पान नं.५५,५६ नियमानुसार नियम क्र. ५७.७ नुसार ५०० ते १५०० विद्यार्थी संख्येस ०१ याप्रमाणे प्रयोगशाळा सहाय्यकाचे पद निर्माण होते. शाळेकडे इयत्ता ५ वी ते १० पर्यंत एकूण १३ तुकडया असून एकूण ६३१ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. शाळेकडे विज्ञान प्रयोग शाळाही उपलब्ध आहे, परंतू सदरची जागा आजतागायत रिक्त असल्याने विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारचा फायदा होत नाही त्याकरीता सदरचे पद भरणे गरजेचे आहे.

संदर्भ- शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः एसएसएन २६०३/ (४१/०३)/ माशि-२ दिनांक - २५ नोव्हेंबर २००५ प्रपत्र अ नुसार प्रयोगशाळा सहाय्यक हे पद इ.५ वी ते इ.१० वी तुकडी पर्यंत असून १ पूर्णवेळ पद आहे. एक पूर्णवेळ प्रयोगशाळा सहाय्यकाचे पद नव्याने भरावयाचे झ ाल्यास सुरुवातीची ३ वर्षे शासन निर्णयानुसार मासिक रु. ५०००/- मानधन देवून त्यांनतर नियमीत पूर्णवेळ प्रयोगशाळा सहाय्यकाची वेतनश्रेणी ३२००- ४९०० , वेतन बॅन्ड ५२००-२०२०० + ग्रेड पे २००० अनुज्ञेय होईल. (सदरचे पद एकल पद आहे.) या पदासाठी जाहिरात द्यावी लागेल.

**क)** विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक- १ पद (रिक्त),शैक्षणिक पात्रता -बी.सी.एस/ बी.एस्सी, कॉम्प्युटर सायन्स.

**ड)** उपरोक्त आवश्यक आरक्षणानुसार प्रवर्ग- एस. सी. -१ पद , ओ. बी. सी.- २ पदे एकूण ०३ सहाय्यक शिक्षकांची पदे तसेच विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक ०१ पद (खुला प्रवर्ग) असे एकूण ०४ रिक्त पदाकरीता नियमाप्रमाणे वर्तमान पत्रात जहिरात देणेकामी मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे, तरी जनसंपर्क विभागामार्फत सदरची जाहिरात देवून भरती प्रक्रिया राबवावी असे वाटते.

मागील वर्ष २०१२-१३ ची परिस्थिती लक्षात घेता सन २०१३-१४ मध्ये प्रक्रिया राबवितांना उमेदवारांचे अर्ज On Line भरुन घेण्यात यावेत, पोस्टाने/ कुरीयरने /हस्त पोहोच अर्ज स्विकारु नयेत असे नम्र मत आहे.उमेदवारांचे अर्ज भरुन घेणेकामी संस्थानची वेबसाईट website: http:// www.shrisaibabasansthan.org चा वापर करता येईल.

पात्र उमेदवारांना महाराष्ट्र शासन नियम १३ आक्टोबर २००० नुसार ३ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी पर्यंत सहाय्यक शिक्षक(परिविक्षाधीन) म्हणुन नेमणूक पत्र देता येईल. या कालावधीत त्यांचे काम समाधानकारक आढळून आल्यास पुढील नेमणूक देता येईल. तरी वरीलप्रमाणे शाळा संहिता नियमानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून लेखी व तोंडी परिक्षा घेवून शिक्षक भरती करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद करण्यात आलेली शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

**तसेच, मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल/ विधी अधिकारी )

---

**विषय नं.४२** **संस्कृत विषय शिक्षक भरतीबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडे इ.८ वी ते १० वी या वर्गांना संस्कृत विषय अध्यापन इंग्लीश मिडीअम स्कूल आस्थापनेवरील श्री कृष्णदास गोपीनाथ लोहकरे सहा.शिक्षक हे करीत आहेत. परंतु पुढील २०१३- १४ शै.वर्षापासून इं.मि.स्कूलकडील तुकडीत वाढ झाल्याने त्यांना तिकडे पुर्णवेळ कार्यभार आहे. त्यामुळे ते कन्या विद्या मंदिरकडे संस्कृत विषय अध्यापनाचे काम करणार नाहीत, असे मा. प्राचार्या इं.मि.स्कूल यांनी तोंडी चर्चेवरुन सांगितले आहे.

कन्या विद्या मंदिरकडे इ.८ वी ते १० वी या प्रत्येक दोन वर्गतुकडया अशा ६ वर्गतुकडया असून या सर्व वर्गांना नियमाप्रमाणे (एक वर्गतुकडी १.५) पुर्णवेळ ०९ शिक्षक नेमणूक करता येते. सदयस्थितीत कन्या विद्या मंदिरकडे ०८ सहा.शिक्षक कार्यरत आहेत त्यामुळे एक रिक्त पद निर्माण होत असल्याने संस्कृत विषयाकरीता संस्कृत पदवीधर बी.एड. शिक्षक नेमणूक करता येईल.सदरचे जागेकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची नेमणूक करता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



या अगोदर शिक्षक पदाचा जात संवर्ग तपशील (१६+०१ प्राचार्या-एकाकी पद)= १७ असा होता संस्कृत विषयासाठी नव्याने पदनिर्मिती केल्यास जात शिक्षक पदाचा जात संवर्ग तपशील (१७+०१ प्राचार्या-एकाकी पद)= १८ असा होईल. एकूण १७ पदाचा जात संवर्ग तपशील खालीलप्रमाणे असेल.

| जात संवर्ग | अनु. जाती (S C) | अनु. जमाती (S T) | विमुक्त व भटक्या जमाती (VJ /NT) | इतर मागास (OBC) | विशेष मागासवर्ग (S B C) | बिगर मागास (OPEN ) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | १३% | ०७% | ११% | १९% | ०२% | ४८% | १००% |
| पदे | २.२१ | १.१९ | १.८७ | ३.२३ | ०.३४ | ८.१६ | |
| पुर्णांकित पदे | ०२ | ०१ | ०२ | ०३ | ०० | ०८९ | १६ |
| भरलेली पदे | ०२ | ०० | ०३ | ०३ | -- | ०८ | १६ |
| रिक्तपदे अनुशेष | -- | -१ | +१ | -- | -- | -- | -- |

तरी उपरोक्त तक्त्याचा विचार करता सदर पदाकरीता अनुशेष शिल्ल्क नाही त्यामुळ सदरचे पद खुल्या प्रवर्गात मोडत असल्याने बी.ए. (संस्कृत) बी.एड. जात संवर्ग खुला अशी जाहिरात देवून पद भरणेकामी निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.१०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिराकडे संस्कृत विषय शिक्षक पद भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

**तसेच, मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर श्री साईबाबा कन्या विद्या मंदिराकडे संस्कृत विषय शिक्षक पद भरणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४३** **कन्या विद्या मंदिराकडे प्राथमिक विभागाकरीता खुला प्रवर्ग संवर्गातील रिक्त पद भरणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विद्यालयाकडील सौ.सुनंदा रामकृष्ण दुरुगकर (एस.एस.सी.डी.एड.) सहा.शिक्षिका प्राथमिक विभाग या पुढील शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये माहे जून-२०१३ अखेर सेवा निवृत्त होत आहेत.

सदर शिक्षिका खुला प्रवर्ग (Open) संवर्गातील असल्याने (एसएसकोड नियमानुसार) त्यांचे रिक्तपदी त्याच संवर्गातील शिक्षक नेमणूक करावा लागेल.

सदर रिक्त पदाची (खुला प्रवर्ग एचएससी विज्ञान डी.टी.एड.) जाहिरात देवून सदरचे रिक्त पद भरणेकामी निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.१०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सहा.शिक्षक प्राथमिक विभाग (खुला प्रवर्ग एचएससी विज्ञान डी.टी.एड.) पद भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

**तसेच, मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर सदर पद भरणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४४** **कन्या विद्या मंदिराकडील शिक्षणसेवकांच्या मुदतवाढीबाबत व जाहिरात देवून नवीन पदे भरणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा कन्या विदया मंदिर व कनिष्ठ महाविदयालयाच्या माध्यमिक विभागाकडे खालीलप्रमाणे शिक्षक नेमणूका केलेल्या आहेत.

माध्यमिक विभाग इ.८ वी ते इ.१० वी गटासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार १.५ प्रमाणे सहा वर्ग तुकडयासाठी एकूण ०९ पदे मान्य होतात. त्याप्रमाणे शिक्षक कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे प्राथमिक विभाग इयत्ता पाचवी ते सातवी गटासाठी एकूण ०६ वर्ग तुकडया असून प्रत्येक वर्ग तुकडीस १.३ प्रमाणे एकूण ७.८ म्हणजेच पुर्णांकित ८ पदे मंजूर होतात.

**शिक्षक पदांचा जात संवर्ग तपशील खालीलप्रमाणे आहे. एकूण १६ पदांचा (१६+१ प्राचार्या-एकाकी पद) =१७.**

| जात संवर्ग | अनु.जाती (S C) | अनु. जमाती (S T) | विमुक्त व भटक्या जमाती (VJ/NT) | इतर मागासवर्ग (O B C) | विशेष मागासवर्ग (S B C) | बिगर मागास (OPEN) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | १३% | ०७% | ११% | १९% | ०२% | ४८% | १००% |
| पदे | २.०८ | १.१२ | १.७६ | ३.०४ | ०.३२ | ७.६८ | |
| पुर्णांकित पदे | ०२ | ०१ | ०२ | ०३ | ०० | ०८ | १६ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भरलेली पदे | ०२ | ०० | ०३ | ०३ | - | ०८ | १६ |
| रिक्तपदे अनुशेष | - | -१ | +१ | - | - | - | - |

उपरोक्त तक्त्यावरुन अनु.जमाती (S.T.) या पदाचा अनुशेष बाकी आहे व विमुक्त व भटक्या जमाती (VJ/NT) या जात सवर्गातील एक पदाची नेमणूक जास्त (सरप्लस )आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.राजपूत वृषाली सोमनाथ | शिक्षणसेवक | (अस्थायी) | एन.टी.(भटक्या जाती) |
| ०२ | कु.आंधळे रेखा प्रभाकर | शिक्षणसेवक | (अस्थायी) | एन.टी.(भटक्या जाती) |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या सदर दोन पदांसाठीची सदयस्थिती- श्री साईबाबा कन्या विदया मंदिरकडे एस.टी. व एन.टी. (प्राथमिक विभाग) या सवर्गातील रिक्त पदांसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली होती. त्यानुसार दि. ऑगस्ट २०१० रोजी मा.व्यवस्थापन मंडळाचे उपसमितीसमोर मुलाखती घेवून निवडी करण्यात आलेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे.

१. सौ.वृषाली सोमनाथ राजपूत (शिक्षणसेवक माहिती तंत्रज्ञान) (VJ/NT) जा.नं.एसएसएस/ कन्या/५२१९/१२ दि.१९/०१/२०१२ अन्वये हजर झालेल्या तारखेपासून १ वर्षापर्यंत नेमणूक देण्यात आली. त्यानुसार त्या दि.२१/०१/२०१२ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत त्यांच्या नेमणूकीचा कालावधी जानेवारी २०१३ अखेर संपुष्टात येणार आहे.

२. कु.रेखा प्रभाकर आंधळे (शिक्षणसेवक विज्ञान प्राथमिक विभाग) (VJ/NT) जा.नं. एसएसएस/ कन्या/५२२१/१२ दि.१९/०१/२०१२ अन्वये हजर झालेल्या तारखेपासून १ वर्षापर्यंत नेमणूक देण्यात आली. त्यानुसार त्या दि.२४/०१/२०१२ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत त्यांच्या नेमणूकीचा कालावधी जानेवारी २०१३ अखेर संपुष्टात येणार आहे.

**अ-** सदर दोनही शिक्षणसेवकांचा कालावधी जानेवारी २०१३ अखेर संपुष्टात येत असल्याने विदयार्थीनींचे शेक्षणिक नुकसान होवू नये यासाठी एप्रिल २०१३ अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती.

**ब-** उपरोक्त दोन पदे (ST) जात संवर्गाकरीता ०१ पद व (VJ/NT) या जात संवर्गाकरीता ०१ पद असा अनुशेष होता. परंतु दोनही पदांसाठी (VJ/NT) या जा संवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात आल्याने त्यांना एका वर्षापुरताचे नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे.

**क-** उपरोक्त दोनही शिक्षणसेवक (VJ/NT) या जात संवर्गातील निवड केलेले आहेत. परंतु शालेय शिक्षक अनूशेष अनुक्रमे एसटी व एनटी (प्रत्येकी ०१) या जात संवर्गातील असल्याने उपरोक्त एसटी व एनटी या दोनही पदांसाठी पुन्हा जाहिरात दयावी लागेल. कृपया एप्रिल २०१३ अखेर मुदत वाढ मिळणेस व सदर शिक्षणसेवकांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर जाहिरात देवून पदे भरणेकामी निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दोन कार्यरत असलेल्या शिक्षण सेवकांना एप्रिल- २०१३ अखेर पर्यत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, श्री साईबाबा कन्या विदया मंदिर व कनिष्ठ महाविदयालयाच्या माध्यमिक विभागाकडे शिक्षण सेवकांची रिक्त पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

**मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर शिक्षण सेवकांची पदे भरणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४५** **कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेल्या अर्धवेळ शिक्षणसेवक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या सन २०१२-१३ मधील नेमणुकाबाबत.**

**प्रस्ताव -** सन २०१२-१३ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इ.११वी व इ.१२ वी च्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांच्या प्रत्येकी दोन वर्ग तुकडया अशा एकूण १२ वर्ग तुकडया सुरु आहेत. या १२ वर्ग तुकडयांमध्ये ९७७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मा. शिक्षण उपसंचालक ,पुणे यांचेकडील कार्यभार निश्चती व पडताळणी मंजूरी पत्र जा.क्र. उमाशि-२/शि.मा./पु.वि./२०११-१२/३३१,दि.१९.१०.२०११,नुसार शैक्षणिक वर्ष २०११-१२ करीता श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालया करीता १ प्राचार्य, १ उपप्राचार्य,२० पुर्णवेळ व ४ घडयाळी तासावर अशी एकूण २९ शिक्षकपदे आणि ४ प्रयोगशाळा सहाय्यक अशी शिक्षकेतर पदे मंजूर आहेत.

या विभागात २८ शिक्षक (पूर्णवेळ २२ व अर्धवेळ ६) कार्यरत आहेत, त्यांचे आरक्षणानुसार विवरण पुढील प्रमाणे :

**(अ)** कार्यरत शिक्षक माहिती :

| अ.क्र. | प्रवर्ग | SC | ST | OBC | SBC | NT | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षण टक्केवारी | 13% | 7% | 19% | 2% | 11% | 48% | 100% |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरक्षण टक्केवारीनुसार पदे | 3.64 | 1.96 | 5.32 | 0.56 | 3.08 | 13.44 | 28 |
| | सद्यस्थितीत महिला | 2 | 0 | 3 | 0 | 0 | 7 | 12 |
| | सद्यस्थितीत पुरुष | 1 | 0 | 3 | 1 | 3 | 8 | 16 |
| | सद्यस्थितीत कार्यरत एकूण | 3 | 0 | 6 | 1 | 3 | 15 | 28 |
| | पैकी अपंग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| | अनुशेष | + 0.64 | + 1.96 | - 0.68 | - 0.44 | - 0.08 | -1.56 | |

**(ब)** रिक्त - पदांची माहिती :

| **अ.नं** | **पदाचे नाव** | **शैक्षणिक पात्रता** | **विषय** | **पद संख्या** | **मानधन** | **आरक्षण/शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक शिक्षक -परिवीक्षाधीन (अधवेळ) | एम.एस्सी. बी.एड. | रसायन शास्त्र | १ | मासिक मानधन रु.४५०० | अर्धवेळ पदांसाठी आरक्षण लागू नाही. तथापि कनिष्ठ महाविद्यालयाकडील नेमणुकीसाठी SC पदाचा अनुशेष असल्याने सदरचे पद पुर्णवेळ झाल्यावर ST करीता आरक्षित होईल. |
| २ | तासिका तत्वावर | एम.एस्सी. बी.एड. | पर्यावरण शास्त्र | १ | रु.७२ प्रति घ.तास | सदरच्या पदावर कंत्राटी पध्दतीने श्री रावसाहेब निवृत्ती जेजूरकर (OBC), एम.एस्सी.बी.एड.पर्यावरणशास्त्र)हे जानेवारी २००८ पासून काम करत आहेत. |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक | बी.सी.एस. / बी.एस्सी. | माहिती तंत्रज्ञान | १ | मासिक मानधन रु.५००० | कनिष्ठ महाविद्यालयाकडील सदरची दोन्ही पदे SC/ ST करीता आरक्षित आहे.या दोन्ही पदांसाठी |
| | | | जीवशास्त्र | १ | | |

**(क)** वरील अ.क्र.१व३ या पदांसाठी दि.३.९.२०११ रोजी जाहिरात देऊन उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. पैकी माहिती तंत्रज्ञान विषयाचे प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी एकही अर्ज प्राप्त झाला नाही.दि. २१ जानेवारी २०१२ रोजी मा.व्यवस्थापन समिती समोर उर्वरीत पदांसाठी मुलाखती झाल्या जीवशास्त्र विषयाचे प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी एकही पात्र उमेदवार आला नाही मिळाला नसल्याने निवड होऊ शकली नाही. अर्धवेळ शिक्षणसेवक (रसायनशास्त्र) या ST प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदाकरीता श्री मोहित किसन पोटे (sc प्रवर्ग,) राहाता यांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता तात्पुरता नेमणूक आदेश देण्यात आला होता, परंतु ते कामावर रुजू झाले नाहीत.

वरील "ब "मधील अ.क्रं. १ ते ३ मध्ये नमुद केलेली ४ पदांसाठी जाहिरात देऊन नेमणूकीची कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद करण्यात आलेली रिक्त पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करुन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.**

**तसेच, मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर रिक्त पदे भरणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४६** **डॉ.अभिनव विजयकुमार बन्सल, कर्नाल (हरियाणा) यांचा श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. विभागात Observer म्हणून विनामोबदला सेवा करणेस संधी मिळणेबाबत दि.१०.१२.२०१२ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव -** डॉ. अभिनव विजयकुमार बन्सल, कर्नाल (हरियाणा) यांनी श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. विभागात विभागात Observer म्हणून सेवा करणेस संधी मिळणेबाबत दि. १०/१२/२०१२ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. “With Due regards I hereby humbly request you to please allow me as an observer in the department of ENT. I had cleared my post graduation MS (ENT) in April-May 2012. Please allow me for the same, I shall be very thankful to you & oblige it.”

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



डॉ. बन्सल यांना श्री साईनाथ रुग्णालयाचे ईएनटी विभागात निरीक्षक म्हणून सेवा करण्यासाठी परवानगी देण्यास हरकत नाही, असा अभिप्राय डॉ. आर.के. कुलकर्णी, वैद्यकिय अधिकारी (ईएनटी)-श्री साईनाथ रुग्णालय यांनी दिलेला आहे.

डॉ. बन्सल यांची माहिती खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| नाव | : | डॉ. अभिनव विजयकुमार बन्सल |
| पत्ता | : | # 690/13 Extension, Urban Estate<br>Karnal (Haryana)-131001. |
| शैक्षणिक पात्रता | : | एमबीबीएस-२००६.<br>एम.एस. (ईएनटी)-२०१२. |

श्री साईनाथ रुग्णालयाचे मंजूर कर्मचारी आकृतीबंधामध्ये वैद्यकिय अधिकारी (ईएनटी) या पदाची एक जागा मंजूर असून सदर पदावर डॉ. आर.के. कुलकर्णी हे कार्यरत आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलकडे या पदाच्या दोन जागा मंजूर असून एका पदावर डॉ. रंजन अशोक महाजन यांची नेमणूक केलेली असून ते प्रत्यक्ष काम श्री साईनाथ रुग्णालयाकडे करत आहे व एक पद रिक्त आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे प्र. वैद्यकिय अधिक्षक यांनी डॉ. बन्सल यांचेशी दूरध्वनीव्दारे प्रत्यक्ष चर्चा केली असून डॉ. बन्सल यांनी विनामोबदला Observership करणेची तयारी दर्शविली आहे. फक्त संस्थानमार्फत Sharing मध्ये निवास व्यवस्था व्हावी अशी विनंती डॉ. बन्सल यांनी केली आहे. तरी डॉ. अभिनव बन्सल यांना विनामोबदला Observership देण्यात यावी. त्यांचा ईएनटी विभागास व संस्थानला फायदा होईल. तसेच त्यांना सहा (०६) महिन्यांकरीता Observership देता येईल, असे प्र. वैद्यकिय अधिक्षक-श्री साईनाथ रुग्णालय यांनी सुचविले आहे.

तरी, प्र. वैद्यकिय अधिक्षक व प्र. वैद्यकिय संचालक यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ. अभिनव विजयकुमार बन्सल, कर्नाल (हरियाणा) यांना सहा महिन्यांकरीता श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. विभागात विनामोबदला Observership करणेस परवानगी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. अभिनव विजयकुमार बन्सल, कर्नाल (हरियाणा) यांना श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. विभागात सहा महिन्यांकरीता विनामोबदला Observership करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४७** **श्री.बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजिनिस्ट (११ महिने कालावधीसाठी) श्री साईबाबा हॉस्पीटलचे यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८० नुसार परफ्यूजनिस्ट हे पद व इतर वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरणेकामी दि. ०२/०४/२०११ रोजीचे दै. लोकमत व दि. ०४/०४/२०११ रोजीचे लोकसत्ता या वर्तमान पत्रांत वॉक इन इंटरव्ह्युवची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार दि. १०/०४/२०११ रोजी परफ्यूजनिस्ट व इतर पदांच्या मुलाखती घेण्यात आल्या. परफ्यूजनिस्ट हे पद अनुसूचीत जाती या प्रवर्गाकरीता आरक्षीत होते. परंतु, सदर वर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्याने, खुल्या प्रवर्गातील श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची परफ्यूजनिस्ट या पदावर ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे. रु.२१,०००/- वर नेमणूक करणेकामी निवड करण्यात आलेली होती.

त्यास अनुसरुन, जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/३५१/२०११ दि. २१/०४/२०११ अन्वये श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची परफ्यूजनिस्ट या पदावर ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे. रु.२१,०००/- वर नेमणूक करण्यात आलेली असून, ते दि. २८/०४/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत. त्यांची ११ महिने कालावधीची मुदत दि. २७/०३/२०१२ अखेर संपुष्टात आल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २१२ नुसार श्री म्हस्के यांची परफ्यूजनिस्ट या पदावर पुढील ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे रु. २१,०००/- वर नेमणूक करण्यात आली असून ते दि. ०२/०४/२०१२ रोजी कामावर हजर झाले आहेत.

श्री बाबासाहेब म्हस्के यांची सदर ११ महिन्यांची नेमणूक दि. ०१/०३/२०१२ अखेर संपुष्टात येत असल्याने, त्यांना पुढील मुदतवाढ देणेकामी वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचेकडून गोपनीय अहवाल मागविण्यात आलेला असून, त्यांनी पुढीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे. सदर ११ महिने कालावधीमध्ये श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू किंवा प्रस्तावीत नाहीत. डॉ. विजय माधवराव व्यवहारे, परफ्युजनिस्ट यांनी दि. २१/०१/२०१३ पासून राजीनामा दिलेला असल्याने परफ्युजनिस्ट या पदावर कर्मचाऱ्याची आवश्यकता आहे. तरी श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची सदर पदावर पुढील ११ महिने कालावधीकरीता तात्पुरती नेमणूक करणेस हरकत नाही.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजूर आकृतीबंधामध्ये परफ्यूजनिस्ट या पदाच्या ०३ जागा मंजूर असून सदर पदावर कायम कर्मचारी म्हणून श्री मोहम्मद नदीम अहमद व डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांची नेमणूक केलेली आहे. तसेच श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांना ११ महिने कालावधीकरीता तात्पुरती नेमणूक देण्यात आलेली आहे. त्यापैकी डॉ. विजय माधवराव व्यवहारे, परफ्युजनिस्ट यांनी दि. २१/०१/२०१३ पासून राजीनामा दिलेला आहे.

तरी, वैद्यकिय संचालक-रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांना परफ्यूजनिस्ट या पदावर पुढील मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्यूजनिस्ट श्री साईबाबा हॉस्पिटल यांना रु.२१,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर पुढील ११ महिने कालावधीकरीता पुर्वीच्याच अटी व शर्तीवर नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४८** **डॉ.विजय माधवराव व्यवहारे यांचा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग परफ्युजनिस्ट म्हणून काम करणेस संधी मिळणेबाबतचा दि.१५.०१.२०१३ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव -** डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांचा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये मानद परफ्यूजनिस्ट म्हणून काम करणेस संधी मिळणेबाबत दि. १५/०१/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. I am working in this hospital as a Sr. Perfusionist since May २००६. I have resigned from post & I am leaving from २०th January २०१३. I would like to work here as a Visiting Perfusionist to help my colligues.

Perfusionist is getting around Rs. ५,०००/- per case. Please consider me.

डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे परफ्यूजनिस्ट या पदावर ०२/०५/२००६ पासून नेमणूक करण्यात आली होती. डॉ. व्यवहारे यांनी दि. २२/१२/२०१२ रोजीचे अर्जान्वये राजीनामा सादर केला असून, जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १०५६/२०१३ दि. ०९/०१/२०१३ अन्वये त्यांचा राजीनामा दि. २१/०१/२०१३ पासून मंजूर करण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधात परफ्यूजनिस्ट या पदाच्या तीन जागा मंजूर आहेत. त्यापैकी दोन जागेवर कायम कर्मचारी (डॉ. व्यवहारे यांचेसह) नेमण्यात आलेले असून ११ महिन्यांकरीता एक कर्मचारी नेमण्यात आलेला आहे. कामाचा वाढता व्याप विचारात घेता आणखी एक परफ्यूजनिस्ट आवश्यकता असल्याने डॉ. हर्षल वाळूंज यांना कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर सभेचे इतिवृत्त प्राप्त होणे बाकी आहे. परंतु, आता डॉ. विजय व्यवहारे यांनी राजीनामा दिलेला असून दि. २१/०१/२०१३ पासून त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आलेला आहे.

डॉ. व्यवहारे यांचे उपरोक्त अर्जावर श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दोन कार्डियाक ओ.टी. सुरु असून सध्या एकच सिनि. परफ्यूजनिस्ट कार्यरत आहे. नवीन परफ्यूजनिस्टची नेमणूक होईपर्यंत आपल्याला डॉ. व्यवहारे यांची आवश्यकता असल्याने त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग परफ्यूजनिस्ट म्हणून घेण्यात यावे व त्यांना प्रति शस्त्रक्रिया रु. २,०००/- मानधन देण्यात यावे, असा अभिप्राय प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी दिलेला आहे.

तरी, प्र. वैद्यकिय संचालक यांचे मागणीनुसार डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग परफ्यूजनिस्ट म्हणून घेणेबाबत व त्यांना प्रती शस्त्रक्रिया रु. २,०००/- मानधन देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. विजय माधवराव व्यवहारे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये मानद परफ्यूजनिस्ट म्हणून प्रती शस्त्रक्रिया रु.२,०००/- मात्र या मानधनावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४९** **डॉ.राम शंकर महाजन (कंत्राटी सोनोलॉजिस्ट) यांचा नियुक्ती मुदत संपलेनंतर सेवा देणेस तयार असलेबाबतचा दि.१२.०१.२०१३ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव -** डॉ. राम शंकर महाजन यांनी दि. १२/०१/२०१३ रोजी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/२८३९/२०१२ दि. १०/०९/२०१२ अन्वये देण्यात आलेली नियुक्ती दि. २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी संपत आहे. त्यानंतरही मी सेवा देण्यास तयार आहे. सध्या मला रु. ३५,०००/- ऑनररीयम मिळातो. परंतु वाढीव खर्च विचारात घेता रु. ४५,०००/- दरमहा ऑनररीयम मिळावा अशी अपेक्षा आहे, असा अर्ज डॉ. महाजन यांनी केला आहे.

सदर अर्जावर प्र. वैद्यकिय अधिक्षक-श्री साईनाथ रुग्णालय यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. डॉ. राम शंकर महाजन यांची मदुत दि. २८/०२/२०१३ रोजी संपत असून डॉ. महाजन यांनी दि. १२/०१/२०१३ रोजीच्या अर्जान्वये दि. ०१/०३/२०१३ पासून पुढे सेवा देण्यास तयार असलेबाबत विनंती

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अर्ज सादर केला आहे. तरी डॉ. महाजन यांना पुढे ०६ महिने मुदतवाढ द्यावी असे मत आहे. दरम्यान वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या रिक्त पदावर नवीन उमेदवाराची नेमणूक करणेकामी जाहिरात देता येईल.

डॉ. महाजन यांची माहिती खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण नाव व पत्ता | : | डॉ. राम शंकर महाजन<br>प्लॉट नं. ४०, सर्व्हे. नं. ७८/२ साईश सर्व्हिस सेंटर जवळ,<br>हॉटेल साई पॅसो मागे, अविनाश पाटील वस्तीजवळ,<br>निमगाव को., ता. राहाता जि, अ, नगर |
| शैक्षणीक पात्रता | : | एमबीबीएस -१९७७, अल्ट्रासाऊंड ट्रेनिंग (६ आठवडे-१९९१) |
| जन्मतारीख | : | दि. १०/०८/१९५२ |

श्री साईनाथ हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) एक पद मंजूर असून ते रिक्त आहे. सदरचे पद भरणेकामी दि. २१/०६/२०१२ रोजी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

जाहिरातीस अनुसरुन प्राप्त पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि. २९/०७/२०१२ रोजी तज्ञ वैद्यकिय समितीसमोर घेण्यात आलेल्या आहेत. दि. २५/०८/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमधील निर्णयास अनुसरुन डॉ. तुषार एकनाथराव पगार यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर नेमणूक करण्यात आली होती. परंतु, कामावर हजर झाले नाही.

त्यांचेनंतर प्रतिक्षा यादीवरील डॉ. महेश मधुकर वर्पे यांची नेमणूक करण्यात येणार होती. परंतु, त्यांचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील सोनोग्राफी मशीनवर रजिस्ट्रेशन होणेकामी काहीसा कालावधी लागणार होता. तसेच त्यांनी रजिस्ट्रेशनसाठी आवश्यक महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे सर्टिफिकेट सादर केले नसल्याने त्यांना नेमणूक देता आली नाही.

सध्या श्री साईनाथ रुग्णालयाकडील सोनोग्राफी मशीनवर डॉ. राम शंकर महाजन यांचे रजिस्ट्रेशन असल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १५/०९/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५२ नुसार डॉ राम शंकर महाजन यांची श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर कंत्राटी पध्दतीने दि. ०१/०९/२०१२ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मासिक रु. ३५,०००/- मानधनावर तात्पुरती नेमणूक करण्यात आली आहे. सदर मुदत दि. २८/०२/२०१३ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडे रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून डॉ. राम शंकर महाजन यांना पुढे ०६ महिने मुदतवाढ द्यावी असा अभिप्राय प्र. वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला आहे.

तरी, प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे मागणीनुसार डॉ. राम शंकर महाजन यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनाग्राफी) या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिने कालावधीकरीता नेमणूक करणे व मानधनाची रक्कम निश्चित करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.राम शंकर महाजन यांची कंत्राटी सोनोलॉजिस्ट या पदावर पुढील सहा महिने कालावधीकरीता पुर्वीच्याच अटी/शर्तीवर रु. ३५,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा मल्टी मिडीयॉ थिंम पार्क प्रकल्पा अंतर्गत लेजर शो तयार करणेचे ठेकेदार लेजर व्हीजन लि. हॉंगकॉंग यांचे बीलाबाबत.**

**प्रस्ताव -** साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी आध्यात्मिक व मनोरंजनात्मक साईगार्डन प्रकल्प उभारण्याचे दृष्टीने मा. व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभांमध्ये वेळोवेळी चर्चा झालेली असून, त्यास अनुसरुन निर्णय घेण्यात आलेले आहे. लेजर शो उभारणीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६९३ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झाला.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. लेझर-शोचे उभारणीसाठी आवश्यक सिव्हील वर्क व संपूर्ण गार्डन विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या इतर कामांसाठी स्वतंत्ररित्या राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच, ४D शो व इतर वैशिष्ट्यपूर्ण कामांचे परिपूर्ण उभारणीसाठी राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले."

वरील निर्णयानुसार साईगार्डन प्रकल्पाचे लेजर शोसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ डिसेंबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९७४ अन्वये लेजर व्हिजन मेगा मिडीया लि., हॉंगकॉंग यांना US$ ५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करणेत आला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| S.N. | Particulars | |
|---|---|---|
| 1. | Show Controls: | |
| | Equipments: | • 1 X Digital Data ~ Pump Series III Media Server |
| | Show Production: | • 1 X 10 minute spectacular, inter weaving all effects and creative of the Shri Saibaba Sansthan Trust for the re-telling of a single episode from the Sai Satcharita. |
| 2. | Mediums: | |
| | Aqua screens: | • 2 X 22 meter diameter A/Screen of 170 sq.meter surface area<br>• 1 X 36 meter diameter A/Screen of 450 sqmeter surface area |
| | Audio System: | • 1 X Audio surround sound system for 5000 Pax amphitheatre |
| | Fountains: | • 1 X Musical Fountain |
| | Laser ray systems: | • 2 X By Dual colour OPSL sting ~ Ray Laser ray System's<br>• 1 X RGB Full Colour OPSL Light ~ Ray Laser ray System |
| | Lighting | • 8 X Moving head CMY high intensity Beam Lights (IP 55)<br>• 4 X Static Head CMY high intensity Beam Lights (IP 55) |
| | Pyro -Fireworks | • 2 X12 meter Flame Cannon<br>• 1 X 25 meter Flame Cannon |
| | Special FX | • 8 X smoke Factories<br>• 8X double machines |
| | Video High Definition | • 4X HD high intensity Projection Systems |
| 3. | Project Main | • Onsite Office<br>• Laser vision Office |

लेजर शो करीता सात कथानकांची निवड करण्यात आलेली असुन लेजर व्हिजन यांचेमार्फत सादर केलेल्या कथानकास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०३/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २५८ (१) अन्वये मान्यता देण्यात आली आहे. लेजर शो करीता खालील सात कथानकांची निवड करणेत आलेली आहे.

१. बाबांचे शिर्डीत प्रगटीकरण.
२. श्री खंडोबा मंदिरातील आओ साई.
३. बाबांनी पाण्याने लावलेले दिवे.
४. उदीचा प्रभाव.
५. साईबाबांचा ब्रम्हांडनिवास.
६. दासगणूंचे प्रयागस्नान.
७. बाबांचे स्वहस्ते अन्न शिजविणे.

उपरोक्त कामापोटी Laser Vision MegaMedia Ltd., Hong Kong यांना त्यांचेशी केलेले करारनाम्यानुसार आत्तापर्यंन्त खालील प्रमाणे Payment अदा करणेत आलेले आहे.

| Sr. No. | Payment Schedule | Percentage | Amount US$ |
|---|---|---|---|
| 01 | Payment 1- Advance- Due up on execution of Contract | 1.82% | 100100 |
| 02 | Payment 2- Due up on arrival at Shirdi of Project Manager | 10% | 550000 |
| 03 | Payment 3- Due up on departure from Shirdi of Concept Phase Staff | 10% | 550000 |
| 04 | Payment 4- Due up on Submission of Cincept Phase Report | 3.18% | 174900 |
| 05 | Payment 7- Due upon Concept Signoff | 5% | 275000 |
| 06 | Payment 8- Visual production phase to commence upon receipt of funds | 9% | 495000 |
| | | Total Bill paid US$: | 2145000 |

सदरहू प्रकल्पाअंतर्गत मुख्य इमारत व कम्पांउंड भिंतीचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट लि., हैद्राबाद यांना रक्कम रुपये ३०,९५,२७,२६६/- मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी १२ महिन्याचे कालावधीत दि. ०७/०८/२०१२ पर्यन्त व त्यानंतर देणेत आलेल्या वाढीव मुदत डिसेंबर, २०१२ पर्यन्त ठेकेदार यांनी सदर प्रकल्पातील फक्त

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



३.५% काम पूर्ण केले. वारंवार संधी देऊनही ठेकेदार सदरचे काम करणेस असमर्थ ठरल्याने, मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/१२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णयानुसार ठेकेदार यांचे Termination कायम ठेवण्यात आले आहे. सध्या सदर प्रकल्पाचे सिव्हील काम स्थगित आहे.

Laser Vision MegaMedia Ltd., Hong Kong यांनी सदरहू कामापोटी देय्य बिले खालील प्रमाणे सादर केली आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Invoice No. & Date | Payment Schedule | Percentage | Amount US$ |
|---|---|---|---|---|
| 01 | 001140 07 Nov 2012 | Payment 05 - Due upon Completion of the deliverables for 50% of the Design Phase. | 14% | 770,000 |
| 02 | 001192 17 Dec 2012 | Payment 06- Due upon Completion of the deliverables for 100% of the Design Phase. | 14% | 770,000 |
| 03 | 001193 17 Dec 2012 | Payment 09- Equipment purchase to commence upon receipt of funds. | 10% | 550,000 |
| | | | Total Payment US$: | 20,90,000 |

दिनांक ०८/११/२०१२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८६२ अन्वये लेखाशाखेत प्राप्त देयकांच्या पुन:मंजुरीबाबत झालेल्या निर्णयातील संबंधित भाग खालीलप्रमाणे आहे.

"..उपरोक्त नमूद केलेल्या कारणांसाठीच्या बिलांशिवाय अन्य सर्व कारणांसाठीचे रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) मात्र किंवा त्यापुढील खर्चाचे सर्व बिलांना मा.व्यवस्थापन समिती सभेचे पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असे ठरले."

उपरोक्त बिलाबाबत आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांनी जा. क्र. A-५२३/११-१२/UK/२९, दि. ३०/०१/२०१३ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे अभिप्राय सादर केलेला आहे.

With reference to above we would like to state as follows :
The current status of the project is as under:

a) The Civil works are completely halted at site and unless and until a new contract is in place the works cannot resume.
b) The works of M/s Laservision are entirely dependent upon completion of the Civil works. Due to the status of the Civil works being incomplete and stalled, the works of Laservision going ahead is of no use to the project.
c) The stages completed by Laservision as per Annexure B of the contract are 1 through 8. Out of these stages 5 & 6 are have been submitted by Laservision in Nov & Dec 2012 and become due and payable after our certification. We have received all Design Phase deliverables but not yet certified the same.
d) Once these are certified The payment against these stages 5 & 6 become due and payable. Certification of the design phase drawings and specifications at this stage is of no use to the project, Sansthan or to Laservision since nothing further can be done. Although it would complete the stages 5 & 6 for them and the payment falls due.
e) Stage 9 is the stage for purchase of Equipment. This stage cannot be initiated by Laservision at all since within three months they will have to bring the entire equipment for installation at site. The installation cannot take place. Further against the payment made for stage 8 for commencement of Visual production, Laservision has not started anything knowing fully well the situation of the Civil Works.

It can be said that M/s Laservision has cooperated throughout this phase of nearly non construction by stretching their dates as far as possible. However it would be fair if the Sansthan communicates to M/s Laservision to stop all its activities till further notice.

Unless and until the process of reselection of a Civil contractor is in place and the Civil contractor has completed the works of the basement roof of the main structure M/s Laservision needn't continue with their part of the works. As per the time schedule Annexure 'F' the time required from Stage 9 (Equipment purchase order) to stage 13 (practical completion) is only 26 weeks which includes delivery, installation, testing & commissioning of all equipment. Infact the visual production (stage 8) can move simultaneously upon restarting of the works.

The works of M/s Laservision are governed by the contract they have with the Sansthan. The contract dated 12th May 2011has provisions for such situations.

As per the contract the following is applicable and action should be taken accordingly:

1. As per clause 6 the Trusts' obligation include providing the Civil Works and all other works and also as a continuous project. But due to failure of the Civil

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



works contractor it has not been possible to handover the infrastructure to M/s Laservision.

2. As per clause 7.1(b) The trust will not unreasonably delay Laservision having access in accordance with clause 7.1 (a)
3. As per clause 7.3 Delay or failure on part of Trust to provide Laservision with access to the Site shall entitle Laservision to an extension of time in accordance with the provisions of Clause 17.
4. As per clause 17.1 The trust needs to notify in writing M/s Laservision for the possible delay expected specifying its cause and the effect.
5. After action on clause 17.1 above is taken by the Sansthan M/s Laservision as per clause 17.2 (e) will have to notify the trust and request and be entitled to a fair and reasonable extension of time for completion of the project.
6. As per clause 18 "Where Laservision is entitled to any extension of time for any delay or disruption caused by any of the events in clause 17.2 and the cost of the project has been increased as a result of any such event then in such event(s) where the delay is the fault of the Trust the fair and reasonable costs incurred by Laservision by reason of such delays shall be paid by the Trust."

   If such an eventuality occurs then all costs incurred by the Trust shall be recoverable from the Civil Contractor M/s KRR Infra Projects Pvt Ltd.
7. Last of all as per clause 5.4 dealing with the delay in payments by the Sansthan to Laservision, an interest shall be payable to Laservision on the outstanding amount calculated @ 12% per annum.

   We are sure that Laservision is fully aware of how the Trust funds are generated through donations by the devotees and may not invoke this clause. However in an eventuality where Laservision invokes this clause, then all interests costs incurred by the Trust shall be recoverable from the Civil Contractor M/s KRR Infra Projects Pvt Ltd. In view of above firstly the trust needs to take action as per para 4) above. Secondly, the bills raised by M/s Laservision for stage 5 & 6 amounting to Rs 8.47 Cr can be kept pending. The Sansthan may inform M/s Laservision that since the work has come to a standstill the payments against these bills are kept pending As far as the bill against stage 9 is concerned the Sansthan may request Laservision to withdraw the same since the work is at a standstill.

तरी आर्किटेक्ट यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार Laser Vision MegaMedia Ltd., Hong Kong यांचे देयकाबाबत कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.११०** **सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांचे अभिप्रायानुसार सध्या साईगार्डन प्रकल्पाचे बांधकाम (Civil Work) ठप्प झालेले असल्याने मे.लेजर व्हीजन लि., हाँगकाँग यांनी लेझर शोचे पुढील टप्प्यातील काम करणे योग्य होणार नाही व त्यामुळे मे.लेजर व्हीजन लि., हाँगकाँग यांना त्यांच्या देयकाची रक्कम आदा करता येणार नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, करारनाम्यातील शर्त क्र.१७/१ नुसार साईगार्डन प्रकल्पाच्या बांधकामास होणाऱ्या संभाव्य विलंबाबाबत मे.लेजर व्हीजन लि., हाँगकाँग यांना त्यांचे देयक तूर्त स्थगित ठेवणेत आलेले आहे व त्यांचेमार्फत लेझर शोचे प्रकल्पावर होत असलेले सर्व कामही तुर्तास थांबवावे, असे संस्थानतर्फे विनंती पत्राद्वारे कळविण्यात यावे.**

**तसेच, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांच्या अभिप्रायानुसार मे.लेजर व्हीजन लि., हाँगकाँग यांना तुर्तास रक्कम आदा करणेत येऊ नये व सदरची कार्यवाही करणेपुर्वी मा.औरंगाबाद खंडपीठात संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड. चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/ विधी अधिकारी)

---

**<u>दि.०७.०२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-</u>**

**विषय नं.५१** **श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्प संस्थानतर्फे यापुर्वी सन १९९९ मध्ये पूर्ण करणेत आला आहे. त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये ब्लॅक कडप्पा व रेड आग्रा स्टोनमध्ये डिझाईन करण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे काम पूर्ण होऊन आता तेरा वर्षांपेक्षाही अधिक कालावधी झालेला आहे. काळाचे ओघात सदर फ्लोअरींग बऱ्याच ठिकाणी खराब झाले आहे, त्यास तडे गेलेले आहेत. त्यामुळे सदर फ्लोअरींगचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्याचे फ्लोअरींग काढून त्याठिकाणी नविन फ्लोअरींग बसविणे अथवा सध्याचे फ्लोअरींग तसेच ठेऊन त्यावर नविन फ्लोअरींग बसविणे यापैकी योग्य तो पर्याय ठरविता येईल. सदर फ्लोअरींगचे क्षेत्रफळ अंदाजे ११००० चौ.मीटर इतके आहे.

वरीलप्रमाणे फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.२ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी फ्लोअरींगचे प्रकारानुसार व बसविण्याचे पद्धतीनुसार सदरहू अपेक्षित खर्च कामी अथवा जास्त होईल.

तरी उपरोक्त प्रस्तावास मा.त्रीसदस्य समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.१११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेसाठी Granite Stone ३ cm thk Sagaralli Grey Antique Finish (Flammed and Brushed) व Granite Stone २ cm thk Leather Finish यांचा वापर करण्यात यावा. याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास व वर्तमानपत्रात आणि संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी परवानगी मिळणेबाबत, मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत त्वरीत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख/विधी अधिकारी)

---

**विषय नं.५२** **साईगार्डन प्रकल्पाकरीता मुख्य इमारत व कम्पाऊंड भिंत बांधकामासाठी फेर निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव -** साईगार्डन प्रकल्पातंर्गत सिव्हील कामांसाठी ठेकेदार के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद यांना खालील तपशिलाप्रमाणे कार्यादेश देणेत आला होता.

| | |
|---|---|
| Name of work : | Construction of building works & boundary wall of Shri Sai Garden at Nimgaon Korhale, Shirdi. |
| Name of Contractor : | K.R.R. Infra Projects (P) Ltd., Hyderabad. |
| Architects : | Mathur & Kapre Associates Pvt. Ltd., New Delhi. |
| Resolution no. & date : | No.496 dt. 24.07.2011 |
| Work order no. & date : | No.SSST/Const/2182/2011 dt. 01/08/2011 |
| Contract Value : | Rs. 30,95,27,666/- |
| Actual Date of Commencement : | 13/09/2011 |
| Time Limit : | Twelve Months |
| Date of completion : | 07/08/2012 |
| Extension in time (if any): | --- |
| Value of work for interim bill: | Rs:1.0 Crore, |
| EMD deposited : | Rs: 32,74,386.00 |
| Initial Security Deposit : | Rs: 44,63,806.00, |
| Security Deposit : | 5% of the Contract Value payable as below |
| Amount Paid to Contractor : | Rs: 84,32,302.00 |

ठेकेदार के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद यांना वारंवार काम करणेची संधी देऊनही ठेकेदार सदरचे काम करणेस असमर्थ ठरल्याने, मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५५ अन्वये प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचेमार्फत दि. ०१/०६/२०१२ रोजी Termination letter देवून सदरचे काम काढून घेणेत आलेले आहे. तद्नंतर, ठेकेदार यांनी दि. २०/०६/२०१२ व दि. ०१/०९/२०१२ चे पत्राने काम सुरु करणेस अंतिम संधी देणेत यावी अशी विनंती केली यावर मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०८/१०/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ८०० (०२) अन्वये खालील प्रमाणे निर्णय झाला.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील बांधकामांसाठी आता नव्याने निविदा मागविल्यास प्रकल्पाचे खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच त्यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागेल. या बाबी व साई गार्डन प्रकल्पाची तातडी विचारात घेता, ठेकेदार के.आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्ट्स् प्रा.लि., हैद्राबाद यांचे Termination रद्द करुन, वरील बांधकामे पूर्ण करणेसाठी त्यांना तुर्त डिसेंबर, २०१२ अखेरपर्यंत मूदतवाढ देणेत यावी व त्यासाठी ठेकेदार यांचेकडून ते पुर्वीचेच निविदा दरात तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वाढीव मूदतीत काम करुन देणारअसलेबाबत हमीपत्र घेणेत यावे. डिसेंबर, २०१२ पर्यन्तचे वाढीव मुदतीत त्यांच्या कामाची प्रगती पाहून पुढील योग्य तो निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सभेपुढे सादर करावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णय दिनांक ३०/११/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत वाचून कायम करतेवेळी निर्णय क्रमांक ८८४ अन्वये उपरोक्त निर्णयामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करणेत आली आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईगार्डन व या प्रकल्पासारखे सध्या चालू अथवा प्रलंबीत असलेले इतर सर्व प्रकल्प व त्यासाठीचा खर्च इत्यादी कारणांसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजूरी घ्यावयाची असल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा. व मा. खंडपीठाचे मान्यतेनंतर उपरोक्त प्रस्तावाबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

ठेकेदार यांनी ऑक्टोबर, महिन्याचे पहिल्या दोन आठवड्यात साईटवर वॉटरबॉडी पडदीचे काही काम केले व त्यानंतर काम बंद केले . तसेच उपरोक्त दि. २०/०६/२०१२ व दि. ०१/०९/२०१२ रोजीचे पत्रामध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता केली नाही. त्यामुळे मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०८/१२/२०१२ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



"यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त नमूद केलेप्रमाणे Termination Notice नुसार पुढील कार्यवाहीसाठी मान्यता देण्यात आली. तसेच ठेकेदार यांनी साईटवर आणलेले सिमेंट, टॉर स्टिल व इतर मटेरिअल परत घेवून जाणेसाठी परवानगी देण्यात यावी असे ठरले."

मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ३०/११/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८८४ नुसार या कामाकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेनंतर फेर निविदा मागविणे आवश्यक आहे.

साईगार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवि दिल्ली यांनी साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत मुख्य इमारत व कम्पांउंड भिंत बांधकामातील उर्वरीत कामे करणेसाठी जिल्हा दरसूची (DSR) २०११-१२ नुसार रुपये ३४,८५,७१,२८३/- मात्र रकमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

तरी साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत सिव्हील कामांसाठी फेर निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.११२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील बाबींवर चर्चा करणेसाठी संस्थानचे वरिष्ठ मुख्य अभियंता, विधी अधिकारी व मा.औरंगाबाद खंडपीठात संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड.चौकीदार यांना पुढील सभेपुढे समक्ष बोलविण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५३** **दि.०८.११.२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.८६२ दुरुस्ती होणेबाबत.**

**प्रस्ताव -** दिनांक ०८.११.२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.८६२ मध्ये रु.१० लाखापुढील खर्चाचे बीलांना मा.व्यवस्थापन समितीचे पुर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठची मान्यता घेऊन बीले पारित करण्यात यावी असे ठरविण्यात आले आहे.

तथापी दि.०३.०२.२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.अध्यक्ष साहेब यांच्यात झालेल्या समक्ष चर्चेनुसार वरिल निर्णयात दुरुस्ती करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

परंतु, उपरोक्त नमूद केलेल्या कारणांसाठींच्या बीलांशिवाय अन्य सर्व कारणांसाठीचे रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) मात्र किंवा त्यापुढील खर्चाचे सर्व बीलांना मा.व्यवस्थापन समिती सभेचे पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यांनतरच बीले पारीत करणेत यावीत, असे ठरले.

वरील निर्णयास अनुसरुन संस्थानकडे प्राप्त देयकांची आदायगी करण्यात येत आहे. दि.०८.०१.२०१३ रोजी स्पेसवुड फर्निचर्स प्रा.लि. नागपुर यांनी संस्थानला पत्र देऊन त्यांचे उर्वरित बाकी रक्कम ०७ दिवसांच्या आत आदा करावी, अन्यथा प्रति महिना २ टक्के दराचे व्याजासह रक्कम आदा करण्यात यावी, असे कळविले आहे. तसेच दि.१५.१२.२०१२ रोजी मे.शापूरजी पालोनजी आणि कं.लि. यांनी त्यांची उर्वरित बाकी रक्कम रु.२.४८ कोटी त्वरीत देणे विषयी कळविले आहे.

संस्थानकडे प्राप्त होणाऱ्या विविध विभागाकडील वस्तू साहित्य, रुग्णालयाकडील औषधे इतर साहित्य संदर्भातील बीले, प्रलंबीत राहिल्यास कायदेशीर दृष्ट्या संस्थानला पुरवठाधारकांनी व्याजासह मागणी केल्यास आर्थिक नुकसान व लेखापरिक्षणातील आक्षेपांना विनाकारण सामोरे जावे लागेल. तसेच भविष्यात आवश्यकता भासल्यास पुरवठाधारक मालाचा पुरवठा करणार नाहीत. सबब रु.१० लाखाची मर्यादा, ज्या पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत व त्या पोटी संस्थानला माल प्राप्त झालेला आहे. तसेच ज्यांना अंशतः रक्कम अदा करण्यात आलेली आहे अशा पुरवठाधारकांच्या बीलाबाबत सदरची अट रद्द करण्यात यावी व त्यांना त्यांचे बीलाची आदायगी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.११३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०८.११.२०१२ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.८६२ अन्वये संस्थानमधील सर्व कारणांसाठीचे रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) मात्र किंवा त्यापुढील खर्चाची देयके मा.व्यवस्थापन समिती सभेचे पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यांनतरच पारीत करणेत यावीत, असे ठरलेले आहे.**

**सदरहू निर्णयामुळे पुरवठाधारक/ ठेकेदार यांनी पुरवठा आदेशातील काम पूर्ण करुनही सदर कामाबाबतची देयके आदा करणेस उशीर होतो व पुरवठाधारक/ ठेकेदार संस्थानला बाकी असलेल्या रकमेबाबत येणारी रक्कम व्याजासह मिळावी, अशा नोटीसा पाठवितात.**

**पुरवठाधारक/ ठेकेदार यांची देयके प्रलंबीत राहिल्यास व त्यांनी उर्वरित रकमेची व्याजासह मागणी केल्यास संस्थानचे आर्थिक नुकसान होऊन, लेखापरिक्षणातील आक्षेपांना विनाकारण सामोरे जावे लागेल. तसेच, भविष्यात पुरवठाधारक मालाचा पुरवठा करणार नाहीत. याबाबी विचारात घेऊन संस्थानचे बांधकाम, विद्युत व इतर कोणत्याही विभागांची पुरवठाधारक/ ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण झालेल्या किंवा चालु असलेल्या विविध कामांची व त्यानुषंगीक इतर बाबींची तसेच, आर्किटेक्ट/ सल्लागार यांची देयके त्वरीत आदा करणेत यावीत, असे ठरले.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ अधिक्षक, खरेदी/ बांधकाम विभागप्रमुख/ विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५४** **लेखाशाखेत प्राप्त देयकांच्या पुन:मंजुरी बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या विविध विभागातुन देयके आदा करण्यासाठी लेखाशाखेत प्रस्तावित करण्यात येतात. यापैकी दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ अखेर प्रलंबित असलेल्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे: -

| अ. नं. | विभाग | पुरवठादाराचे नांव | तपशील | जमा/नांवे रक्कम | मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | बांधकाम विभाग | रोमन टारमॅट लि., मुंबई | शिर्डी शहर एकात्मिक प्रकल्पांतर्गत ६ रस्ते विकसीत करणेकामी. (मंजुर रक्कम रु. ३३,८३,२६,१९९/-) | २,५७,३१,८१९.०० | ५३४<br>०४-०७-२०१० |

मा.अध्यक्ष सो. यांचे सुचनांनुसार सर्व प्रोजेक्टचे कामकाज उच्च न्यायालय यांना दाखवुन पेमेंट करावे, त्यानुसार कार्यवाही करणे योग्य होईल, अशा प्रकारच्या सुचना आहेत.

उपरोक्तप्रमाणे संबंधीत ठेकेदारास आपण कोणत्याही प्रकारचे पेमेंट देत नसुन संबंधीत ठेकेदारास यापुर्वी दिलेल्या आगावू रक्कमा जमा नांवे करीत आहेत. तरी, सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.११४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.५५ श्री.रमेश रतन सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

विषय नं.५६ श्री.रविंद्र शिवाजी डोखे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

विषय नं.५७ श्री.भारत सिताराम कापसे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

विषय नं.५८ संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नेमणूक करणेत आलेल्या लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांना पुढील एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत.

विषय नं.५९ मौजे निमगाव को-हाळे ग्रामपंचायतीची इमारत कराची चालू बाकी भरणेबाबत.

विषय नं.६० सन २०१२-१३ सालची साईआश्रम ०१ ची घरपट्टी व इतर कर भरणेबाबत.

विषय नं.६१ श्री साई सत्च्चरित पारायण-२०१२ खर्चाबाबत.

विषय नं.६२ अर्धवेळ सहाय्यक शिक्षक, ग्रंथपाल सहाय्यक व इतर यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.

विषय नं.६३ कंत्राटी पध्दतीने सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री.रमेश शांताराम साबळे, विशेष कार्य अधिकारी यांचा दि.१४.११.२०१२ चा अर्ज.

विषय नं.६४ कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबत श्री.नारायण केशवराव कुलकर्णी, अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचा दि.२९.११.२०१२ रोजीचा अर्ज.

विषय नं.६५ श्री.एस.जयपाल राज कंत्राटी पध्दतीने वाहन चालक, मुंबई कार्यालय यांचा मुदतवाढ व मानधनातवाढ मिळणेबाबतचा अर्ज.

विषय नं.६६ श्री. चंद्रकांत जयवंत रणशुर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज.

विषय नं.६७ कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबत श्री.पी.बी. बोरावके, विशेष कार्य अधिकारी यांचा अर्ज

विषय नं.६८ कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबत श्री.ई.एन.वाघ , विशेष कार्य अधिकारी यांचा अर्ज

विषय नं.६९ श्री.गिरीष एकनाथ चोळके, मुकादम, बांधकाम विभाग यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.

विषय नं.७० संस्थान कर्मचा-यांना "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" लागू करणेबाबत.

विषय नं.७१ साईलिला मासिकाचे कामकाजबाबत.

विषय नं.७२ श्री.अनिल भणगे यांना कृषी अधिकारी या पदावर कायम करणेबाबत.

विषय नं.७३ विविध पदावर पदस्थापना देणेकामी दि.२६.०२.२०१२ रोजी घेतलेल्या विभागीय लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेले परंतू शासन निर्णयानुसार लगतच्या पाच वर्षाचे गोपनीय अभिलेख्यांची प्रतवारी ब+ येत नसलेल्या कर्मचा-यांचेबाबत.

विषय नं.७४ श्री साईबाबा संस्थानमध्ये तारतंत्री (वायरमन) पदाचे काम करीत असलेल्या पी.डब्ल्यू.डी. परवानाधारक वर्ग-०४ कर्मचा-यांना तारतंत्री (वायरमन) पदावर पदस्थापना देणेबाबत.

विषय नं.७५ श्री.विजय अशोक गोंदकर यांचा अन्न पदार्थाच्या केमिकल टेस्ट व तयार मालाच्या तपासण्या करणेसाठी नेमणूक देणेबाबत दि.०८.११.२०१२ रोजीचा अर्ज.

विषय नं.७६ फायर ॲण्ड सेफ्टी अधिकारी (कंत्राटी) पद जाहीरातीद्वारे भरणेबाबत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



विषय नं.७७ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामिण विभाग संगमनेर, उपविभाग संगमनेर यांचेकडून संस्थानचे पाणीपुरवठा प्रतिनियुक्तीने इंजिनियर घेणेबाबत.

**निर्णय क्र.११५ विषय नंबर ५५ ते ७७ या विषयावरील चर्चा पुढे ढकल्यात आली.**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील इमारतीचा ताबा जिल्हा परिषद, अहमदनगर यांना देणेबाबत.**

**प्रस्ताव** मा. मुख्याध्यापक, जि.प. शाळा, शिर्डी यांनी दि.०९/०६/२०१२ चे पत्राने तसेच मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.), राहाता यांनी दि.२३/१०/२०१२ चे पत्राव्दारे संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाचे ताब्यातील ९ हॉल, ११ वर्गखोल्या व मुख्याध्यापक निवासस्थान जि.प.शाळा, शिर्डी यांचे ताब्यात देणेची विनंती केली आहे. त्याबाबत प्र.प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी सादर केलेल्या दि.१३/१२/२०१२ रोजीचे कार्यालयीन टिपणीवर मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी बांधकाम विभागाचा सविस्तर अभिप्राय समाविष्ट करणेविषयी आदेश दिला आहे. त्यानुसार प्र.प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महा. शिर्डी यांचे उपरोक्त प्रस्तावाबाबत बांधकाम विभागाने खालिलप्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

**अ)** शिर्डी येथील सर्व्हे नं. ६ पैकी मधिल ५९.१५ आर क्षेत्रावर संस्थानतर्फे नवीन जिल्हा परिषद शाळा, शिर्डी करीता तळमजला अधिक दोन मजल्यांचे आर.सी.सी. बांधकामातील इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. या इमारतीत ४८ वर्ग खोल्या, ९ हॉल्स तसेच स्वतंत्र संडास बाथरुम, मुख्याध्यापक निवासस्थान, मुतारी व संरक्षक भिंत, स्टेज, पिण्याचे पाण्याची टाकी अशा अद्ययावत सोयी सुविधा करण्यात आलेल्या आहेत. सदर मिळकतीचा कब्जा दि.२८/०८/२००६ रोजी संस्थानने जिल्हा परिषद यांना दिलेला आहे.

**ब)** दि.२४ सप्टेंबर, २००९ रोजी झालेल्या अदलाबदलीच्या लेखान्वये वरीलप्रमाणे संपूर्ण इमारत जागेसह जि.प., अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली असून त्यानुसार सदर जागा व इमारतीची मालकी जि.प., अहमदनगर यांची झाली आहे. तत्पुर्वी संस्थानचे शैक्षणिक संकुलात जागेच्या कमतरतेमुळे कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग भरविण्यास अडचण निर्माण झाल्याने जून २००८ पासून उपरोक्त जि.प. शाळेच्या नवीन इमारतीत कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग भरविण्यात येत आहेत. सदर इमारतीतील ९ हॉल व ११ वर्गखोल्या तसेच मुख्याध्यापक निवासस्थान संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयासाठी सध्या वापरात आहेत. सदर हॉल, खोल्या व मुख्याध्यापक निवासस्थान रिकामे करुन जि.प.शाळा, शिर्डी यांचे ताब्यात द्यावयाचे झाल्यास संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालय भरविणेसाठी इतरत्र व्यवस्था करावी लागेल.

त्यासाठी खालिल पर्यायांचा विचार करता येईल.

**०१)** संस्थानतर्फे शिर्डी सर्व्हे नं. २०७/२ मधील खरेदी करण्यात आलेली ८० आर जागा बिरेगाव भागाचे प्रस्तावित विकास योजनेत वाहनतळासाठी आरक्षित दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी शाळा बांधकाम करावयाचे झाल्यास विकास योजनेत फेरबदलाचा प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मंजुरी मिळालेनंतर शाळा बांधकामाबाबत पुढील कार्यवाही करता येईल.

**०२)** मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता. राहाता गट नं.२४५ पै. मधिल संस्थान जमिनीचे क्षेत्र ०३ हेक्टर ३० आर इतके आहे. तथापी प्रादेशिक विकास योजनेत सदरहू जमिन हरीत पट्ट्यात दर्शविलेली आहे. त्यामुळे याठिकाणीही सध्या शाळा बांधकाम अनुज्ञेय नाही. तसेच, सदरहू जमिन शिर्डीपासून लांबचे अंतरावर (मंदिर परिसरापासूनचे अंतर सुमारे ४ कि.मी. इतके आहे.) असल्याने विद्यार्थ्यांना येण्याजाण्यास गैरसोयीचे ठरु शकते.

**०३)** मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १७२ मधिल साई आश्रम भाग-२ प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेतर्फे देणगीदाखल करण्यात आलेले आहे. याबाबत दि.०४/०२/२००६ रोजी संस्थान व त्यांचेमध्ये झालेल्या समझोता करारानुसार सदर इमारतींचा वापर हा साईभक्तांचे निवासासाठी करावयाचा आहे. सदर प्रकल्पातील एक इमारत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता तात्पुरते वापरासाठी द्यावयाची झाल्यास तत्पुर्वी मा.श्री.के.व्ही.रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांची अनुमती घेणे आवश्यक राहील.

साईआश्रम भाग-२ येथिल इमारती अद्याप भक्तांच्या वापरासाठी खुल्या केलेल्या नाहीत. तसेच त्यांचा साईभक्तांचे निवासासाठी वापर सुरु केल्यानंतर त्या लगेचच पूर्ण क्षमतेने वापरात येण्याची शक्यता नाही. किमान सुरुवातीचे वर्षभरात सर्व इमारती पूर्ण भरण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे त्यातील एक संपूर्ण इमारत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता तात्पुरते वापरासाठी उपलब्ध करणेस हरकत नसावी. तसेच दरम्यानचे कालावधीत वरील क्र.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे शिर्डी येथिल सर्व्हे क्र. २०७/२ मधिल ८० आर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



जागेत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता कायमस्वरुपी इमारतींचे बांधकाम करणेकामी फेरबदल प्रस्ताव सादर करुन इतर आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाची सध्याची इमारत जिल्हा परिषदेने हस्तातरीत करण्याची मागणी केली असल्याने नवीन इमारतीचे बांधकाम होईपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयासाठी साईआश्रम नं. २ मधील 'सी 'इमारत तात्पुरती उपलब्ध करुन देता येईल.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.११६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी साईआश्रम भाग-०२ प्रकल्पातील एक इमारत कनिष्ठ महाविद्यालया करीता तात्पुरते वापराकरीता घेण्यासाठी मा.श्री.के.व्ही.रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **सध्याच्या जीवनदायी योजनेअंतर्गत आणि नवीन लागू करण्यात येणाऱ्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत उच्च दर्जाचे Implants वापरणेबाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या शासनाच्या जीवनदायी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून लवकरच शासन निर्णयानुसार सदर योजना टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात येऊन नवीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना लागू करण्यात येणार आहे.

सदर शासकीय योजनांचे अंतर्गत पात्र लाभार्थी रुग्णांच्या शस्त्रक्रियांसाठी शासन मंजूर दरपत्रकानुसार/ पकेज रकमेस मंजूरी देण्यात येते, अशा पॅकेज रकमे अंतर्गत कमीत-कमी खर्चाचे किंवा साधारण प्रतीचे Implants वापरुन शस्त्रक्रिया करण्यात आल्यास, हॉस्पिटलचे सध्याच्या प्रचलित दरांनुसार नफा किंवा नुकसानीमध्ये विशेष फरक पडण्याची शक्यता नाही.

तथापि, उच्च दर्जाचे उदा.Drug Coted Stents, Rate Responsive Pacemakers, PDA/ ASD/ VSD Devices इ. कॅथलॅब प्रोसिजर्स, Bio-prosthetic/Bi-leaflet Valves वापरुन करावयाच्या हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्यास रुग्णांच्या बिलांमध्ये पॅकेज रकमेपेक्षा साधारण रु.२०,०००/- पेक्षा अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अशा रुग्णांकडून वाढीव बिलांच्या फरकापोटी रक्कम भरुन घेता येणार नाही.

शासनाकडून नवीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत बहुतेक सर्वच कॅथलॅब प्रोसिजर्सचे दर साधारण २५ ते ३० टक्के इतके कमी निर्धारीत करुन देण्यात आलेले आहेत, तथापि, हृदयाची बायपास शस्त्रक्रिया, Intra Cardiac Repair शस्त्रक्रियांसाठी हॉस्पिटलच्या सध्याच्या दरांपेक्षा साधारण ३० ते ४० टक्के इतके दर जादा देण्यात आलेले आहेत.

तरी सध्याच्या तसेच नवीन राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत उच्च दर्जाचे Implants वापरुन कॅथलॅब प्रोसिजर्स, हृदय शस्त्रक्रिया करणेबाबत तसेच अशा रुग्णांच्या बिलांतील फरकापोटी शासन मंजूर पॅकेज दरांपेक्षा जादा रकमेच्या सवलती देणेबाबत योग्य तो निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.११७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याच्या जीवनदायी योजनेअंतर्गत आणि नवीन लागू करण्यात येणाऱ्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अटीस व नियमावलीस अधीन राहून या योजनेअंतर्गत दाखल होणाऱ्या हृदय रुग्णांच्या कॅथलॅब प्रोसिजर्स, हृदय शस्त्रक्रिया करतेवेळी उच्च दर्जाचे Implants वापरण्यात यावे व संबंधीत डॉक्टरांनी त्याच्या वापराबाबतचे सक्षम कारण रुग्णाच्या फाईलमध्ये सविस्तर लिहावे.**

**तसेच वैद्यकीय संचालक यांनी वार्षिक खरेदी करतेवेळी संबंधीत कन्सल्टंट डॉक्टरांचे सल्ला घेऊन सदर योजनेअंतर्गत वापरण्यात येणाऱ्या Implants/ Consumables ची खरेदी करावी व त्यानुसार संबंधीत कन्सल्टंट डॉक्टरांना उपलब्ध असलेलेच Implants/ Consumables/ Medicines वापरण्यात यावे, असे परिपत्रकान्वये कळविणेत यावे. अपवादात्मक प्रसंगी एखाद्या रुग्णाला वेगळी औषधे/ साहित्य लागल्यास ती औषधे/ साहित्य वैद्यकीय संचालक यांचे शिफारसीने/ मान्यतेने त्या रुग्णापुरतेच खरेदी करावे. यामध्ये रुग्णाला सध्याचे जीवनदायी योजनेअंतर्गत व नवीन राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शासन मंजूर पॅकेज दरांपेक्षा जादा येणाऱ्या तफावतीतील रकमेस सवलत देण्यात यावी.**

**सवलत दिलेल्या रुग्णांची व त्यांना प्रत्येकी किती सवलत दिली याची आकडेवारी दर्शविणारा तपशिल प्रतिमहा मा.व्यवस्थापन समितीपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.११८** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**०१)** लेखाशाखा विभागात देणगी काऊंटर व दक्षिणा पेटयांमध्ये प्राप्त होणाऱ्या वस्त्रांची / वस्तुंची विक्री करणेकरीता ई-लिलाव पध्दत सुरु करणेबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**०२)** निवासस्थाने, प्रसादालय इत्यादी ठिकाणी व त्या ठिकाणच्या परिसरामध्ये भक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रथमोपचार योजना म्हणून तसेच, कोणताही अनर्थ घडु नये याकरिता बॅग स्कॅनर बसविण्यात यावेत. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**०३)** संस्थान कर्मचारी आकृतीबंधानुसार रिक्त असलेली पदे पदोन्नतीद्वारे/ एकत्रित मानधनावर/ ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने भरणेकामीचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो सभेसमोर सादर करावा व त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना/ विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.६१ ते ११८ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी